विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


**ग्रंथाली वाचक चळवळ**

# शब्द रुची

**सप्टेंबर २०२०, वर्ष सातवे**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
**अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट : योगिता मोरे, सहकारी : सुमेधा कुवळेकर
shabdruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com www.granthali.com

अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवार पाठवावी.
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**



अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.


## अनुक्रम


**रमेश वाघमारे**
संगीतमार्तंड जसराज यांच्या सहवासात / ६

**कौशल इनामदार**
एका सिंदबादची कहाणी / ९

**प्रदीप निफाडकर**
राहत, चाहत आणि अदावत / १२

**अपर्णा पाटील**
लोकप्रिय तरीही... / १५

**संतोष पाठारे**
विशफुल थिंकिंग आणि निशिकांत कामत / १९

**डॉ. मोहन द्रविड**
हे चित्र पाहा आणि ते चित्र पाहा / २२

**अवलिया**
सुहासिनी कीर्तिकर / २७

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
साम्यवादी चीन आणि सत्तालोलुप क्सी जिनपिंग / २९

**सॅम कार्व्हर**
गॅलरीमॅन / ३३

**हार्दिक व्यक्तिमत्त्व**
मीना नाईक / ३६

**अबोध चित्रांच्या बोध-प्रवास**
राधा आंबेकर / ३८

**सकारात्मक आणि आशावादी जीवन**
डॉ. मालिनी नाडकर्णी / ४२

**ऑनलाइन पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ४६**

**ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ४९**

# संपादकीय

साधना आणि अध्यात्म यांचा मिलाफ होतो, तिथे 'विद्या विनयेन शोभते'ची प्रचीती येते. पंडित जसराज हे याचं उदाहरण. त्यांच्या वाणीतील मृदुता आणि चेहऱ्यावरील सात्त्विकता त्यांच्या सुरांइतकीच ठसणारी होती. त्यांच्या निधनानं आणखी एक गानतपस्वी काळाच्या पडद्याआड गेला. अमेरिकेत ते कधी रमेश वाघमारे यांच्याकडे उतरत असत. वाघमारे यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू या अंकात उलगडले आहेत. उर्दू गझलकार राहत इंदोरी, नाट्यअभिनेत्री ललिता केंकरे, नाट्य-चित्र कलावंत-दिग्दर्शक निशिकांत कामत, अन्य भाषकांत मराठी रुजवणारे सुहास लिमये ही माणसं आपलं कर्तृत्व मागे ठेवून काळाच्या पडद्याआड गेली. त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारे लेख अंकात आहेत. चित्र-शिल्पकलेच्या क्षेत्रातील एकेक कलावंत या अंकापासून आपल्याशी संवाद साधणार आहेत. या अंकात राधा आंबेकर या चित्रकर्ती आपली ओळख करून देत आहेत.

पुढचा ऑक्टोबर-नोव्हेंबर असा जोडअंक दिवाळी अंक म्हणून छापील स्वरूपात प्रसिद्ध होईल.

कोरोनानं गेले सहा महिने जगाला ग्रासलं आहे. सारेच व्यवहार ठप्प झाले आहेत. पाडव्याला गुढी उभारून नववर्षाचं स्वागतही करता आलं नाही. सारे सणवार झाकोळले. त्यातून त्रागा झाला आणि सोकावलेल्या काळानं फारच ताणून धरल्यावर धीर सुटू लागला. अति झालं आणि...

...आता हळूहळू सारं पुन्हा सुरू होतंय, त्यामागे विविध क्षेत्रांतल्या कोविड-योद्ध्यांचं योगदान विसरता येणार नाही. त्यांनी, प्राणाहुती देऊनही, आपल्याला भीती वा नैराश्य घेरणार नाही हे पाहिलं.

याच काळानं नवा विचार दिला, नवा मार्ग दाखवला. प्रत्यक्ष नाही तर प्रतिमेतून भेटी घडू लागल्या. अन्यथा याकडे वळले नसते, ते डिजिटलविश्वाशी जुळवून घेऊ लागले. कौटुंबिक व्हिडिओ कॉन्फरन्स होऊ लागल्या. डिजिटल शिक्षण होऊ लागलं. डिजिटल मुलाखती, गाणी, कथाकथन असे वेगवेगळे प्रयोग झाले. या डिजिटलविश्वानं नवा विश्वास दिला. त्याचाच आधार घेत 'ग्रंथाली'नं १ मे २०२० रोजी, महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या हीरकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून, 'साहित्याच्या पारावर' हा साहित्यिक भेटीचा ऑनलाइन उपक्रम सुरू केला. सुदेश हिंगलासपूरकर व धनंजय गांगल यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम कळताच प्रा.डॉ. लतिका भानुशाली, अस्मिता पांडे, मेधा आलकरी, मृण्मयी भजक यांनी त्याच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी उत्स्फूर्तपणे स्वीकारली आणि उत्कृष्ट निभावत आहेत. तांत्रिक बाजू 'पिक्सेल बाय पिक्सेल'च्या राजू कदम यांनी उत्तम सांभाळली. तसंच, जाहिरात व प्रसिद्धीची बाजू धनश्री धारप आणि योगिता मोरे यांनी सांभाळली. दोन लेखक व वाचक दर शुक्रवारी, असं त्याचं स्वरूप आहे. आजवर वीस कार्यक्रम झाले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. 'शब्द रुची' इ-अंक स्वरूपात प्रसिद्ध झाला. तसंच, तीन पुस्तकांची ऑनलाइन प्रकाशनं झाली. डिजिटल माध्यम प्रभावी होणार हा होरा अनेक जण गेली काही वर्षं सांगत होते, ते आता घडतंय. मात्र त्याला कोरोनाचं निमित्त व्हायला नको होतं. तरी अजून छापील पुस्तकांची मागणी आहे, असंही दिसतंय.

दिवाळी अंक हे महाराष्ट्राचं वैशिष्ट्य, सांस्कृतिक संचित आणि परंपरा. या वर्षी छापील दिवाळी अंक निघतील का, त्यांना अर्थबळ लाभेल का, प्रसिद्ध केले तरी वितरणाचं काय, असे प्रश्न आहेत. मात्र ही परंपरा खंडित होऊ नये म्हणून पुढाकार घेत 'ग्रंथाली'नं पाच दिवाळी अंकांच्या संचाची योजना आखली आहे. यात शब्द रुची, ऋतुरंग, अंतर्नाद, मौज आणि पद्मगंधा हे पाच दिवाळी अंक असतील. एक हजार रुपयांचा हा

संच असेल. ही परंपरा जपण्यास हातभार लावतील त्यांची नोंद कृतज्ञतापूर्वक ग्रंथालीच्या 'शब्द रुची' अंकात घेतली जाईल. या संचासह 'स्टोरी टेल'चे दोन महिने ऑडिओ बुक्स विनामूल्य ऐकता येतील असे कार्ड मिळेल. शिवाय दिवाळीच्या पहिल्या दिवशी आगळी 'दिवाळीपहाट' ऑनलाइन अनुभवता येईल. संच घेणाऱ्यालाच फक्त ती पाहता येईल. त्यावर बोनस म्हणून, संच घेणाऱ्यास आणखी चार व्यक्तींना दिवाळीभेट देण्यासाठी चार कोडकार्डे दिली जातील. म्हणजे एका संचावर पाच घरी हा कार्यक्रम दिसेल.

पंधरा वर्षांपूर्वी 'गगन सदन तेजोमय' या नावानं 'दिवाळीपहाट' सुरू केली त्या 'ॲड फिझ'च्या विनोद पवार आणि महेंद्र पवार यांच्या सहयोगानं 'पर्व दुसरे' साकारत आहे. अरविंद जगताप संहितालेखन करत असलेल्या या 'दिवाळीपहाट'चं शीर्षक आहे 'पत्रास कारण की...'

पत्र...

या दोन अक्षरांत त्रिकाळ सामावतो. ही अक्षरशिल्पं भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांची अक्षरछबी होतात. आज हे पत्रलेखन-वाचन डिजिटल होत असलं, तरी त्यात तो नजरेला जाणवणारा ओलावा नसतो. कारण कागदावर उमटलेली अक्षरं त्यांच्या वळणातून स्व-भाव घेऊन येतात, गंध घेऊन येतात. अंगाऱ्यापासून गुलाबपाकळ्यांपर्यंत वेगवेगळ्या भावना आणतात. कधी डकवलेल्या अक्षता, कधी राखीही आणतात! हा पत्रमहिमा उलगडावा तेवढा थोडाच आहे. तोच प्रयत्न करणार आहोत 'पत्रास कारण की' दिवाळीपहाटमधून.

त्यासाठी पाच दिवाळी अंक सज्ज होत आहेत. 'ग्रंथाली'च्या 'शब्द रुची'ची जुळवाजुळव सुरू झाली आहे. ज्येष्ठ पत्रकार-संपादक आल्हाद गोडबोले त्याचं संपादन करत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'साठीनंतरचा महाराष्ट्र आणि उद्याचा भारत' या संकल्पनेवर अंकाचा मुख्य भाग असेल. आरोग्य, शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय पट, संगीत, अर्थकारण, भाषा, माध्यमं असे विविध पैलू त्यात जोखले जाणार आहेत. अन्य साहित्यही असणार आहेच.

आता वाट पाहतोय तुमच्या प्रतिसादाची. 'ग्रंथाली'च्या इ-मेलवर वा कार्यालयीन फोनवर आपल्या संचाची मागणी येत्या १० ऑक्टोबरपर्यंत नोंदवा.

येणाऱ्या मंगल पर्वाच्या सदिच्छा.

**– अरुण जोशी**
भ्रमणध्वनी : ८१०८२४५७९७
scorpion.arun09@gmail.com

ग्रंथाली

**भगवान इंगळे यांची आगामी तीन पुस्तके!**

**ढोर**



**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**भिडू**



**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

**उभारणी**



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**



**रमेश वाघमारे**

# संगीतमार्तंड जसराज यांच्या सहवासात

पंडित जसराजजी कार्यक्रमानिमित्त टोरांटोला आले की डॉ. प्रताप रस्तोगी व त्यांच्या पत्नी ‘जिजी’ ह्यांच्याकडे राहत. प्रत्येक वेळी ते त्यांना, माझी पत्नी मंगल हिला व मला बोलावून घेण्यास सांगत. ह्याचे एक कारण पंडितजी आमच्याकडे अनेक वेळा राहून गेले असल्यामुळे मंगलला त्यांच्या लहानसहान सवयी व आवडीनिवडी माहीत होत्या. कलाकाराचा ‘मूड’ राखण्याच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे असते. शिवाय त्यांना हॉलवर घेऊन जाण्याचे व परत आणण्याचे काम आमचे असे. आम्हाला ते आवडे, कारण त्यामुळे आम्हाला त्यांच्या होणाऱ्या व झालेल्या कार्यक्रमाविषयी बोलण्याची संधी मिळे.

आमचा मुलगा जेमिनी ह्याचे लग्न ठरले तेव्हा जसराजजी न्यू यॉर्कला कार्यक्रमानिमित्त राहत होते. मंगलने त्यांची व्हायोलिनवादक साथीदार कला रामनाथ हिला ती बातमी सांगितली. तिने ती गुरुजींना सांगितली. लगेच त्यांनी फोन घेऊन, ‘‘मी दोन आठवड्यानंतर मॉंट्रियलला कार्यक्रमासाठी येत आहे; तो संपल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी जेमीला आशीर्वाद देण्यासाठी ऑटावाला येईन. तुम्ही जेमीला बोलावून घ्या,’’ असे म्हटले. आता आली का पंचाईत! कारण जेमी तेव्हा टोरांटोला राहत होता. म्हणजे कारने पाच तास दूर. पण पंडितजींचे नाव घेतल्यावर तो तयार झाला व त्याच्या फियान्सेला- स्टेफला - घेऊन आला. कबूल केल्याप्रमाणे पंडितजी आले. जेमी व स्टेफने (आधी सांगितल्याप्रमाणे!) त्यांना नमस्कार केला. मग जसराजजींनी तानपुऱ्याची साथ नसता दोन आशीर्वादात्मक गाणी म्हटली. दुसऱ्या गाण्यात त्यांनी दोघांची नावे घालून गाणे म्हटले तेव्हा अर्थ न कळताही दोघांना हसू आले. मग एकदम काही आठवल्यासारखे करून म्हटले, ‘‘लग्न जवळ आले म्हणजे मला आमंत्रण नाही!’’ मग मंगलने ‘‘पंडितजी, तिथे सर्व सामिष, मत्स्य वगैरे खाऊन भ्रष्टाकार करणार, म्हणून आम्ही तुम्हाला त्यात गोवले नाही,’’ अशी त्यांची समजूत घातली.

‘‘तुमच्या दृष्टीनं तुमचा सर्वात संस्मरणीय कार्यक्रम कोणता?’’ असे मी एकदा विचारल्यावर पंडितजींनी लगेच ‘‘मी सुप्रसिद्ध योग-गुरू जे. कृष्णमूर्ती, ह्यांच्या बंगलोर येथील आश्रमात गायलो तो,’’ असे उत्तर दिले. १९८० साली कृष्णमूर्तींच्या शिष्यांनी त्यांना बोलावले होते, पण त्याचबरोबर हेही सांगितले होते, की ‘‘ते फक्त एक तास ऐकतात व मग फिरायला निघून जातात; पण तुम्ही मात्र आम्ही सांगू तोपर्यंत गायलं पाहिजे.’’ पंडितजी तयार झाले. पेटीच्या साथीला आप्पा जळगावकर होते. मैफिलीच्या सुरुवातीला कृष्णमूर्ती मांडी घालून अगदी स्टेजजवळ बसले. जसराजजींनी ‘भीमपलास’ रागाने सुरुवात करून तो एक तास

> संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा एकदा मला म्हणाले, ‘‘पंडित जसराजजी आपल्या शिष्यांना जेवढं उत्तेजन देतात व ‘प्रमोट’ करतात, तेवढं कुणीही करत नाही.’’ मी ह्या उक्तीचा अनुभव घेतला आहे. संजीव अभ्यंकर नुकताच पुढे येत होता तेव्हाची गोष्ट. मी पंडितजींना एकदा म्हणालो, ‘‘संजीव तुमच्यासारखा गातो म्हणजे तो तुमची कॉपी करतो.’’ त्यावर पंडितजी उसळून म्हणाले, ‘‘ह्या वयात संजीव माझ्यासारखा गातो; आणखी पाच वर्षांनी तो जसराजला खाऊन टाकेल!’’



छान झाला असे ऐकले. मला आता वयोमानाप्रमाणे कार्यक्रमास जाणं झेपत नाही.'' लगेच जसराजजींनी, ''आजी, तुम्ही काळजी करू नका, मी तुम्हाला आताच ऐकवतो,'' असे म्हणून तंबोरा काढला व गायला बसले. संयोजकांना अर्थातच त्यांची फ्लाइट पुढे ढकलावी लागली. माझा सानफ्रान्सिस्कोचा मित्र अझीझ ऐमाक ह्याने त्यांचे अनेक कार्यक्रम करून त्यांचे आतिथ्यही केले होते. एकदा पंडितजी तेथे गेले असता तो दिसला नाही. कार्यक्रमानंतर त्यांनी विचारणा करता कळले की त्याच्या हृदयावर शस्त्रक्रिया झाली असून तो घरी आराम करत आहे. लगेच पंडितजींनी त्याला, ''मी उद्या सकाळी तुला भेटायला येतो'' असे कळवले. दुसऱ्या दिवशी ते तेथे गेल्यावर अझीझने त्यांना ''पंडितजी, एक भजन म्हणाल?'' असे (अजीजीने!) विचारले. त्यांनी लगेच एक नव्हे तर दोन भजने म्हटली. ''मला अनेक दिवसांत इतकं बरं वाटलं नव्हतं,'' अझीझ नंतर मला सांगत होता.

जसराजजी हजरजबाबी होते व त्यांना केव्हा काय सुचेल हे सांगता येत नसे. एका मैफिलीत एका हिंदी माणसाने 'चारुकेशी' रागाची फर्माईश करण्यासाठी 'चारूकेसी' अशी हाळी मारली. लगेच पंडितजींनी, ''चारू केसी? मधुरा जैसी'' असे उत्तर दिले! चारू ही त्यांची पत्नी मधुरा हिची बहीण व ती मधुराजींसारखीच दिसते! तसेच, ते एका डॉक्टरच्या ऑफिसमध्ये बसले असताना तीनचे ठोके पडले. लगेच जसराजांनी लतादीदींच्या 'आयेगा आनेवाले' ह्या अजरामर गाण्याची, 'खामोश है जमाना, चुपचाप है सितारे' ही आलापी सुरू केली. डॉक्टरांनी त्यांच्याकडे आश्चर्याने पाहिले. जसराजजी विजयी मुद्रेने म्हणाले, ''डॉक्टर, ते गाणं ऐकलंय? त्यात लताजींच्या आलापीआधी तीन ठोके पडतात!''

माझी पत्नी जसराजजींना भाऊ मानते. एकदा तिने त्यांना भाऊबीजेला फोन केला. ते म्हणाले, ''वा! तू अगदी वेळेवर फोन केलास. मी तानपुरा दरबारी रागाला जुळवतोय. आणखी दहा मिनिटांनी फोन कर, तुला दरबारी ऐकवतो.'' त्यांनी सांगितल्याप्रमाणे तिने फोन केला तर पंडितजींनी आम्हाला दहा-पंधरा मिनिटे 'मनोबुद्धीहंकार चित्तानिनाहं' हे श्रीमद शंकराचार्यांचे स्फूर्तिदायक पद ऐकवले.

पंडितजी रमत ते चमत्काराच्या गोष्टी सांगताना. त्यांनी पहिला चमत्कार पाहिला तो वयाच्या चौदाव्या वर्षी. त्यांचे वडीलबंधू व गुरू पं. मणिरामजी ह्यांचा अचानक आवाज गेला. अनेक डॉक्टरांची औषधे झाली पण आवाज खुलेना. शेवटी त्यांच्या एका वकील चाहत्याने त्यांना गुजरातेतील साणंद ह्या लहानशा संस्थानचे राजे महाराजा जसवंतसिंह वाघेला ह्यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला. राजेसाहेब हे संतपुरुष होते, इतकेच नव्हे तर कवी व मेवाती संगीत घराण्याचे समर्थ गायकही होते. त्यांनी मणिरामजींना सल्ला दिला, की ''आज रात्री मी

म्हटला. त्यानंतर त्यांनी अर्धा तास 'मुलतानी' म्हटला. मग योग-गुरू उठले व जसराजजींची परवानगी घेऊन फिरायला गेले. संयोजकांनी मध्यंतर जाहीर केले. मध्यंतरानंतर शिष्यांनी त्यांना भजने म्हणण्याची विनंती केली. जसराजजींनी 'गोकुलमे बाजत, कहां बधाई', 'लाल गोपाल' वगैरे भजने म्हणून त्यांना खुश केले. नंतरचे भजन म्हणताना त्यांना काय दिसले कुणास ठाऊक, अप्पांनी आपली उजवी भुवई उंचावून उजवीकडे मान हलवली. जसराजजी पाहतात तो गुरुवर्य एका खांबाला टेकून तल्लीनतेने ऐकत होते. जसराजजींनी त्यांना आदराने पुढे बोलावले. मग कृष्णमूर्तींनी फर्माईश करायची ('माता कालिका' व सूरदासजींचे भजन) व पंडितजींनी ती पुरी करायची असे सुरू झाले. ते झाल्यावर कृष्णमूर्ती म्हणाले, ''माझं हृदय आनंदानं भरून गेलं आहे. बस्स, आता शेवटची भैरवी.'' कार्यक्रम संपल्यावर एरवी अलिप्त राहणाऱ्या ८६ वर्षांच्या गुरुवर्यांनी जसराजांना मिठी मारली व म्हणाले, ''आपण ह्याआधी भेटायला हवं होत.'' जसराजजींच्या गाण्यातील शांतरसाने योगीराजांना जिंकले होते.

संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा एकदा मला म्हणाले, ''पंडित जसराजजी आपल्या शिष्यांना जेवढं उत्तेजन देतात व 'प्रमोट' करतात, तेवढं कुणीही करत नाही.'' मी ह्या उक्तीचा अनुभव घेतला आहे. संजीव अभ्यंकर नुकताच पुढे येत होता तेव्हाची गोष्ट (आता त्याने स्वतःची शैली घडवली आहे!). मी पंडितजींना एकदा म्हणालो, ''संजीव तुमच्यासारखा गातो म्हणजे तो तुमची कॉपी करतो.'' त्यावर पंडितजी उसळून म्हणाले, ''ह्या वयात संजीव माझ्यासारखा गातो; आणखी पाच वर्षांनी तो जसराजला खाऊन टाकेल!'' (मी जीभ चावली!) पंडितजींच्या शिफारशीवरून आम्ही त्यांच्या तृप्ती मुखर्जी, हेमांग मेहता व मुकेश देसाई ह्या शिष्यांचे कार्यक्रम केले आहेत.

ज्या व्यक्तीला आपले गायन ऐकायचे असेल त्याला ते आवर्जून ऐकवत. एकदा ते नागपूरला कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम संपल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी ते विमानतळावर जायला निघाले तर यजमानांची आजी म्हणाली, ''तुमचा कार्यक्रम

दुर्गादेवीच्या गाभाऱ्यात बसून पूजा करीन; तुम्ही बाहेर बसून फक्त दुर्गा व श्रीकृष्णाची स्तुतीपर कवने गा.'' मणिरामजींनी मध्यरात्री गायला सुरुवात केली. हळूहळू आवाज सुटत गेला व सकाळी सहा वाजेपर्यंत पूर्वीसारखा सुरेल झाला.

असे चमत्कार पंडितजी सांगू लागले की तासनतास निघून जात. खरे सांगायचे म्हणजे आमच्या दृष्टीने ते स्वतःच एक चमत्कार होते!

आमच्या ऑटवातील घराच्या दिवाणखान्यात डावीकडून उजवीकडे जाणारा एक जिना होता. तो चढून वर गेल्यावर खालील दिवाणखान्यात बघता येईल अशी एक लांबलचक गॅलरी होती. दिवाणखान्याचे छत उंच असल्यामुळे ॲकॉस्टिक असे होते की एखाद्या हॉलसारखा आवाज घुमे. पंडितजी आमच्या घरी असले की सकाळी सहा वाजता उठून तंबोरा घेऊन त्या गॅलरीत जात व सकाळचा एखादा राग किंवा भजन आळवत. ''तुमच्या वास्तूमध्ये संगीताला पोषक असं वातावरण आहे,'' हे ते आम्हालाच नव्हे तर इतरांनाही सांगत. एकदा त्यांनी त्यांचा शिष्य हेमांग मेहता ह्याला आमच्या घरी राहून आठवडाभर रियाज करण्याची आज्ञा केली. मंगल व मी त्याची सरबराई करून पंडितजींची आज्ञा पाळली.

पंडितजी नम्र होते, पण आपल्या कलेबद्दल त्यांना रास्त अभिमान होता. एकदा आम्ही त्यांचे गायन व साथीला उस्ताद झाकीर हुसेन असा कार्यक्रम ठेवला. पण काही कारणाने झाकीरला येणे जमत नव्हते. पंडितजींनी मग स्वपन चौधरी हा तितकाच समर्थ तबलावादक निवडला. पण आमच्यापैकी एकाने आम्हाला न सांगता पंडितजींना, ''झाकीर नाही, म्हणून आम्ही तुम्हाला थोडी कमी बिदागी देऊ'' असा फोन केला. पंडितजी रागावले. म्हणाले, ''आपल्या संगीतात गायक हा मुख्य कलाकार असतो; तुम्हाला बिदागी कमी द्यावी असं वाटत असेल तर मी येत नाही.'' मग आम्ही त्यांची माफी मागून त्यांना मिनतवारीने समजावले तेव्हा ते आले.

पंडितजींचा शेवटचा कार्यक्रम आम्ही जून २०१० मध्ये टोरांटोला ऐकला. तेथील जसराज स्कूल ऑफ म्युझिकचे मुख्य संचालक व गुरू डॉ. अमित आर्या ह्यांनी तो त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त आयोजित केला होता. आम्ही तेव्हा ऑटवाला राहत असूनही खास गेलो होतो. मंचकावर पंडितजी, त्यांच्या साथीला तृप्ती मुखर्जी, व तबल्याला समीर चक्रवर्ती हे पाहून माझे मन भरून आले, कारण हे तिघेही आमच्या घरी राहून गेलेले व अगदी घरच्यासारखे झाले होते.

जसराजजींनी 'जोग' रागात 'पिया घर आवे ना, कासे कहू' ह्या चीजेने सुरुवात केली. त्या वयातही तीस वर्षांपूर्वी ऐकलेला तोच गोड आवाज व तीच आवाजाची फिरत! तारसप्तकात तर तो इतका गोड होई की हृदयाला जाऊन भिडे. द्रुत ख्यालात त्यांनी, 'चलो सखी सौतन के घर जईये, मान घटे तो क्या घट जईये' ही चीज घेतली. त्यातील 'ये जोबन अंजुरीका पानी, समो गये पछते' ह्या ओळीतील 'अंजुरीऽऽऽ' हा सूर त्यांनी इतका दीर्घकाल धरून ठेवला की श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. एक तास, दहा मिनिटे 'जोग'चे सौंदर्य दाखवल्यावर त्यांनी हलकाफुलका 'जयजयवंती' राग घेतला. त्यात त्यांनी 'चंद्रबदन राधिका' ह्या सुंदर कवनावर प्रेमपूर्वक आलापी केली. त्यातील राधिकेच्या सौंदर्याचे व दागिन्यांचे शृंगारयुक्त वर्णन करून ती प्रेमिका डोळ्यांसमोर तंतोतंत उभी केली. त्याला जोडून 'राम सुमिर, राम, सुमिर,' ही हंसध्वनी रागातील धून लावली. त्यात सर्व श्रोत्यांनी त्यांना साथ दिली. त्यानंतर जसराजजींनी 'माता कालिका', 'गोकुलमे बाजत कहां बधाई' व 'गोविंद दामोदर माधवेती' ही भक्तिगीते गाऊन कार्यक्रम संपवला.

कार्यक्रम संपल्यावर आम्ही जसराजजींना भेटलो. आम्हाला पाहून त्यांना आश्चर्य वाटले. जवळ उभ्या असलेल्या अमित आर्यांशी आमची ओळख करून दिली व ''तिसऱ्या मजल्यावर जेवण आहे, तिथे या,'' असे म्हणाले. आम्ही वर गेलो व लॉबीतच मित्रांशी गप्पा मारत उभे राहिलो. जरा वेळाने अमितजी आले व ''जसराजजी पलीकडच्या खोलीत आराम करत आहेत व तुम्हाला बोलावताहेत,'' असे सांगितले. आम्ही गेलो. नेहमीप्रमाणे थट्टा-मस्करी झाल्यावर ते म्हणाले, ''रमेशजी, तुम्ही माझ्यावर एक लेख लिहिल्याला वीस वर्षे झाली. त्यानंतर मी अनेक गोष्टी केल्या, की ज्या तुम्हाला माहीत आहेत. आता त्याबद्दल सांगणारा लेख लिहा.'' स्वतःची टिमकी म्हणून नव्हे तर मी त्यांच्या जवळचा म्हणून ते हे मला सांगत होते. मला कल्पना आवडली. पण जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे त्यांच्यावर मोठमोठे ग्रंथ प्रकाशित होऊ लागले. 'त्यांच्यावर आपण काय धाड मारणार' असे वाटून मी तो विचार सोडून दिला. त्यानंतर त्यांची दहा वर्षे भेट झाली नाही तरी आम्हाला त्यांचे अस्तित्व जाणवे.

आणि मग तो १७ ऑगस्ट २०२०चा दिवस उजाडला. आमच्या व्हॉट्सॲप ग्रुपमधील एकाने पंडितजी गेल्याची बातमी लिहिली. माझे सर्वांग बधिर झाले. सगळ्या आठवणी मनात येऊन मन विकल झाले. आमच्या मुलांना फोनवर बातमी सांगितली तर तेही गप्प राहिले. फक्त 'त्यांचे वय किती होते' हे विचारले. मग प्रत्येक काळ्या घनात रुपेरी कडा पाहणारे माझे मन म्हणाले, तू किती भाग्यवान आहेस. त्यांनी तुला तुझ्या घरी त्यांचे स्वर्गीय संगीत ऐकवले. तुझ्या मंडळाने त्यांचे सहा-सात कार्यक्रम केले व प्रत्येक वेळी ते तुझ्याकडे उतरले. इतकेच नव्हे तर ब्रेकफास्ट करताना तू ज्या रागाची फर्माईश करी, ते तो संध्याकाळच्या कार्यक्रमात गात असत. आणि त्यांनी तुझ्या कुटुंबाला किती भरभरून प्रेम दिले! आठव, मंगल आणि जेमिनी भारतात गेले तेव्हा तुझ्या पुतणीच्या अपार्टमेंटमध्ये सुधारणा चालू होत्या; पंडितजींना हे कळताच त्यांनी आपले रिकामे असलेले अपार्टमेंट त्यांना दोन आठवडे वापरायला दिले...

माझे अंतःकरण त्यांच्या अस्तित्वाने प्रेमाने भरून गेले. मी उठलो व त्यांची, माझी आवडती, शंकरा रागाची टेप लावली...

विभूषितानंगरिपूत्तमांगा।
सद्यःकृतानेकजनार्तिभंगा।
मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहम्।।

जगन्नाथ पंडितांचे शब्द व पंडितजींचा सूर! आणि मी त्या शब्दसुरांच्या समाधीत पार बुडालो.

(संदर्भ : रमेश वाघमारे, हिंदुस्थानी रागदारी संगीतातील सुवर्णयुगाचे मानकरी, ग्रंथाली, नोव्हेंबर, २०१८)

**– रमेश वाघमारे**
wramesh991@gmail.com



**कौशल इनामदार**

# एका सिंदबादची कहाणी

काही वर्षांपूर्वी मी माणिक वर्मांच्या घरी गेलो होतो. शांताबाई शेळकेंच्या कवितांना स्वरबद्ध करून 'शुभ्र कळ्या मूठभर' नावाचा एक अल्बम मी केला होता आणि माझी अशी तीव्र इच्छा होती की त्याचं प्रकाशन माणिक वर्मांच्या हस्ते व्हावं. माणिकबाईंनी अतिशय आस्थेनं त्या अल्बममधली सर्व गाणी ऐकली आणि अतिशय प्रेमानं येण्याचं कबूल केलं.

''गोड आहेत चाली. त्या म्हणाल्या. तुझ्या घरामध्ये संगीत आहे का?'' त्यांनी प्रश्न केला.

''माझे आजोबा व्हायोलिन वाजवायचे.'' मी उत्तर दिलं, ''पुण्यात होते.''

''आमच्या काळात पुण्यात एक व्हायोलिनवादक होते. क्लासिकल आणि लाइट असं दोन्ही छान वाजवायचे. अतिशय गोड हात होता. शंकरराव बिनीवाले त्यांचं नाव.''

माझा ऊर अभिमानानं भरून आला. माणिकबाईंनी नेमकं हेच नाव घ्यावं हा अनोखा योगायोग होता.

''मी त्यांचाच नातू.'' मी म्हणालो.

> मला अप्पासाहेबांची ही सगळी रूपं आठवतात. मितभाषी, अबोल, खूप रंगवून अलिबाबा-सिंदबादच्या गोष्टी सांगणारे, रात्रभर म्युट लावून व्हायोलिन वाजवणारे. मी त्यांचं व्हायोलिन झोपेतच खूप ऐकलं आहे. त्यामुळे त्यांचे सूर माझ्या अंतर्मनात भिनले आहेत. सकाळी सकाळी जाग यायची तेव्हा अप्पासाहेबांची भैरवी चाललेली असायची. आजही कधीतरी अचानक पहाटे जाग येते आणि अप्पासाहेबांच्या व्हायोलिनचे सूर मला ऐकू येतात. अगदी ते समोर बसून वाजवत आहेत असा भास होतो. ते सूर मनात रेंगाळत राहतात आणि मीही सिंदबादसारखा सात सुरांच्या सफरीवर निघतो!

माझे आजोबा - शंकरराव बिनीवाले (आम्ही त्यांना अप्पासाहेब म्हणत असू) हे काळाच्या पडद्याआड जाऊन आता चौदा वर्षं झाली. आणि चौदा वर्षांपूर्वीच मी संगीतक्षेत्रात पहिलं पाऊल टाकलं. मी दिलेल्या पहिल्या चालीच्या रूपानं. माझ्या संगीतामधल्या वाटचालीमध्ये प्रत्येक क्षणाला मला त्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. आज मला राहून राहून वाटतं की एक संगीतकार म्हणून त्यांचा मला सहवास आणखी जास्त काळ लाभला असता तर मी अधिक श्रीमंत झालो असतो.

अप्पासाहेब अतिशय अबोल होते. स्वत:बद्दल तर ते क्वचितच बोलायचे. हेच एक कारण आहे की आजही मला ते एका जिग्सॉ पझलसारखे उलगडत जाताहेत. अगदी आजही त्यांचा एक जुना फोटो, किंवा त्यांच्याबद्दल जुनं वर्तमानपत्रामधलं एखादं कात्रण त्यांच्याबद्दल काहीतरी नवीन सांगून जातं. आणि त्यांच्याबद्दल प्रत्येक नवीन कळणारी गोष्ट अचंबित करणारी असते.

त्यांच्याबद्दल माझ्या सगळ्या आठवणी त्यांच्या पुण्यातल्या केसरीवाड्याच्या समोरच्या २, नारायणपेठ या निवासस्थानाशी जोडल्या आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीत मी आणि माझा भाऊ, विशाल, आजोळी राहायला जात असू. वाड्याच्या दरवाजातून आत शिरताच आम्हाला काकी (म्हणजे आमची आजी) आणि अप्पासाहेब दारात आमची वाट पाहताना दिसले नाहीत, असं माझ्यातरी काही स्मरणात नाही. आम्ही दिसताच काकी लगबगीनं घराच्या दारात लावलेल्या अळूची पानं काढायची आणि अळुवड्या करायला घ्यायची. अप्पासाहेब 'आलात का?' असं



**शंकरराव बिनीवाले**

म्हणत स्वागत करायचे.

अप्पासाहेब अबोल असले तरी नातवंडांना गोष्ट सांगताना त्यांना आपल्या या स्वभावाचा विसर पडत असावा. अरेबियन नाईट्समधल्या कथा तर ते इतके रंगवून सांगत की आमच्या डोळ्यासमोर ते सगळं वातावरण उभं होत असे. त्यांची एक लाडकी कथा म्हणजे 'सिंदबादच्या सात सफरी'. आम्ही जितके ऐकताना रंगून जायचो तितकेच ते सांगताना त्यात हरवून जायचे. मोठा झाल्यावर मी सिंदबादची कथा नव्यानं पुस्तकात वाचली, पण ती मजा कधीच आली नाही.

रात्री गोष्ट ऐकता ऐकता आम्हाला गुंगी यायची. अप्पासाहेब मात्र रात्री झोपत नसत. त्यांच्या तक्क्याच्या वर ४-५ जर्मन व्हायोलिन लावून ठेवली असायची आणि एक त्यांचं लाडकं व्हायोलिन त्यांच्या शेजारी असायचं. आम्ही अंथरुणात शिरलो की ते आपल्या व्हायोलिनच्या ब्रिजला 'म्युट' लावत असत, ज्यानं व्हायोलिनचा आवाज अगदी मंद होऊन जाई आणि मग रात्रभर ते रियाज करत. त्यांच्या व्हायोलिनचे सूर आम्हाला अलगद झोपेच्या कुशीत नेऊन ठेवत.

आता इतक्या वर्षांनी मला जाणीव होतेय की अप्पासाहेबांच्या गोष्टीतला सिंदबाद हे ते स्वत:च होते.

१९३३.

'कॉन्टे रोस्सो' नावाचं एक जहाज ऑस्ट्रेलियाहून इंग्लंडच्या दिशेनं प्रवास करत होतं. मुंबई बंदरावर हे जहाज लागलं आणि त्या जहाजावर २४ वर्षांचा एक तरुण चढला. त्याच्या हातामध्ये एक व्हायोलिनची केस होती. या तरुणाची इच्छा होती, की त्याच्या हातामधलं वाद्य जगाच्या ज्या कोपऱ्यातून आलंय तिथे जाऊन त्याच्याबद्दलचं ज्ञान मिळवावं, तिथेच जाऊन ते वाद्य शिकावं. या तरुणाचं नाव होतं – शंकर गोपाळ बिनीवाले.

अप्पासाहेबांचा जन्म पुण्यातल्या सरदार बिनीवालेंच्या घराण्यातला. विसाजी कृष्ण बिनीवालेंच्या नवव्या पिढीपर्यंत पेशवेकालीन आब संपला होता. वडील लवकर गेल्यानंतर थोरले बंधू बाबासाहेब यांच्या सल्ल्यानं घरातल्याच सराफीचा व्यवसाय अप्पासाहेब पाहायला लागले. मात्र त्यात त्यांचं मन रमेना. एके दिवशी अप्पासाहेबांना घरातल्या अडगळीत एक व्हायोलिन सापडलं. काही वर्षांपूर्वी बाबासाहेबांनीच ते खरेदी केलं होतं. अप्पासाहेबांची बोटं त्यावरून फिरायला लागली. घरातल्या मोठ्यांचा धाक वाटण्याचा तो काळ. कुणाला कळू नये म्हणून अप्पासाहेब वाड्यातल्या त्यांच्या वरच्या खोलीत व्हायोलिन वाजवत बसायचे. कुणीही न शिकवता हळूहळू आपल्याच बुद्धीनं ते वाद्य आत्मसात करू लागले. मग एके दिवशी बाबासाहेबांनी त्यांचं व्हायोलिन ऐकलं आणि ते चकित झाले. कुणीही न शिकवता अप्पासाहेब उत्तमच व्हायोलिन वाजवू लागले होते. बाबासाहेब त्यांना गजाननबुवा जोशींकडे घेऊन गेले.

गजाननबुवांनी अप्पासाहेबांचं व्हायोलिन ऐकलं आणि इतके प्रभावित झाले, की म्हणाले, ''तुम्ही माझ्याबरोबर भारत गायन समाजात शिकवायला चला.''

पुढे गजाननबुवांनी अप्पासाहेबांना औंधला बोलावून घेतले. औंधचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे कीर्तनकार होते. अप्पासाहेब त्यांना साथ करू लागले. सहा महिने अप्पासाहेबांनी औंधमध्ये काढल्यानंतर ते पुण्यात परतले.

पुण्यामध्ये कृष्णा थिएटरमध्ये त्या काळात मूकपट लागत असत. तिथे अप्पासाहेब या मूकपटांना पार्श्वसंगीत देऊ लागले. हळुहळू त्यांची व्हायोलिनवादक म्हणून ख्याती पसरू लागली. काही लोक अप्पासाहेबांचं वादन ऐकण्याकरता एक चित्रपट २-३ वेळा पाहू लागले.

मग प्रभात फिल्म कंपनीनं 'अयोध्येचा राजा' हा बोलपट बनवायचं ठरवलं. संगीतदिग्दर्शनाची जबाबदारी गोविंदराव टेंबे यांच्यावर सोपवली. गोविंदरावांनी अप्पासाहेबांना बोलावून घेतलं. अयोध्येचा राजा' या चित्रपटात जे व्हायोलिन आपल्याला ऐकू येतं ते अप्पासाहेबांनी वाजवलं आहे.

परंतु अप्पासाहेबांमधला सिंदबाद त्यांना स्वस्थ बसू देईना. पाश्चात्त्य देशांमध्ये भारतीय संगीताचा प्रसार करावा आणि आपण पाश्चात्त्य संगीत आत्मसात करावं अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनात मूळ धरून राहिली. प्रभातच्या नोकरीमधून आणि काही कार्यक्रमांतून साठलेली जी काही जमापुंजी होती, त्यामधून त्यांनी 'कॉन्टे रोस्सो' जहाजाचं तिकीट काढलं.

अप्पासाहेब जहाजामध्ये बसले तेव्हा मनात हेतू पक्का असला तरी युरोपमध्ये उतरल्यावर आपण नक्की कुठे जाणार आहोत हे पक्कं नव्हतं. योगायोग असा, की ऑस्ट्रेलियाचा दौरा आटपून मायदेशी परत निघालेला एक इटालियन व्हायोलिनवादक, फेदेदेन्ये मारियानो, याच जहाजावर होता. एके दिवशी अप्पासाहेब आपल्या केबिनमध्ये रियाज करत असताना त्यानं ऐकलं आणि त्यानं त्यांची चौकशी केली. त्यांच्या

वादनानं तो चांगलाच प्रभावित झाला होता. तो म्हणाला – ''तुम्ही माझ्याबरोबर इटलीला चला. माझ्या घरीच राहा. तुम्ही मला भारतीय संगीत शिकवा, मी तुम्हाला पाश्चात्त्य संगीत शिकवतो.''

मारियानो इटली आणि फ्रान्सच्या सीमेवर असलेल्या व्हेन्तेमिलिया नावाच्या एका छोट्या गावात राहायचा. तो अप्पासाहेबांना आपल्यासोबत तिथे घेऊन गेला. सहा महिने अप्पासाहेब इटलीमध्ये राहिले आणि मारियानोकडे त्यांनी पाश्चात्त्य संगीताचे धडे घेतले. त्याच दरम्यान ते युरोपात भारतीय संगीताचे कार्यक्रम करू लागले. त्यांचं नाव आणि कीर्ती काही काळातच पसरली आणि मुसोलिनी–इटलीचा हुकूमशहा – यानं अप्पासाहेबांना नेपल्सला आपल्या राजवाड्यात भेटीसाठी बोलावलं. त्या काळात मुसोलिनीची भेट म्हणजे जास्तीत जास्त ५–१० मिनिटं. पण अप्पासाहेबांशी चर्चेत मुसोलिनी चांगलाच रंगला आणि त्यांची भेट पाऊण तास रंगली. या भेटीत अप्पासाहेबांनी मुसोलिनीला नाट्यसंगीत आणि रागसंगीत असं दोन्ही वाजवून दाखवलं!

तिथून पुढे अप्पासाहेबांनी युरोपभरात अनेक कार्यक्रम केले. इटलीमध्ये, फ्रान्सच्या कॅसिनो द पारी या प्रतिष्ठित थिएटरमध्ये, हॉलन्डमध्ये, आणि इंग्लंडमध्ये. इंग्लंडमध्ये बी.बी.सी.वर सोलो व्हायोलिनचा कार्यक्रम करणारे अप्पासाहेब पहिले भारतीय कलावंत होते. लन्डन टाइम्स, संडे रेफ्री, अशा अनेक ब्रिटिश वर्तमानपत्रांतून अप्पासाहेबांबद्दल छापून येऊ लागलं. एका डच वर्तमानपत्रानं तर अप्पासाहेबांना 'ब्रिटिश–इंडियाचा येहुदी मेन्यूहिन' म्हणून संबोधलंय!

युरोपहून परतल्यानंतर या मितभाषी कलाकारानं आपल्या दौऱ्याच्या गौरवगाथा कुणाजवळही सांगितल्या नाहीत. आम्हाला ही त्यांच्याबद्दलच्या बऱ्याच गोष्टी खूप पुढे (काही गोष्टी त्यांच्या मृत्यूनंतर) समजल्या. परतल्यावर अप्पासाहेबांनी भालजी पेंढारकर आणि मो.ग. रांगणेकर यांसारख्या दिग्दर्शकांच्या संस्थांमधून नोकरी केली. भालजी पेंढरकरांच्या 'सावित्री' या चित्रपटामध्ये व्हायोलिन हे अप्पासाहेबांनी वाजवलं आहे. रांगणेकरांच्या नाट्यनिकेतन या संस्थेतही त्यांनी 'राधामाई', 'कुलवधू' यांसारख्या नाटकांमध्ये व्हायोलिनची साथ केली. याखेरीज विनायकबुवा पटवर्धन, पंडितराव नगरकर, जगन्नाथबुवा पंढरपूरकर, सुलोचना पालकर, शांता आपटे, ज्योत्स्नाबाई भोळे, शाहू मोडक अशा गायकांना साथ करत असत. याच काळात त्यांचे स्वतंत्र कार्यक्रमही होऊ लागले होते. काही काळ त्यांनी मुंबईत ऑल इंडिया रेडिओ आणि 'यंग इंडिया' या ग्रामोफोन कंपनीतही नोकरी केली.

अखेर त्यांनी सगळ्या नोकऱ्यांना रामराम ठोकला आणि पुण्याला आपल्या राहत्या घरात व्हायोलिनवादनाचा क्लास सुरू केला. कित्येक वेळा क्लासनंतर काही विद्यार्थी मागे राहून काकीशी (माझ्या आजीशी) गप्पा मारत बसायचे. जितके अप्पासाहेब अबोल तितकीच काकी बोलघेवडी होती. तरीही अप्पासाहेबांशी गप्पा मारायला येणाऱ्यांची संख्या काही कमी नव्हती. भा.द. खेर (काकीचे बंधू) यांच्यासारख्या पत्रकार–साहित्यिकांपासून प्रताप मुळीकांसारख्या चित्रकारांपर्यंत अनेक लोक अप्पासाहेबांच्या मित्रपरिवारात होते, हे मी प्रत्यक्ष अनुभवलं आहे.

अप्पासाहेबांची विनोदबुद्धीही अतिशय तल्लख होती. क्वचितच कधी ते जुन्या गोष्टी सांगण्याच्या मूडमध्ये यायचे तेव्हा आम्हाला या विनोदबुद्धीची एक झलक मिळायची. 'सावित्री' चित्रपटाच्या चित्रीकरणाचं त्यांनी केलेलं वर्णन आठवलं की अजून मला हसू येतं. त्याकाळात प्लेबॅक पद्धत नव्हती. नटच गायचे आणि वादकही कॅमेऱ्याच्या मागे, किंवा सेटवरच्या झाडाझुडपात लपून आपआपली वाद्यं वाजवायचे. तसे वादकही इनमिन तीन! तबला, ऑर्गन आणि व्हायोलिन! अप्पासाहेब सावित्रीची कथा सांगताना म्हणायचे –

''मग यम सत्यवानाला त्याच्याबरोबर घेऊन जायचा. म्हणजे यम त्याच्या मागे सत्यवान, सत्यवानामागे सावित्री, सावित्रीमागे व्हायोलिन, व्हायोलिनमागे तबला. तबल्यामागे ऑर्गन अशी ती यात्रा निघे आणि त्याच्या तालमी, टेक्स् आणि रिटेक्स्!''

अप्पासाहेब कलाकार म्हणून जितके श्रेष्ठ होते, तितकेच अवलिया होते. लंडनमध्ये असताना प्रयोग म्हणून एक रेकॉर्ड त्यांनी केली होती. त्या रेकॉर्डमध्ये एका बाजूला त्यांच्या व्हायोलिनवादनाचा कार्यक्रम तर दुसऱ्या बाजूला त्यांनी त्यांच्या आईला डिक्टेट केलेलं एक पत्र होतं! पण भारतात आल्यानंतर – माझी अजून साधना व्हायची आहे असं कारण सांगून आपलं एकही ध्वनिमुद्रण होऊ दिलं नाही.

काकी–अप्पासाहेबांचं लग्न झालं तेव्हा काकी पंधरा वर्षांची होती. अप्पासाहेबांनी आधी काय केलं असेल, तर तिला तबल्यावर सगळे ठेके धरायला शिकवलं! त्या काळात असं करणं म्हणजे मोठं धाडस आणि बंडखोरीच होती!

काकी आणि अप्पासाहेबांचा संसार हा अप्पासाहेबांसारखाच अबोल होता. कधी कधी दिवसभरात ते एकमेकांशी एखादं वाक्यच बोलायचे! पुढे आम्हाला त्यांच्या नि:शब्द संवादातलं प्रेम कळायला लागलं.

१९९४ साली आषाढी एकादशीला काकी गेली आणि त्यानंतर मात्र अप्पासाहेब खचले. जीवनात रस उरला नाही. काही वर्षांपूर्वी फेशियल पॅरलिसिसच्या झटक्यामुळे त्यांचं रात्रभराचं व्हायोलिनवादन बंद झालं होतं. पण संगीत हा त्यांच्या रोजच्या आयुष्यातला भाग राहिलाच होता. खूप संगीत ऐकायचे. पण काकी गेल्यानंतर संगीतही त्यांना नकोसं व्हायचं. काकीचं वर्षश्राद्ध झालं आणि अप्पासाहेबही आठवड्याभरातच गेले.

मला अप्पासाहेबांची ही सगळी रूपं आठवतात. मी त्यांचं व्हायोलिन झोपेतच खूप ऐकलं आहे. त्यामुळे त्यांचे सूर माझ्या अंतर्मनात भिनले आहेत. सकाळी सकाळी जाग यायची तेव्हा अप्पासाहेबांची भैरवी चाललेली असायची. आजही कधीतरी अचानक पहाटे जाग येते आणि अप्पासाहेबांच्या व्हायोलिनचे सूर मला ऐकू येतात. अगदी ते समोर बसून वाजवत आहेत असा भास होतो. ते सूर मनात रेंगाळत राहतात आणि मीही सिंदबादसारखा सात सुरांच्या सफरीवर निघतो!

**– कौशल श्री. इनामदार**
भ्रमणध्वनी :९८२०४५४५०५
ksinamdar@gmail.com



**प्रदीप निफाडकर**

# राहत, चाहत आणि अदावत...

उर्दूचे सुप्रसिद्ध शायर राहत इंदोरी यांचा ११ ऑगस्ट २०२० रोजी कोरोनाने मृत्यू झाला. साधारणतः असा मृत्यू झाला की सहानुभूतीची एक लाट पसरते, पण दुर्दैव हे की यावेळी मात्र एकच गहजब माजला. सोशल मीडिया ही रणभूमी समजून त्यांच्या शायरीचे निस्सीम चाहते आणि त्यांच्याशी अदावत (वैर) असलेले सारेच पोस्ट टाकून टाकून लढू लागले. हा माणूस उद्धट होता, खरोख़रचे कवित्व त्याच्याकडे होते कुठे?, मोठ्यांचा अपमान करणारा हा दारुडा होता, लग्नाच्या बायकोला सोडून दुसरे लग्न करणारा चरित्रहीन होता, वगैरे वगैरे खूपच अगदी खालच्या पातळीवरच्या पोस्ट फिरू लागल्या. सोशल मीडिया प्रभावी झाल्यानंतर जाणारा हा काही पहिला शायर नव्हता. मग असे का झाले? तर लोकांना लॉकडाऊनमुळे बराच वेळ होता हेही सत्य त्यामागे होते. मग खरेच राहत काय होते, हे विचारणारे शायरीच्या रसिकांचे प्रश्न मला येऊ लागले. मी काही त्यांना व्हाईट वॉश देणार नाही. कारण अशा शायरांना त्याची गरज नसते. मी मला ते का आवडत नव्हते व का आवडू लागले या दोन्ही बाजू मांडतो.

> राहतजींना तुफैलजींनी अदबी (साहित्यिक) शेर मुशायऱ्यात का वाचत नाहीत असे विचारले. राहतभाई गप्प बसले. मुशायरा सुरू झाला. त्यांनी दोन-तीन शेर ऐकवले, पण त्याला दादच मिळेना. मग त्यांनी प्रेक्षकांत बसलेल्या तुफैलजींना मंचावरूनच सांगितले, 'बघा तुफैलजी, तुम्ही म्हणता ना मी अदबी शेर का ऐकवत नाही. कळलं?' आता मुशायरा कसा उठतो बघा. आणि त्यांनी मुशायऱ्याचे शेर ऐकवायला सुरुवात केली, तर दाद आवरता आवरेना अशी आली.

मला राहतजी आवडत नव्हते. कारण त्यांचे ते ओरडून गझला म्हणणे, 'खुदा' शब्द उच्चारून चार-दोन मिनिटे आकाशाकडे बघणे, आवडतच नव्हते. त्यातून त्यांनी अंजुम रहबर या उत्तम कवयित्री बायकोला सोडले तेव्हा तर ते माझ्या मनातूनच उतरले. पण, माझ्या मदतीला धावून आले निदा फाजली. त्यांचा एक शेर आहे-

*हर आदमी में होते हैं दस बीस आदमी*
*जिस को भी देखना हो कई बार देखना*

मग मात्र मी दुरूनच राहतजींना पुस्तकातून वाचू लागलो. हळूहळू त्यांची माहिती काढू लागलो. तेव्हा माझ्या मनातले संदेह दूर होऊ लागले. राहतजी कोणत्या परिस्थितीतून आले हे कळले आणि त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर होऊ लागले. वास्तविक शायरी असलेल्या घराण्यात ते काही जन्मले नव्हते. १ जानेवारी १९५०रोजी त्यांचा जन्म गरीब मुस्लीम कुटुंबात इंदूर येथे झाला. त्यांचे खरे नाव कामिल होते. पुढे ते बदलून राहतउल्लाह केले गेले. त्याला काही खास कारण नाही. म्हणजे त्यांचे मूळ नाव राहतउल्लाह रिफअत कुरैशी असे आहे. त्यांचे वडील टेम्पो चालवत. पाच भावंडांमध्ये राहत हे चौथे. लहानपणापासून ते लाजाळू आणि मोठ्यांचा आदर करणारे होते. घरात कुणाशी चर्चा करत नसत. त्यांची मावशी सांगते, राहतला शिकवायला जे मास्टर गणपत येत त्यांच्यासमोर आदर राखून राहत कधी बोलतच नसत. राहत लहानपणी देवासला आजोळी शिकायला गेले तेव्हाची एक घटना आहे. ते एकदा शाळेत मल्लखांब खेळताना पडले. त्यांच्या खांद्याचे हाड तुटले. घरी कुणाला काही

**राहत इंदोरी यांचे काही शेर –**

*मैंने अपनी ख़ुश्क आँखों से लहू छलका दिया*
*इक समुंदर कह रहा था मुझ को पानी चाहिए*
(आपल्या कोरड्या डोळ्यांनी मी इथे रक्तशिंपडले. तेव्हा एक समुद्र म्हणत होता, मला तहान लागली आहे, पाणी द्या.)

*रोज़ पत्थर की हिमायत में ग़ज़ल लिखते हैं*
*रोज़ शीशों से कोई काम निकल पड़ता है*
(रोज दगडांच्या मदतीसाठी आम्ही गझल लिहितो. वाईट हे, की रोज काही ना काही काम काचेकडे निघतेच.)

*कॉलेज के सब बच्चे चुप हैं काग़ज़ की इक नाव लिए*
*चारों तरफ़ दरिया की सूरत फैली हुई बेकारी है*
(एक कागदाची नाव, प्रमाणपत्राची नाव, घेऊन महाविद्यालयातील सगळी मुले गप्प आहेत. चहूबाजूला बेरोजगारी समुद्रासारखी पसरली आहे.)

*उस की याद आई है साँसो ज़रा आहिस्ता चलो*
*धड़कनों से भी इबादत में ख़लल पड़ता है*
(तिची आठवण आली आहे, श्वासांनो जरा हळू चाला. धडधडीच्या आवाजामुळेही पूजेत व्यत्यय येतो.)

*शाख़ों से टूट जाएँ वो पत्ते नहीं हैं हम*
*आँधी से कोई कह दे कि औक़ात में रहे*
(फांदीवरून तुटून पडू, अशी पाने नाही आम्ही. वादळाला सांगा जरा जपून. आपल्या मर्यादेत राहा.)

*बहुत ग़ुरूर है दरिया को अपने होने पर*
*जो मेरी प्यास से उलझे तो धज्जियाँ उड़ जाएँ*
(समुद्राला स्वतःबद्दल खूपच गर्व आहे. माझी तहान भागवली न गेल्यामुळे त्याच्या गर्वाच्या पार चिंध्या चिंध्या उडाल्या.)

*हम से पहले भी मुसाफ़िर कई गुज़रे होंगे*
*कम से कम राह के पत्थर तो हटाते जाते*
(आमच्या आधीही अनेक प्रवासी येथून गेले असतील. कमीत कमी त्यांनी रस्त्यातील दगड तरी हटवायचे होते.)

*वो चाहता था कि कासा ख़रीद ले मेरा*
*मैं उस के ताज की क़ीमत लगा के लौट आया*
(त्याची इच्छा होती की माझे भिक्षापात्र खरेदी करावे. मी त्याच्या मुकुटाची किंमत किती विचारून आलो.)

*मैं आख़िर कौन सा मौसम तुम्हारे नाम कर देता*
*यहाँ हर एक मौसम को गुज़र जाने की जल्दी थी*
(हे प्रिये, मी एखादा ऋतू तुझ्या नावावर केला असता, पण काय करू इथे प्रत्येक ऋतूला संपण्याचीच घाई असते.)

*एक ही नद्दी के हैं ये दो किनारे दोस्तो*
*दोस्ताना ज़िंदगी से मौत से यारी रखो*
(एकाच नदीचे हे दोन किनारे आहेत. आयुष्याशी मैत्री करा. मृत्यूशी मैत्र जपा.)



दुःख सांगायचेच नाही या स्वभावाने त्यांनी गुपचूप उपचार केले. त्यावेळेपासून ते एक खांदा झुकवून बोलू लागले. पुढे मंचावर गझल पेश करताना ते तसे करत तेव्हा अनेक शायरांना वाटे, ही त्यांची शैली आहे. कित्येकांनी तर त्यांची नक्कल करून गझल म्हणायला सुरुवात केली होती.

मुशायऱ्यांच्या मंचासाठी आपण रक्त आटवले आहे असे राहत नेहमी म्हणत व त्यासाठी एक घटना कायम सांगितली जाते. एकदा असेच ते मुशायऱ्यासाठी जाफराबाद स्थानकावर उतरले. दुपार झाली होती. त्यांच्या लक्षात आले की रात्री मुशायऱ्यासाठी आपल्याकडे चांगले कपडे नाहीत. अंगावरचे कपडे मळलेले आहेत. त्यांना एक हातपंप दिसला. त्यांनी चक्क कपडे काढले व अंडरपँन्ट-बनियनवर कपडे धुवायला बसले. ना त्यांच्याजवळ बादली होती ना मग. स्वतः हातपंप मारून, पाणी काढून कपडे धुतले. ते वाळल्यावर रात्री मुशायऱ्याला गेले. असे दिवस त्यांनी काढले आहेत, हे ऐकल्यावर तर माझ्या मनात त्यांच्याबद्दलचा आदर आणखी वाढला. बरे, मुशायरे तेव्हा मानधनासाठी केले म्हणावे तर तेही नाही. कारण त्यांचा पेटिंगचा धंदा इंदूरला जोरात होता. वयाच्या दहाव्या वर्षी तर ते पेटिंग करू लागले. शिवाय त्यांना किती मानधन मिळत होते, तर कसेबसे दोनशे रुपये. त्यावेळी एवढे पैसेही कुणी शायरांना देत नव्हते. अगदी चित्रपटात गाजून आणि अप्रतिम तरन्नुम असलेल्या सुप्रसिद्ध शायर खुमार बाराबंकवी यांनासुद्धा फार फार तर पाचशे रुपये मिळत. पुढे राहत यांना लाखो रुपये मिळू लागले, ते हवे तितके मागून घेऊ लागले, तेव्हा लोकांच्या डोळ्यांवर आले, पण हे त्यांना माहीत नाही, की या माणसाने अनेक मुशायरे फुकट केलेले आहेत. आमचे जळगावचे मित्र जावेद अन्सारी यांचा अनुभव आहे, राहत यांना कित्येक वेळा त्यांनी दिले ते मानधन घेतले आहे. कित्येकदा तर कमी मानधन दिसल्यावर ते अशा संयोजकांकडे ठेवून दिले आहे.

त्यांच्या पेशकारीबद्दल मलाही सुरुवातीला घृणा वाटे. ते नाजूक विधा असणारी गझल उगाचच ओरडून, भला मोठा पॉझ घेऊन सादर करायचे. मग हे असे का पेश करतात हे जाणण्यासाठी त्या काळाचा विचार करावा लागला. कविश्रेष्ठ अल्लामा मोहम्मद इक्बालसारख्या जबरदस्त कवीचे निधन झाले त्यावेळी हिंदू-मुस्लीम हा भेद ठळक

सुरू झाला होता. त्यानंतर तर फाळणीमुळे आता उर्दू शायरीच काय उर्दू जिवंत राहणार का, हा प्रश्न उभा राहिला होता. त्याच दरम्यान क्षितिजावर जिगर मुरादाबादी यांनी शायरीला स्वतःच्या तरन्नुमने (गाऊन गझल म्हणणे) सावरले होते. पण जिगरसाहेबांचे प्रचंड मद्यपान आणि झोकांड्या खात खात मुशायऱ्यात येणे फारच जिकिरीचे होते. त्यांची दर्जेदार शायरी आणि गोड तरन्नुम यामुळे रसिक सारे सहन करत. परंतु त्याचा परिणाम असा झाला, की 'तरन्नुममध्येच गझल पेश होते,' असे वाटून अनेकांनी आपापले गळे साफ करून घेतले होते. काहींनी शास्त्रीय संगीताचे धडेही घेतले होते. अशावेळी कितीही मोठा शायर असला आणि त्याला पेशकारी नसली तर तो मुशायऱ्यात मरणारच. राहतजींना गळाच नव्हता. मग त्यांनी काय करावे? त्यांनी आपली एक शैली निर्माण केली आणि तीच लोकांना आवडू लागली, हे कळल्यावर त्यांच्या सादरीकरणाबद्दल असलेला आक्षेप दूर झाला.

राहतजींची शायरी मला वेड लावू लागली. मग त्यांच्या कुठे कुठे भेटी होत होत्या. एकदा काय काम होतं आठवत नाही; पण त्यांना फोन केला तर ते रेल्वेस्थानकावर होते. मी म्हणालो, ''राहतजी, नंतर फोन करतो, तुम्हाला गाडी पकडायची असेल.'' तेव्हा ते म्हणाले, ''अरे, गेली तर जाऊ द्या गाडी, आपले काम महत्त्वाचे.'' मग तर ते आणखी आवडू लागले. माणूस हळूहळूच उलगडतो ना? त्यांची शेवटची भेट 'जश्ने राहत इंदोरी' या कार्यक्रमाच्या वेळी झाली. त्यांच्या मुलाने, सतलजने, शायरीची सुरुवात केली होती. 'त्याला आशीर्वाद द्या,' म्हणत राहत यांनी त्याची ओळख करून दिली. माझ्या शुभेच्छा असूनही, शायरी चांगली नसल्याने म्हणा, तो मुशायऱ्यात अनुत्तीर्ण ठरला हा भाग वेगळा. पण तेव्हा मुलासाठी तुटणारे राहतजींचे मन मला दिसले.

*मुशायरे ...*

*अदब कहाँ का कि हर रोज देखता हूँ मै*
*मुशायरे में तमाशे मदारियोंवाले -*

दिल्लीच्या जामिया मिल्लियामध्ये एकदा मुशायरा होता. सूत्रसंचालकाने मोहम्मद अल्वी यांचे नाव पुकारले. त्याबरोबर राहत उठले आणि त्यांनी सूत्रसंचालकांना सांगितले, ''भाई, अल्वीसाहेब माझ्यापेक्षा मोठे आहेत. आपल्या मुशायऱ्यांची परंपरा आहे की मोठे शायर शेवटी असतात. त्यामुळे ते माझ्यानंतर गझल पेश करतील'' आणि स्वतः गझल पेश करून खाली बसले. हा आदर लहानपणापासून त्यांना होता. एकदा इंदूरच्याच गांधी सभागृहात मुशायरा होता. परंपरेनुसार अध्यक्ष असलेले शायर बेकल उत्साही शेवटी गझल म्हणायला उठले. तोच काही लोक निघू लागले. त्याबरोबर राहतजी ध्वनिक्षेपकाजवळ जाऊन म्हणाले, ''माझ्या चांगल्या गाववाल्यांनो, मी कधीच तुमच्याजवळ काही मागितले नाही; पण आज मागतो. कृपा करून जाऊ नका. फार चांगले शायर आहेत, बेकलजी. त्यांना ऐका.'' राहतजींचा मोठ्यांबद्दलचा आदर असा वारंवार दिसायचा.

**राहतजींची थोडक्यात माहिती–**

आई – मक्बूलबी, वडील – रिफअत उल्लाह कुरेशी
शिक्षण – बरकतुल्ला विद्यापीठात. उर्दूतून एम.ए., उर्दू मुशायऱ्यांच्या परंपरेवर भोज विद्यापीठात पीएच.डी.
नोकरी – इंदूरच्या देवी अहल्या विद्यापीठात प्राध्यापक.
पहिली पत्नी सीमा अहमद हुसेन (२८ मे १९७७ रोजी लग्न)
मुलगी शिब्ली ऊर्फ जूही, फैसल आणि सतलज हे दोन मुलगे
दुसरी पत्नी अंजुम रहबर (१९८८ मध्ये विवाह, १९९३ मध्ये घटस्फोट)
'धूप धूप', 'पाचवाँ दरवेश', 'कलाम', 'चाँद पागल है', 'मौजूद, 'धूप बहुत है', 'नाराज', 'मेरे बाद', 'रुत', 'दो कदम और सही' हे काव्यसंग्रह.
चित्रपटात गाजलेली गाणी – 'पास वो आने लगे जरा जरा', 'कोई जाये 'तो ले आये', 'बुम्बरो बुम्बरो', 'एम बोले तो', 'छन छन मन गाये क्यूँ'.

*साहित्यप्रचुर शेर...*

तुफैल चतुर्वेदी हे माझे मित्र आहेत. उर्दूच्या लफ्ज नावाच्या पत्रिकेचे ते संस्थापक संपादक आहेत. त्यांनी सांगितलेला किस्सा महत्त्वाचा ठरतो. ते म्हणाले, एकदा मी व राहतजी दिल्लीच्या एका मुशायऱ्यापूर्वी गप्पा मारत होतो. तेव्हा त्यांना मी अदबी (साहित्यिक) शेर मुशायऱ्यात का वाचत नाहीत असे विचारले. राहतभाई गप्प बसले. मुशायरा सुरू झाला. त्यांनी दोन-तीन शेर ऐकवले, पण त्याला दादच मिळेना. मग त्यांनी प्रेक्षकांत बसलेल्या तुफैलजींना मंचावरूनच सांगितले, 'बघा तुफैलजी, तुम्ही म्हणता ना मी अदबी शेर का ऐकवत नाही. कळलं?' आता मुशायरा कसा उठतो बघा. आणि त्यांनी मुशायऱ्याचे शेर ऐकवायला सुरुवात केली, तर दाद आवरता आवरेना अशी आली.

*राहतजींची चित्रकारी*

राहतजींनी स्वतःचा कलार्थी नावाचा स्टुडिओ काढला होता. तिथे 'धूप धूप' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह नौशाद यांच्या हस्ते प्रकाशित झाला होता. त्यावेळी 'सूरज देश' हा संग्रहही प्रकाशित झाला होता. तो होता तारिक शाहिन यांचा. त्याचे मुखपृष्ठ राहतजींनी केले होते. राहत यांची चित्रकलेची समज चांगली होती. वास्तविक त्यांनी काही त्याचे शिक्षण घेतले नव्हते, पण ती जाण होती. तेव्हाचे चित्रपट 'पारसमणी', 'फूल और पत्थर' आदींचे पोस्टर तेथेच केले होते. पुढे राहत नावाचाच स्टुडिओ उघडून दहा लोकांना काम दिले होते.

माणूस गेल्यावर त्याच्यातील कलावंत पाहावा, त्याच्याबद्दल चार चांगले शब्द लिहावे म्हणून मी लिहिले असा तुमचा गैरसमज असेल तर असू द्या. पण मी राहतजींची शायरी पाहिली, त्यांचे चांगल्या गोष्टींना दाद देणे पाहिले, त्यांची चित्रकारिता पाहिली आहे.

**– प्रदीप निफाडकर**
भ्रमणध्वनी : ९९२२१२७४९२
kavyavidyavarg@gmail.com



**अपर्णा पाटील**

# लोकप्रिय तरीही...

> साहित्यातला अर्धा अर्थ लेखकाने लिहिलेल्या शब्दांतून समजतो, तर अर्धा अर्थ ज्याचा-त्याचा आपल्या आकलनातून लावायचा असतो. कृष्ण चंदर यांच्याही अनेक कथांचा अर्थ नव्याने लावायला हवा. आशिया खंडातील सगळ्यात लोकप्रिय लेखक अशी ख्याती असलेल्या कृष्ण चंदर यांच्या लिखाणाचे संदर्भ टाळून पुढे जाताच येत नाही.

रात्री मुलं आई किंवा आजीकडून कथा का ऐकतात, या प्रश्नाला उत्तर देताना कृष्ण चंदर यांनी म्हटलं होतं, 'रात्रीची भीती दूर करायला'. त्यांनीही अनेक कथा लिहिल्या. 'मग तुम्ही त्या का लिहिल्या कथा', असं विचारताच ते आपल्या लहानपणीचा किस्सा सांगत.

कृष्ण चंदर यांच्या लहानपणीचा हा किस्सा वारंवार ऐकायला-वाचायला मिळतो. त्यांचे वडील आजारी असलेले राजा बलदेवसिंग यांना पाहायला गेले. सोबत त्यांनाही नेलं. राजवाड्यात दोन राजपुत्र त्यांना भेटले. राजपुत्रांनी त्यांची खेळणी त्यांना दाखवली. 'तू डॉक्टरचा मुलगा आहेस ना, तुझ्याकडे काय आहे, आम्हालाही पाहू दे,' असं राजपुत्र म्हणाले. तेव्हा खजील झालेल्या कृष्ण चंदर यांनी शांतपणे उभं राहणं पसंत केलं. ते राजपुत्र मात्र गप्प बसले नाहीत. त्यांनी त्यांची झडती घ्यायला सुरुवात केली. त्यावेळी, त्यांच्या खिशात पांढऱ्या हत्तीच्या चित्राची मूठ असलेला चाकू होता, तो त्यांना सापडला. तो त्यांनी काढून घेतला. आपला चाकू परत द्या, असं कृष्ण चंदर त्या राजपुत्रांना सांगू लागले. पण ते ऐकेनात. मग त्यांनी राजपुत्रांच्या अंगावर धावून जात त्यांना थोबाडीत लगावली. तेही त्यांच्यावर तुटून पडले. त्यांच्यात जोरदार हाणामारी झाली. त्यांच्या रडण्याचा आवाज ऐकून त्यांचे वडील धावत आले. काय घडलं ते ऐकून घेतलं आणि राजकुमारांवर हात उचलतोस, असं म्हणत त्यांनाच एक थप्पड लगावून दिली. तो चाकूही त्यांना कधी परत मिळाला नाही.

कृष्ण चंदर लिहितात, 'लहानपणीच्या त्या प्रसंगानं मला आयुष्यातला मोठा धडा शिकवला. पांढरी मूठ असलेला चाकू, एखादी सुंदर मुलगी, जमिनीचा तुकडा हे सगळं हस्तगत करण्यासाठी लोक वाट्टेल ते करतात. मग ते त्याच्यावर आपली मालकी दाखवतात. त्यातूनच सरंजामशाही अस्तित्वात येते आणि ती वर्षानुवर्षं चालत राहते. ती माणसं वाईटच वागली आहेत. दोन आण्याच्या चाकूसाठी त्यांनी माझ्याशी वैर घेतलंय. तो चाकू माझ्या काळजात रुतलाय. त्याचप्रमाणे आजवर जे काही लिहिलंय, ते तो सफेद चाकू परत मिळवण्यासाठीच'.

कृष्ण चंदर यांच्या आयुष्यातील ती घटना कुठल्या ना कुठल्या संदर्भात सांगितली जाते, कारण त्यांच्या लिखाणावर साम्यवादी विचारांचा पगडा शेवटपर्यंत कायम राहिला. कम्युनिस्ट विचारांनी भारावलेल्या अनेक प्रगतीशील लेखकांमध्ये त्यांचा समावेश होता. चाकू पळवणारे राजकुमार, हे त्यांच्या दृष्टीनं भांडवलशाही व्यवस्थेचं जिवंत उदाहरण होतं. त्यांनी लिहिलेल्या कथा-कादंबऱ्यांत अशी अनेक पात्र आहेत, जी प्रशासकीय व्यवस्थेनं चिरडली गेली आहेत. कृष्ण चंदर हे मृत्यूपर्यंत आपल्या राजकीय तत्त्वांवर ठाम राहिले. पददलितांच्या वेदना हे त्यांच्या कथांचे विषय होते. कृष्ण चंदर यांच्या लिखाणात रोमँटिझम मात्र गच्च भरलेला होता. त्यामुळे तरुणांवर त्यांनी गारूड

केलं. अर्थात फैज अहमद फैज यांच्याप्रमाणेच त्यांनीही रोमँटिसिझम ते वास्तववादी असा प्रवास केला होता. परंतु त्यांच्या लिखाणातला उपहास, विनोद हा इतर लेखकांच्या तुलनेत वेगळा ठरला. सुरुवातीच्या एका पुस्तकाच्या मनोगतातून त्यांची विचारसरणी स्पष्ट होते. त्यात ते म्हणतात, 'जेव्हा एखादा सैनिक मरतो तेव्हा जग मरतं, कल्पना मरतात, आशा मरते आणि पुस्तकही मरते. विज्ञान, सत्य, सौंदर्य सगळंच नाश पावतं आणि जग पूर्वीपेक्षा निर्जन, गरीब आणि दुर्बल होतं.'



कृष्ण चंदर

कृष्ण चंदर यांचा जन्म २३ नोव्हेंबर १९१४ रोजी राजस्थानमधील धरमपूर इथे झाला. तीन भाऊ आणि एक बहीण, अशा कुटुंबात ते वाढले. त्यांचे वडील गौरीशंकर चोप्रा हे डॉक्टर होते. ते काश्मीरमधील संस्थानिकांचे डॉक्टर म्हणून काम करत. त्यामुळे कृष्ण चंदर यांचं बालपण काश्मीरमध्ये गेलं. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, तसे त्यांचेही दिसले होते. ते शाळेतल्या आपल्या शिक्षकांवरच उपहासात्मक काहीबाही लिहू लागले. त्यांच्या डॉक्टर वडिलांना हे सहन होणारं नव्हतंच. त्यांनी त्याला बुकलून काढलं. यापुढे असं काही लिहणार नाही, अशी शपथही घ्यायला लावली. पण, ती शपथ त्यांनी कधी पाळली नाही.

शिक्षण घेतल्यानंतर लाहोरला गेले. एलएलबी केलं. त्यांनी आकाशवाणीवर काही काळ नोकरीही केली. मात्र तिथे ते फार काळ रमले नाहीत. लिखाणाला वाहून घेणारे त्या काळचे ते पहिलेच लेखक असावेत. पुस्तकांच्या रॉयल्टीच्या आधारे आपलं जीवन व्यतीत करणारे कृष्ण चंदर हे कदाचित एकमेव भाग्यवान उर्दू लेखक असावेत. त्यांनी ३२ कथासंग्रह, जवळपास साठ कादंबऱ्या, सुमारे वीस नाटकं, अशा साहित्यासह काही पुस्तकांचं संपादन केलं. अनेक चित्रपट, काही पटकथा-संवाद आणि मुलांसाठी साहित्य लिहिणारे लेखक म्हणूनही ते प्रसिद्ध झाले. प्रेमचंद आणि रवींद्रनाथ टागोर यांच्यानंतर ६५ हून अधिक परदेशी भाषांमध्ये साहित्य अनुवादित झालेले ते भारतातले तिसऱ्या क्रमांकाचे लेखक आहेत. कम्युनिस्ट विचारसरणीच्या साहित्यकृतीमुळे त्यांचं लिखाण रशियामध्ये प्रचंड लोकप्रिय ठरलं.

कृष्ण चंदर यांच्या साहित्यिक प्रवासाविषयी माहिती घेताना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे त्यांना आपल्या पहिल्या कथेपासूनच वाचकांचं प्रेम मिळालं. त्यामुळे त्यांच्या कथा बऱ्याच वर्तमानपत्रांत आणि मासिकांतून सतत छापून येत. त्यांची दुसरीच कथा, 'झेलममें नाव'मधून त्यांच्या लिखाणाची शैली लक्षात येते. या कथेत दोन महिलांसह ते एका नावेतून झेलम नदी ओलांडत आहेत, असा विषय आहे. त्या नावेतील एक महिला सुंदर तर दुसरी कुरूप आहे. त्यात ते लिहितात, 'ती सुंदर मुलगी प्रियकराच्या आठवणीत रडत होती. मी त्या नाजूक पाकळ्यांसारख्या डोळ्यांतले तिचे अश्रू हलक्या हातानं पुसून घ्यावेत आणि तिला म्हणावं, मला सांग काय झालं आहे तुला, अशा विचारात आहे. पण त्याऐवजी मी माझ्याकडे रोखून बघणाऱ्या त्या कुरूप बाईचाच विचार करतोय.'

कृष्ण चंदर यांच्या संवेदनशील आणि निसर्गवर्णनांनी बहरलेल्या कथांना वाचकांचा विलक्षण प्रतिसाद मिळत होता, पण कालांतरानं त्यांचं लिखाण वास्तववादी होत गेलं. हा बदल लक्षात घ्यायचा असेल तर त्यांनी 'सेल्फ पोर्ट्रेट' या शीर्षकाखाली लिहिलेलं मनोगत वाचायलाच हवं. त्यात ते स्वतःविषयी म्हणतात, 'मी अनेकदा खोटं वचन दिलंय. स्वतःसह इतरांचाही विश्वासघात केलाय. दुर्व्यवहार केलाय. दारू प्यायलो, अगदी भांग आणि चरसही. इतरांनी केलेल्या कौतुकामुळे मी आनंदित झालो. एखाद्या माणसाकडे माझं काम असतं, तेव्हा मी त्याच्या मागे-मागे जातो आणि एकदा का काम झालं की जणू तो माझ्या आयुष्यात कधीच नव्हता असंही वागतो. कित्येकदा खिशात पैसे असूनही मित्रांनी कर्ज मागितलं, तरी मी त्यांना पैसे दिलेले नाहीत. बऱ्याच वेळा मी कर्ज मागितलं आणि त्यांनी दिलं नाही तेव्हा मात्र मी त्यांचा मनापासून छळ केलाय. रस्त्यावरून चालणाऱ्या स्त्रियांना मी बऱ्याचदा मोहात पाडलंय, कारण त्या सुंदर आहेत. त्यापैकी ज्या घरी सुखरूप घरी पोचल्या असतील त्याला कायदा जबाबदार असेल, अन्यथा मी त्यांना फूस लावली आहे. अनेकांना रागाच्या भरात अनेकांना ठार मारलंय आणि एखादी व्यक्ती जिवंत असली तर ते त्याच्या ताकदीमुळेच. अन्यथा, जिथे जिथे मला शक्य आहे, तिथे अशा हत्या मी केल्यात. माझ्या अंदाजानुसार, मी पन्नासेक स्त्रियांना फसवलंय. दोनशे पुरुषांना मारलं

**नेहरूंची नाराजी**

सोव्हिएत सरकारकडून कृष्ण चंदर यांना हरिवंशराय राय बच्चन यांच्यासह नेहरू पुरस्कार जाहीर झाला. हा पुरस्कार स्वीकारण्यास ते रशियाला गेले होते. तेव्हा बच्चन आणि पं. जवाहरलाल नेहरूही उपस्थित होते. त्याआधी कृष्ण चंदर यांचं 'एक गधे की सरगुजश्ट' पुस्तक पं. नेहरू वाचलेलं होतं. त्यात भारत-चीन संबंधाविषयी केलेल्या उपहासात्मक भाष्यामुळे ते नाराज झाले होते. पं. नेहरू पुरस्कार सोहळ्यासाठी आले असता, त्यांनी सगळ्यांना अभिवादन केलं मात्र कृष्ण चंदर यांच्याकडे पाहूनही न पाहिल्यासारखं केलं. मग कृष्ण चंदरही त्यांना हस्तांदोलन करण्यासाठी उभे राहिले नाहीत. अरुणा असफ अली यांनी ते पाहताच, त्या नेहरूजींना म्हणाल्या, हे कृष्ण चंदर आहेत, माहीत नाही का... असं म्हणताच पं. नेहरू म्हणाले, 'हो माहीतेय. हेच तेच आहेत जे गाढवाच्या गोष्टी लिहितात.' अर्थात नेहरूंनी जाहीरपणे जरी अशी नाराजी व्यक्त केली असली तरी व्यक्तिगत आयुष्यात त्यांनी कधीच कृष्ण चंदर यांच्याविषयी राग धरला नाही.

आहे. यात ख्वाजा अहमद अब्बास, सरदार जाफरी, राजिंदरसिंग बेदी, माओ त्से-तुंग, विन्स्टन चर्चिल, दिलीपकुमार, धर्मवीर भारती आणि माझा सख्खा भाऊ महेंद्र नाथही आहे'.

आता स्वतःविषयी इतकं प्रामाणिकपणे कोण लिहू शकेल? त्यांच्या लिखाणातला हाच प्रामाणिकपणा आणि वास्तव त्यांना उर्दूतल्या चार प्रमुख लेखकांच्या पंक्तीत बसवणारा ठरला. इस्मत चुगताई, राजिंदर सिंह बेदी, सआदत मंटो यांच्याबरोबरीनं त्यांचं नाव घेतलं जाऊ लागलं. अर्थात त्यांच्यापेक्षाही चंदर यांचा प्रभाव तरुणांवर जास्त होता. त्यांचं नाव घेताना आशिया खंडातील सगळ्यात लोकप्रिय लेखक हा उल्लेख केला जाऊ लागला. अर्थात काळाच्या ओघात त्यांचं नाव मागे पडलं, त्याला कारण त्यांनी खूपच जास्त लिखाण केलं किंवा ते सिनेसृष्टीत गेल्यामुळे त्यांच्या लिखाणाचा दर्जा घसरला अशी टीका होऊ लागली. शिवाय मंटो यांचं लिखाण जितकं थेट, भेदक, जळजळीत आणि वास्तव होतं, तशी दाहकता चंदर यांच्या लिखाणात नव्हती. कदाचित चंदर यांच्या लिखाणातल्या वास्तवाला उपहास मारक ठरला असावा. तरीही फाळणी, बंगालमधील दुष्काळ, जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था याविषयावरील त्यांचं लिखाण हे अधिक संवेदनशील आहे. उदाहरण द्यायचं तर 'कालु भंगी' या कथेचं देता येईल.

त्यांनी अनेक कथा-कादंबऱ्या लिहिल्या. त्यात गाढव या पात्राच्या रूपातून त्यांना समाजात ज्या-ज्या विसंगती दिसत होत्या, त्यावर भाष्य केलं. 'एक गधे की आत्मकथा' हे छोटेखानी पुस्तक आजही वाचलं जातं. 'एक गधा नेफ़ा में', 'एक गधे की वापसी' अशा पुस्तकांतून त्यांच्या शैलीतला उपहास हे अविभाज्य अंग का ठरलं असावं, असावं याचा अंदाज येतं. त्यापैकी 'एक गधा नेफ़ा में' पुस्तकाचा उल्लेख राजकीय स्थितीवर भाष्य करण्यासाठी केला गेला. 'गद्दार' या फाळणीवरच्या पुस्तकाचा उल्लेख देशातील 'देशभक्त' संकल्पनेच्या चर्चेच्या वेळी झाला होता. इतकंच नाही, तर सध्याच्या सिनेसृष्टीत सुरू असलेल्या खळबळजनक घटनेचं वार्तांकन करताना त्यांच्या 'बावन पत्ते'चा उल्लेख झाला होता. सिनेसृष्टीत नवोदितांच्या वाट्याला आलेले अनुभव, महिला कलाकारांनी त्यांच्या शोषणाविरोधात आवाज उठवताच, त्यांना यश मिळालं नाही म्हणून त्या असा आरोप




करतात. असा प्रचार करणं, त्यावर प्रस्थापितांनी मूग गिळून बसणं असं वास्तव त्यांनी त्यात मांडलंय. त्यांच्या पत्नीनं या पुस्तकावर हिंदी मालिकेची निर्मिती केली होती. राजकीय क्षेत्र असो नाहीतर सिनेसृष्टी, नोकरशाही असो वा वर्णव्यवस्था यावर त्यांनी केलेलं भाष्य आजही गैरलागू ठरलेलं नाही. त्यावरून त्यांच्या नावाचं जरी आज विसर पडला असला तरी त्यांचं साहित्य विस्मरणात गेलेलं नाही, हे लक्षात येतं.

ते उर्दू साहित्यिक असले तरी त्याकाळी हिंदी-उर्दू साहित्यिक असा भेद नव्हता. फाळणीमुळे ते अंतर पडलं. कृष्ण चंदर हे अंतर दूर करण्याच्या प्रयत्नात होते. काळाप्रमाणे माणसं बाहेरून बदलतात, त्यांचं रूप, रंग बदलतं. पेहेराव बदललतो. पण आतून ती कायम तशीच राहतात. त्यांच्या कल्पना, उत्सुकता, ताणतणाव, अभिव्यक्ती, संवेदना यात तसूभरही फरक झालेला नाही. त्यामुळे कृष्ण चंदर यांचं लिखाण अधिक जवळचं वाटतं. त्यामुळेच त्यांच्या 'शिकस्त'ला 'गोदान'नंतरचा दर्जा दिला जातो. तरीही कृष्ण चंदर यांचं नाव त्यांच्या तुलनेत मागे का पडलं, याचा कानोसा घेतला; तर अनेकांनी त्यांनी सिनेसृष्टीत प्रवेश करणं हेच कारण सांगितलं आहे.

कृष्ण चंदर यांनी पूर्णवेळ लिखाणाला वाहून घ्यायचं ठरवलं होतं. त्यामुळे पैशांसाठी अधिकाधिक लिहायला हवं, ही गरज बनली. शिवाय याच काळात त्याचं वैयक्तिक आयुष्यही ढवळून निघालं होतं. त्यांचं लग्न घराच्यांनी ठरवलं होतं. ते देखणे होते, आपली पत्नीही सुंदर असावी, असं त्यांना वाटत होतं. पण अखेर बहिणीच्या आग्रहाखातर ते लग्नाला तयार झाले. १९४० साली लाहोरच्या विद्यावती हिच्याशी त्यांचं लग्न झालं. त्यांना तीन मुलंही झाली. अशातच लिखाणाच्या निमित्तानं त्यांची भेट सलमा सिद्दीकी यांच्याशी झाली. त्याही लेखिका होत्या. समीक्षक रशीद अहमद सिद्दीकी यांची कन्या असलेल्या सलमाच्या रूपावर फिदा झालेल्या कृष्ण चंदर यांनी त्यांच्याशी विवाह केला. अशावेळी दोन कुटुंबं चालवण्यासाठी त्यांना पैसा हवा होता. लहानपणापासूनच अतिशय थाटामाटात राहायची सवय असलेल्या कृष्ण चंदर यांनी शालीमार पिक्चर्सबरोबर काम करायचं ठरवलं आणि ते मुंबईत आले. त्यांच्या 'अन्नदाता' या कथेवरून 'धरती के लाल' आणि 'शराफत' यासारख्या चित्रपटांची

**जामुन का पेड**

गेल्या वर्षी कृष्ण चंदर यांचं नाव वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आलं. त्यांची प्रचंड लोकप्रिय कथा 'जामुन का पेड' आयसीएसईनं दहावीच्या अभ्यासक्रमातून काढून टाकली. १९६० मध्ये लिहिलेल्या या कथेत सरकारी विभागांच्या कामकाजावर आणि लालफितीच्या कारभारावर उपहासात्मक भाष्य केलेलं आहे. वादळामुळे सचिवालयाच्या आवारातील जांभळाचं झाड कोसळतं. एका कवीच्या अंगावर हे झाड पडतं. त्या कवीला वाचवण्याऐवजी सरकारी यंत्रणा कशी निर्बुद्धपणे काम करत राहते, हे या कथेतून मांडलं आहे. ही कथा वाचनीय आहेच, शिवाय तिचं रेडिओ, टीव्हीवर अनेकदा प्रसारण झालेलं आहे.

निर्मिती झाली. त्यांच्या कथेवरचा 'ममता' हा लक्षात राहिलेला आणखी एक सिनेमा. याशिवाय 'दो चोर', 'हमराही'च्या यशात त्यांच्या लिखाणाचा वाटा होताच. 'मनचली' या सिनेमाचे संवादही त्यांनी लिहिले होते.

लोकप्रियता वाढली, पण पैसा पुरत नव्हता. त्यात त्यांची एक मुलगी सतत आजारी असल्यानं तिच्या उपचारासाठी खर्च करावा लागत होता. त्यांना चालत जाणं कमीपणाचं वाटे. कुठेही येण्या-जाण्यासाठी ते टॅक्सी करत. राहणीमानही उंची होतं. अर्थात हे त्यांच्या साम्यवादी विचारांच्या एकदम विपरित होतं. अर्थात त्याचं कारण त्यांचं सुस्थापित कुटुंबात जन्माला येणं हे असावं. ते मुंबईत भाड्याच्या घरात राहत होते. त्यामुळे स्वतःच घर व्हावं, पुरेसा पैसा मिळावा यासाठी ते लिहीत राहिले. पण सिनेसृष्टीइतकं काहीच निष्ठूर नसतं. तसं त्यांच्याही बाबतीत झालं. मात्र ते प्रेमचंद यांच्यासारखे निराश होऊन पुन्हा गेले नाहीत, मुंबईतच राहिले अगदी शेवटच्या श्वासापर्यंत.

८ मार्च १९७७ रोजी त्यांचं निधन झालं. त्यावेळी ते आपलं नवं स्फूट लिहण्याच्या तयारीत होते. 'आदाब बराय-ए-बतख' असं त्यांचं शीर्षक होतं. 'नुरानी को बचपनसेही पालतू जानवरो का शौक था. कबुतर, बंदर, रंगबिरंगी चिडीया..' हे पहिलं वाक्यही लिहून पूर्णही झालं नव्हतं आणि त्यांना ह्रदयविकाराचा तीव्र झटका आला. रुग्णालयात दाखल केलेल्या चंदर यांनी मृत्यूच्या आदल्या रात्री पत्नी सलमा यांना सांगितलं, 'माझी जायची वेळ झालीय. पण मी मेलो की रडू नका. आजुबाजूला ह्रदयविकार असलेले रुग्ण आहेत. तुमच्या रडण्यानं त्यांना त्रास व्हायचा. त्यापेक्षा मी मेलो की हसून मला निरोप द्या.' जो उपहास, विनोद त्यांनी आपल्या लिखाणातून खुलवला तो त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत आपल्यातही कायम ठेवला.

'मेरे किरदार मुझसेही गुजरते है', असं म्हणणारे कृष्ण चंदर त्यांच्या कथेतल्या पात्रांप्रमाणे कायम विसंगतीकडे बोट दाखवत राहिले. त्यांचं बालपण पूंछमध्ये (जम्मू-काश्मीर) गेलं होतं. त्यामुळे त्यांच्या सुरुवातीच्या लिखाणात काश्मीरमधील निसर्गाचे उल्लेख येतात. त्यांचं काश्मीरवर इतकं प्रेम होतं, की अन्य लेखक मंडळी त्यांना काश्मीर हेच त्याचं पहिलंवहिलं प्रेम असल्याचं म्हणत. त्यांच्या 'शिकस्त' या लोकप्रिय कादंबरीमध्ये काश्मीरच्या तत्कालीन स्थितीचं चित्रण आहे. 'मिट्टी के सनम'मध्ये त्यांच्या बालपणाची झलक सापडते. मृत्यूनंतर त्यांच्या अस्थी काश्मीरला नेण्यात आल्या. पूंछमध्ये जिथे त्यांचं बालपण गेलं, तिथल्या फाऊंटन पार्कला त्यांचं नाव देण्यात आलंय. त्याच्या मधोमध त्यांचा पुतळाही उभारलाय. सरकारनं त्यांचा पद्मभूषण प्रदान करून सन्मान केला. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ टपाल तिकीटही काढण्यात आलं होतं. तरीही त्यांनी आवश्यकतेपेक्षा जास्त लिखाण केलं आणि सिनेमासाठी काम करून आपलंच मूल्य कमी केलं, अशी टीका त्यांच्यावर केली जाते. असं म्हणणाऱ्यांनी आज त्यांचं साहित्य पुन्हा एकदा वाचायला हवं, असं सांगावसं वाटतं.


**– अपर्णा पाटील**

भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२

aparna.patil1@gmail.com



॥ग्रंथाली॥

**शिल्पा जितेंद्र खेर यांची तीन पुस्तके**

**यश म्हणजे काय? भाग १ व भाग २ आणि राम-आयन**




**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**




**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**




**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**



**संतोष पाठारे**

# विशफुल थिंकिंग आणि निशिकांत कामत

निशिकांत कामतचा मृत्यू हुरहुर लावणारा आहे. कारकिर्दीच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर असणारा, मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या कामाची एक वैशिष्ट्यपूर्ण शैली निर्माण करणारा निशिकांतसारखा दिग्दर्शक कार्यरत असणे ही काळाची गरज होती. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीस चित्रपटमाध्यमात काही वेगळे करू पाहणाऱ्या तरुण दिग्दर्शकांची एक फळी उभी राहिली त्यात निशिकांत कामत हे नाव अग्रस्थानी होते. मराठीच्या परिघाबाहेर जाऊन हिंदी चित्रपटसृष्टीमध्येही आपला ठसा उमटवणारा निशिकांत कामत एकांडा शिलेदार ठरला. त्याने दिग्दर्शित केलेले चित्रपट, काही चित्रपटांचे लेखन, अभिनय आणि आगामी वेब सीरिजची जुळवाजुळव यातून त्याच्या कामाचा आवाका लक्षात येतो. पंधरा वर्षांच्या कारकिर्दीत आठ महत्त्वाचे चित्रपट दिग्दर्शित करून त्याने स्वतःबद्दलच्या अपेक्षा उंचावून ठेवल्या होत्या.

> नेहमीच्या कौटुंबिक रडारडीला कंटाळलेल्या आणि बाळबोध हास्यपटांना उबलेल्या मराठी प्रेक्षकांना 'श्वास', 'डोंबिवली फास्ट' हे चित्रपट चित्रपटगृहाकडे परत घेऊन येण्यात यशस्वी ठरले. अनावश्यक गाणी, विनोदी प्रसंग टाळून विषयाचे गांभीर्य शेवटपर्यंत टिकवून ठेवण्यात निशिकांत कामत यशस्वी झाला. 'डोंबिवली फास्ट'ने मराठीत प्रयोग करू इच्छिणाऱ्या नवोदितांचे मनोधैर्य वाढले.

निशिकांतला पहिल्यांदा पाहिलं ते पार्थो सेनगुप्ताच्या 'हवा आने दो' या चित्रपटात! भारत-पाकिस्तानयुद्धाच्या पार्श्वभूमीवर अस्वस्थ तरुणाईचा वेध घेणारा हवा आने दो' आशियाई चित्रपट महोत्सवांमध्ये चर्चेचा विषय ठरला होता. निशिकांतची त्यातली मोटार मेकॅनिकची भूमिका लक्षवेधी होती. त्यानंतर आलेल्या संजय सूरकर यांच्या 'सातच्या आत घरात'मध्ये त्याने अभिनयाबरोबर पटकथेवरसुद्धा काम केले होते. महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांचे दिग्दर्शन करताना त्यांना सिनेमॅटिक ट्रीटमेन्ट देण्याचे कौशल्य निशिकांतला आत्मसात झाले होते. सिनेमातील मोन्ताज या संकल्पनेचा कल्पक वापर त्याने एकांकिकामध्ये केला आणि एकांकिकेतील आशय व व्यक्तिरेखाचित्रणाचा वापर सिनेमाचे दिग्दर्शन करताना करून घेतला. 'मंजुळा' ही एकांकिका आणि 'मुंबई मेरी जान'मधील तुकाराम पाटील, 'डोंबिवली फास्ट'मधील माधव आपटे ही पात्रे पाहताना निशिकांतची नाटक आणि सिनेमा या दोन्ही माध्यमांवरील पकड लक्षात येते.

एकविसावे शतक सुरू होताना अनेक चांगले बदल घडून आले त्यातील एक म्हणजे फिल्म फेस्टिव्हल आणि इंटरनेटमुळे जागतिक सिनेमाची सहज झालेली उपलबधता. सिनेमामाध्यमातून समकालीन व्यवस्थेचे वास्तव तरीही रंजक दर्शन घडवता येते याबद्दलची जाणीव जागतिक चित्रपटांनी करून दिली. चाकोरीच्या किंचित बाहेर जाऊन प्रयोग केले तर ते पाहण्यासाठी प्रेक्षक तयार होत आहेत याबद्दलचा विश्वास चित्रपटमहोत्सव आणि नुकतीच उभी राहू लागलेली मल्टिप्लेक्स यांनी चित्रपटकर्त्यांना करून दिला. नागेश कुकनूरच्या 'हैदराबाद ब्लूज'ला मिळालेला प्रतिसाद छोट्या बजेटमध्ये चित्रपट निर्माण करणाऱ्या निर्मात्यांचा उत्साह वाढवणारा ठरला. गीत-संगीत आणि मेलोड्रामा टाळूनसुद्धा प्रेक्षकांच्या भावनांना

हात घालता येऊ शकतो हे संदीप सावंतच्या 'श्वास'ने दाखवून दिले. त्याला मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्काराने मराठी चित्रपटसृष्टीत चैतन्याची लाट आली. मराठी सिनेमाबद्दल राष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेले कुतूहल शमवण्याची पुरेपूर क्षमता 'श्वास' पाठोपाठ निशिकांत कामतच्या 'डोंबिवली फास्ट'मध्ये होती. नेहमीच्या कौटुंबिक रडारडीला कंटाळलेल्या आणि बाळबोध हास्यपटांना उबलेल्या मराठी प्रेक्षकांना 'श्वास', 'डोंबिवली फास्ट' हे चित्रपट चित्रपटगृहाकडे परत घेऊन येण्यात यशस्वी ठरले. 'डोंबिवली फास्ट'चा नायक माधव आपटे हा सामान्य मराठी माणूस प्रेक्षकांच्या परिचयाचा होता पण त्याच्या आयुष्यातील घडणारे नाट्य मराठी चित्रपटाला अपरिचित होते. भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात उभा राहणारा अँग्री मॅनचा असा अवतार मराठी पडद्यावर त्याआधी आलेला नव्हता. सद्वर्तनी, नाकासमोर चालणारा, स्वतःची तत्त्वे जपणारा माधव आपटे आसपास घडणाऱ्या छोट्यामोठ्या अनायाविरुद्ध एक दिवस अचानक बंड पुकारतो आणि आपले अस्तित्व पणाला लावून टाकतो. कोल्डड्रिंकच्या थंड बाटलीसाठी दोन रुपये अधिकचे मागणाऱ्या दुकानदारापासून बँकेतील भ्रष्ट वरिष्ठ अधिकारी, पाण्याच्या टँकरचा गैरव्यवहार करणारा नगरसेवक, लाच घेणारे पोलीस, अंमली पदार्थ विकणारे डीलर आणि खाजगी हॉस्पिटल चालवणारे डॉक्टर, हे सगळेच माधव आपटेचे लक्ष्य बनतात. सर्वसामान्य जनतेच्या मनात धगधगणारा व्यवस्थेच्या विरोधातील राग माधव आपटेच्या व्यक्तिरेखेतून व्यक्त झाला. निशिकांत कामतच्या पुढील चित्रपटातून हा माधव आपटे सतत डोकावत राहिला. माधव आपटेची ही गोष्ट पडद्यावर मांडताना पहिल्या पाच मिनिटांत माधव आपटेचे चाकोरीबद्ध जीवन दाखवण्यासाठी त्याने मोन्ताजचा अफलातून वापर केला. चित्रपटातील वाढत जाणारा थरार आणि ताण कायम ठेवण्यासाठी पार्श्वसंगीत आणि प्रकाशचित्रण पूरक होते. अनावश्यक गाणी, विनोदी प्रसंग टाळून विषयाचे गांभीर्य शेवटपर्यंत टिकवून ठेवण्यात निशिकांत कामत यशस्वी झाला. 'डोंबिवली फास्ट'ने मराठीत प्रयोग करू इच्छिणाऱ्या नवोदितांचे मनोधैर्य वाढले. त्यानंतर मराठीत त्यापूर्वी न हाताळले गेलेले विषय येऊ लागले. मराठी सिनेमा केवळ मराठी



निशिकांत कामत

प्रेक्षकांपुरता मर्यादित राहिला नाही. अमराठी प्रेक्षक तो पाहायला चित्रपटगृहात येऊ लागले. निशिकांत कामतनेसुद्धा स्वतःला मराठीच्या वर्तुळात बंदिस्त केले नाही. त्याने 'डोंबिवली फास्ट'चा तमिळ रिमेक 'इवानो ओरुवन' या नावाने केला. आर. माधवनची प्रमुख भूमिका असलेल्या या सिनेमाने निशिकांत कामत हे नाव अमराठी लोकांमध्ये प्रसिद्ध झाले. त्यानंतर आलेल्या मुंबई मेरी जान' या हिंदी चित्रपटाच्या यशाने त्यावर शिक्कामोर्तब केले.

हिंदीमध्ये निशिकांत कामतने जे चित्रपट दिग्दर्शित केले त्यात 'मुंबई मेरी जान' हा त्याचा सर्वोत्तम चित्रपट मानता येईल. ११ जुलै २००६ रोजी मुंबईत लोकल ट्रेनमध्ये एकापाठोपाठ झालेल्या सात बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर 'मुंबई मेरी जान'चे कथासूत्र त्याने रचले होते. या बॉम्बस्फोटाचा मुंबईतील विविध स्तरांतील लोकांवर झालेला परिणाम त्याने भेदकपणे चित्रित केला होता. बॉम्बस्फोटाच्या वेळी ट्रेनमधून प्रवास करत असलेला निखिल अग्रवाल (आर . माधवन), या घटनेचे रिपोर्टिंग करणारी न्यूज चॅनेलची पत्रकार रुपाली जोशी (सोहा अली खान), रस्त्यावर चहाविक्री करणारा थॉमस (इरफान खान), प्रत्येक मुस्लिमाकडे संशयाने पाहणारा सुरेश (के.के. मेनन) आणि शहरात गस्त घालणारे तुकाराम पाटील (परेश रावल) व सुनील कदम (विजय मौर्य) ही पोलीसद्वयी, या पात्रांच्या आयुष्यात बॉम्बस्फोटानंतरच्या काही दिवसांत घडणाऱ्या घडामोडी 'मुंबई मेरी जान'मध्ये पाहायला मिळतात. शहरात घडलेली एक घटना सामान्य जीवन जगणाऱ्या आणि उरात छोटीछोटी स्वप्न घेऊन जगणाऱ्या माणसाचे आयुष्य कसे ढवळून काढते आणि त्याच्या जीवनविषयक धारणा बदलून टाकते याचे खिळवून ठेणार दर्शन 'मुंबई मेरी जान'मध्ये निशिकांतने संवेदनशीलपणे केले. सिनेमातली प्रमुख पात्रे एकमेकांशी संबंधित नाहीत. त्यांचे आर्थिक आणि सामाजिक स्तर, त्यांची सुखदुःखे वेगळी आहेत, पण त्यांना मुंबई शहराच्या स्पिरीटने जोडून ठेवलेले आहे. हे






शहर तुम्हाला जेवढे भरभरून देते तितकेच ते तुमच्याकडून किंमतही वसूल करते आणि तरीही या शहराशी तुम्ही कायमचे बांधील राहता. निशिकांतची जडणघडण मुंबईत झाली. त्यामुळे इथल्या माणसांची जीवनशैली, त्यांची मानसिकता तो 'मुंबई मेरी जान'मधल्या विविध पात्रांच्या रूपातून प्रभावीपणे सादर करू शकला. मुंबई शहर त्याच्या चित्रपटातील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा बनून गेली होती. पाच वेगळ्या गोष्टी सांगताना त्यात एकसंघपणा ठेवण्याचे कौशल्य त्याच्या दिग्दर्शनात ठळकपणे दिसते. तुकाराम पाटीलने त्याच्या निवृत्ती समारंभाच्या वेळी केलेले भाषण या चित्रपटाचा हायलाईट आहे. शहरावर कितीही मोठ संकट आले तर हे शहर तात्पुरते थबकून जाते, पण नव्या जोमाने पुन्हा कार्यरत होते. मुंबईतील विविध वृत्ती-प्रवृत्तींचे इतके प्रभावी चित्रण क्वचितच एखाद्या हिंदी चित्रपटात पाहायला मिळाले होते.

मराठीत चित्रपट दिग्दर्शित करणारे अनेक दिग्दर्शक हिंदीतील व्यावसायिकतेशी जुळवून घेता न आल्यामुळे पुन्हा मराठीत स्थिरावतात. निशिकांत कामत मात्र याला अपवाद ठरला. 'मुंबई मेरी जान'नंतर त्याने जॉन अब्राहम, अजय देवगण, इरफान खान अशा मोठ्या कलाकारांना घेऊन बिग बजेट सिनेमे केले आणि ते यशस्वी करून दाखवले. 'फोर्स' (२०११) आणि 'रॉकी हँडसम' (२०१६) या जॉन अब्राहमच्या प्रमुख भूमिका असलेल्या देमार चित्रपटांतून ड्रग माफिया आणि ह्युमन ट्रॅफिकिंगसारखे विषय हाताळले. वेगवान कथानक हाताळण्याची त्याची शैली या चित्रपटांसाठी पूरक होती. त्याचे बहुतेक चित्रपट परदेशी किवा दाक्षिणात्य गाजलेल्या चित्रपटांच्या आवृत्त्या होत्या; पण त्यावर निशिकांतने आपल्या शैलीची छाप नेहमीच सोडली. जितू जोसेफच्या मूळ मल्याळम 'दृश्यम'चा निशिकांतने केलेला हिंदी अवतार सर्वाधिक गाजला. त्याने 'रॉकी हँडसम', 'भावेश जोशी' या चित्रपटांत मुख्य खलनायकाच्या भूमिकासुद्धा केल्या.

व्यावसायिक हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये जम बसलेला असताना त्याने रितेश देशमुखला घेऊन पुन्हा एकदा मराठीत 'लय भारी'ची (२०१४) निर्मिती केली. ऐंशीच्या दशकात लोकप्रिय झालेले, हिंदी-मराठीत चावून चोथा झालेले जुळ्या भावांचे कथानक घेऊन त्याने 'लय भारी' यशस्वी करून दाखवला. रितेश देशमुखच्या मराठीतील दमदार आगमनाला निशिकांत कामतने हिंदीत मिळवलेल्या व्यावसायिक अनुभवाचा फायदा झाला. त्यानिमित्ताने मराठी चित्रपटसृष्टीला आलेली मरगळ झटकली गेली.

'मदारी' (२०१६) या हिंदी चित्रपटात निशिकांतला पुन्हा आपला मूळचा सूर गवसला. पुन्हा एकदा भ्रष्ट राजकीय व्यवस्थेमुळे वैयक्तिक आयुष्याची धूळधाण झालेल्या एका सामान्य माणसाची कथा त्याने त्याच्या थ्रिलर शैलीतून सादर केली. अंधेरीत ब्रिज कोसळून झालेल्या अपघातात निर्मलचा (इरफान खान) लहान मुलगा अपू मृत्युमुखी पडतो. या घटनेला जबाबदार असणारे राज्यकर्ते आणि बांधकाम व्यावसायिक यांना जनतेसमोर आणण्यासाठी निर्मल गृहमंत्र्याच्या मुलाचे, रोहनचे (विश्वेश बन्सल) अपहरण करतो. पोलिसांनी रोहनची सुटका करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि निर्मलने अपूला न्याय देण्यासाठी खेळलेली खेळी याचे थरारक चित्रण 'मदारी'मध्ये आहे. चित्रपटाचा शेवट विशफुल थिंकिंग प्रकारात मोडणारा आहे आणि निशिकांतच्या सर्वच चित्रपटांची ती खासियत होती. त्याच्या चित्रपटांतून नेहमीच सकारात्मक भावनेचा आविष्कार पाहायला मिळाला. त्याच्या सगळ्या व्यक्तिरेखा न्याय मिळवण्यासाठी आपापल्या क्षमतेनुसार व्यवस्थेशी लढा देताना आणि त्यात यशस्वी होताना दिसतात. चित्रपटातील विशफुल थिंकिंग वास्तवात मात्र अभावानेच उतरते, हे निशिकांत कामतच्या अकाली मृत्यूने सिद्ध करून दाखवले.

**– संतोष पाठारे**
भ्रमणध्वनी : ९८२०३७४०९३
santosh_pathare1@yahoo.co.in

ग्रंथाली




सॅल्यूट
**यशवंत व्हटकर**
एका पोलीस
अधिकाऱ्याच्या
सेवाकालाचे
अंतिम पर्व
**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




डी.के.दातार
द
व्हायोलिन
सिंग्ज
**डॉ. स्मिता
निखिल
दातार**
**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**



**डॉ. मोहन द्रविड**

# हे चित्र पाहा आणि ते चित्र पाहा

**अमेरिका आणि क्युबा या दोन देशांनी कोरोनासंकटाकडे कसे पाहिले, त्याला किती गांभीर्याने घेतले व कशा उपाययोजना केल्या, हे सांगताना लेखकाने या देशांतील राजकीय इच्छाशक्ती आणि दंभ यात असलेला फरक वस्तुनिष्ठपणे मांडला आहे.**

*पहिले चित्र (क्युबा)*

**३१** डिसेंबर २०१९ रोजी चीनने एका रहस्यमय न्यूमोनियाचे रुग्ण सापडल्याचे World Health Organization (WHO) ला कळवले. ७ जानेवारी २०२० या दिवशी चीनचा निरोप गेला की हा रोग न्यूमोनिया नसून एक नवीन प्रकारचा कोरोना व्हायरस आहे. हे समजल्यावर क्युबामधल्या अधिकारी व्यक्तींनी तत्काळ पावलं उचलली. त्यांना अशा साथीच्या रोगांशी सामना करायचा भरपूर अनुभव होता. आज जरी क्युबामध्ये या रोगांचे बळी शून्य असले तरी क्रांतीपूर्वी या देशात इतर कॅरिबीयन देशांप्रमाणे उष्ण प्रदेशातील संसर्गजन्य रोगांचा (Tropical Infectious Diseases) धुमाकूळ चालू असे. दर वर्षी बळी गेलेल्यांची संख्या दहा लाखाच्या घरात असे. जन्मलेले मूल पाच वर्षांपलीकडे जगणे म्हणजे डोक्यावरून पाणी! १९५९ च्या क्रांतीनंतर फिडेल कॅस्ट्रोने आरोग्यासाठी चार तत्त्वांवर पायाभूत सुविधांची (Infrastructure) बांधणी करायला सुरुवात केली.

पहिले तत्त्व, गरीब-श्रीमंत सगळ्यांकरता एकच आरोग्यसेवा, आणि तीही विनाशुल्क. दुसरे तत्त्व, रोग बरा करण्यापेक्षा रोगप्रतिबंधावर अधिक भर. तिसरे तत्त्व, स्वावलंबन. अमेरिकेच्या दहशतीखाली जगणे प्राप्त झाल्याने तोच मार्ग क्युबापुढे शिल्लक होता. गावागावात एका हाकेसरशी कामाला हजर होणाऱ्या स्वयंसेवी संस्था बांधल्या. सर्व औषधांचे संशोधन आणि उत्पादन देशातल्या देशातच. यातील ७० टक्के औषधे स्वत:च्या देशासाठी आणि ३० टक्के आफ्रिका, दक्षिण अमेरिका येथील इतर १६० गरीब देशांसाठी. चौथे तत्त्व म्हणजे परिपूर्ण ग्रामीण आरोग्यसेवा. तिची सुरुवात १९६० साली झाली. पुढील दशकात शेकडो नवीन डॉक्टर खेडेगावात गेले. (१९५९ सालानंतर सहा हजार डॉक्टरांपैकी फक्त तीन हजार शिल्लक राहिले होते, तर मेडिकल कॉलेजातील अडीचशे प्रोफेसरांपैकी फक्त १२! बाकीचे सर्व अमेरिकेत पळून गेले.)

१९८३मध्ये प्रत्येक हजार लोकांमागे कमीत कमी एक फॅमिली डॉक्टर आणि तीन नर्स अशी योजना आखली. वस्तीतच त्यांच्यासाठी घर आणि दवाखाना. दर १६० लोकांमागे एक डॉक्टर असे हे आजचे प्रमाण जगातल्या इतर कोणत्याही देशापेक्षा सरस आहे. दहा हजारांवर डॉक्टरांचे एकमेकांच्या संपर्कासाठी देशभर जाळे पसरले आहे. साधारण २५ ते ४० फॅमिली डॉक्टरांमागे वेगवेगळ्या शाखेतील तज्ज्ञांनी एकत्र येऊन बनवलेले एक पॉलीक्लिनिक. क्युबात १९६२ पासून प्रत्येक लहानमोठ्या व्यक्तीस आठ लसी विनामूल्य दिल्या जातात. अपत्यमृत्यूचे प्रमाण १९५७ मध्ये जिथे हजारामागे बत्तीस होते ते आता केवळ चार इतके खाली आले आहे. सुसंपन्न अमेरिकेतही हे प्रमाण हजारामागे सहा असे आहे. (आपण स्वत:ची अमेरिकेशी बरोबरी करत असलो तरी आपल्या इथे हे प्रमाण ४० इतके आहे!)

क्युबातील सर्व व्यक्ती चार गटांत विभागल्या आहेत. निरोगी, मधुमेहसारखे जुनाट रोग असलेले किंवा प्रतिकारशक्ती कमी असलेले,

आजारी, आणि आजारातून बरे होत असलेले. त्यामुळे संभाव्य रोगी शोधणे सोपे जाते. अमेरिकेतील मकॉल या संस्थेने (MacCall Center for Health) तयार केलेला आरोग्यसुधारणेचा केअर नावाचा नमुना (CARE model) क्युबाने अमलात आणला. महामारी राष्ट्रीय कृतियोजना हा नवीन इन्फ्रास्ट्रक्चरचा आणखी एक भाग. त्यानुसार क्युबाने उष्णकटिबंधीय सर्व संसर्गजन्य साथीच्या रोगांचा आपल्या देशात संपूर्णपणे नायनाट तर केलाच, शिवाय अन्य जवळजवळ १४० देशांत गरज लागेल तशा डॉक्टरांच्या फौजा पाठवल्या.

क्युबाचं आंतरराष्ट्रीय वैद्यकीय बंधुत्त्व हा एक स्वतंत्र विषय आहे. या डॉक्टरांच्या पलटणींना नाव आहे हेन्री रीव्ह मेडिकल ब्रिगेड्स. रीव्ह हा मूळचा न्यू यॉर्कमधला, अमेरिकन. त्याने एकोणिसाव्या शतकात झालेल्या क्युबाच्या स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतला होता आणि वयाच्या २६व्या वर्षी तो हुतात्मा झाला. त्याच्या स्मरणार्थ त्याचे नाव आंतरराष्ट्रीय डॉक्टरांच्या पलटणींना दिले आहे. आतापर्यंत चार लाख डॉक्टरांनी हेन्री रीव्ह मेडिकल पलटणीतून योगदान दिले आहे. आज कोरोनाचे निवारण करण्याकरता क्युबाचे अडीच हजार डॉक्टर चोवीस देशांत रुग्णसेवा करत आहेत. २००८ साली आलेल्या कटरिना या चक्रीवादळात क्युबाने अमेरिकेला मदत करण्यासाठी सोळाशे जणांचे पथक बनवले होते, पण अमेरिकेने मदत घेण्यास नकार दिला.

या वर्षीसुद्धा कोविड-१९ची खबर मिळाल्याबरोबर त्याच्याशी सामना करण्यासाठी क्युबाने नवीन आयोग नेमला. त्या आयोगाने नियम तयार केले. सर्वप्रथम म्हणजे बंदरे आणि विमानतळांवर पाळत ठेवणे आणि देशात येणाऱ्या ज्या प्रवाशांत रोगाची लक्षणे दिसत आहेत त्यांना लोकांपासून वेगळे करणे. त्यासाठी 'प्रतिबंध आणि संयमन' ही योजना बनवली. त्याप्रमाणे सीमेवरील सर्व अधिकारीवर्गाला प्रशिक्षण दिले. दुसरं म्हणजे तज्ज्ञांचा एक संघ रोगाचा इत्थंभूत अभ्यास करायला चीनला रवाना झाला. तिथे त्यांना रोगाच्या तीव्रतेची कल्पना तर आलीच आणि तत्काळ उपाय करण्याची आवश्यकता कळली. तिथल्या अनुभवावरून हॉस्पिटलांची अंतर्गत पुनर्रचना करणे, नोकरवर्गास प्रशिक्षण देणे यात सबंध फेब्रुवारी महिना गेला.

मार्च महिन्याच्या सुरुवातीस संशोधनासाठी बायोटेक्नॉलॉजी शास्त्रज्ञांचा एक गट निर्माण केला. त्यांचे काम कोविड-१९वर प्रतिबंधक उपाय, रोगाचे निदान, चाचण्या, लस यांचा शोध लावणे. त्यासाठी ते सतत चिनी शास्त्रज्ञांच्या संपर्कात होते. दहा मार्चपासून देशात येणाऱ्या ज्या व्यक्तींच्या चाचणीमध्ये कोविड-१९चा विषाणू सापडेल त्यांना कमीत कमी दहा दिवसांकरता अलग ठेवण्याची सोय करण्यात आली. क्युबाला हे नवीन नव्हते, कारण साथीच्या संसर्गजन्य रोगांनी पीडित वेस्ट इंडियन देशांचा शेजार त्यांना लाभला होता. 'शिकारीची' सर्व पूर्वतयारी झाल्यानंतर डॉक्टर वाट पाहत बसले.

पहिले रुग्ण अकरा मार्चला सापडले. ते होते इटलीचे पर्यटक. हे कळताच वैद्यकीय शिक्षण घेत असलेले २८,००० विद्यार्थी घरोघरी जाऊन तपासणी करू लागले. रोगाच्या माहितीकरता गावोगावी नियमित सभा घेतल्या. मुखवटे लावणे, एकमेकात अंतर ठेवून व्यवहार करणे यांची माहिती दिली गेली. वीस मार्चला टाळेबंदी जाहीर केली. उद्योगधंद्यांवरील कर, घर-गाडीचे हप्ते हे तात्पुरते निलंबित करण्यात आले. पर्यटनव्यवसाय बंद केला. ज्यांना सक्तीने घरी बसावे लागले अशा चाकरमान्यांचे पन्नास टक्के पगार चालू ठेवले.

एप्रिल महिन्यापासून वीज, पाणी अशा अत्यावश्यक सेवांची बिले पाठवणे बंद केले. सर्व तुरुंगांमध्ये कैद्यांचे विलगीकरण करण्यात आले. राजधानी आणि इतर शहरांमध्ये दर आठवड्याला निर्जंतुक फवारे मारले. त्यानंतर औषधांची नियमावली (protocol) ठरवण्यात आली. त्यात क्युबातच बनवलेली बावीस औषधे होती. हेबरॉन हे इंटरफरॉन (IFNrec) हे औषध त्यातल्या त्यात प्रभावी ठरले. ते आधी नागीण, हेपटायटस B आणि C, HIV, डेंगी या व्हायरल रोगांवर यशस्वी ठरले होते. त्याचे मूळ संशोधन क्युबामध्येच १९८३ साली झाले होते. हॉस्पिटलमध्ये आलेल्या ९५ टक्के रुग्णांवर या औषधाचा उपचार केला, आणि जवळजवळ सगळे बरे झाले.

त्या औषधाची निर्मिती २००३ पासून मोठ्या प्रमाणावर 'चँगहेबर' या नावाखाली चीनमध्ये चालू झाली होती. चीनने कोरोनाविरुद्धच्या लढ्यात निवडलेल्या तीस औषधांपैकी ते एक होते. जिथून करोनाची साथ चालू झाली त्या वूहान या गावात सहा हजारपैकी तीन हजार डॉक्टरांना हे औषध दिले, ते करोनापासून बचावले आणि ज्यांना दिले नाही त्यातल्या निम्म्या डॉक्टरांना तो झाला. यापुढे प्रतिबंधक आणि रोगाच्या पहिल्या टप्प्यात ते मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरले. वर्ल्ड जर्नल ऑफ पीडियॅट्रिक्स, जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठ, WHO या संस्थांनी त्याची मोठ्या प्रमाणावर शिफारस केली आहे. वीस देशांनी ते लगेच वापरायला सुरुवात केली, आणि एप्रिलमध्ये आणखी ऐंशी देशांनी त्याची मागणी केली. शिवाय सायटोकाइन झंझावात थांबवण्यासाठी anti-CD-16, मरणोन्मुख रुग्णांकरता CIGB-258 हे पेप्टाइड, वयोवृद्धांसाठी बायोमॉड्यलिना, बरे झालेल्यांना प्लाझ्मा ट्रीटमेंट, यांचा उपयोग केला. त्याचप्रमाणे क्युबामधील शास्त्रज्ञांनी रक्तातल्या अँटीबॉडी चटकन आणि स्वस्तात शोधणारी संगणकावर आधारित चाचणीपद्धत शोधली. त्यामुळे आयात कराव्या लागणाऱ्या यंत्रांवर त्यांना अवलंबून राहावे लागले नाही.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे सबंध क्युबात २३ एप्रिलपासून आजपर्यंत एकही रुग्ण आढळला नाही. २४ मे २०२० रोजी सर्वेक्षण केलं तेव्हा सव्वा कोटीच्या या देशातली परिस्थिती अशी : २००० लोकांना लागण, ८२ मृत्यू. आरोग्यसेवेतील ९२ लोकांना लागण आणि शून्य मृत्यू.

हे होत असताना क्युबाची 'आंतरराष्ट्रीय सेवा' चालूच होती. १८ मार्च रोजी सातशे ब्रिटिश प्रवासी असलेले,त्यातील पाच करोनाबाधित, क्रूझ जहाज समुद्रात अडकले होते. अमेरिका, बहामा, बार्बेडोस या देशांची मिनतवारी करूनसुद्धा त्यांना कोणीही उतरवून घेईना. क्युबाने त्यांना उतरवून, रुग्णांना बरे करून विमानाने घरी पाठवले. तीन दिवसांनी क्युबाने ५३ सैनिकांची 'हेन्री रीव्ह पलटण' इटलीत पाठवली. युरोपने अशी पलटण पहिल्यांदाच पाहिली. त्यानंतर

अशा पलटणी पाच हजार डॉक्टर घेऊन जगभर गेल्या. अमेरिकेने त्या डॉक्टरांची 'गुलाम' म्हणून हेटाळणी केली आहे आणि क्युबा मानवी व्यापार करतो म्हणून जगाने त्याच्याविरुद्ध कृती करावी अशी मागणी केली आहे. ब्राझील, बोलिव्हिया यांसारख्या देशांना त्यांच्या देशांतून क्युबन डॉक्टरांना हाकलवून लावणे भाग पाडले आहे. शिवाय, क्युबातल्या डॉक्टरांना त्यांचा देश सोडून अमेरिकेत यायचे आवाहन केले आहे. त्यांच्यासमोर ताबडतोब नागरिकत्व आणि मेडिकल लायसन्स ही गाजरे ठेवली आहेतच.

*दुसरे चित्र (अमेरिका)*

वॉशिंग्टन या राज्यात जानेवारी २१ रोजी अमेरिकेतला कोरोनाबाधित पहिला रुग्ण सापडला. तो आठवड्यापूर्वी चीनमधून आला होता. दुसऱ्या दिवशी झालेल्या वार्ताहरपरिषदेत ''यातून महामारी (Pandemic) होण्याची शक्यता अजिबात नाही,'' असे ट्रम्पनी छातीठोकपणे सांगितले. या प्रकरणात चीनवर विश्वास ठेवायचा का, यावर ट्रम्प म्हणाले, अर्थातच, (२७, २९ जानेवारी) ''आम्ही चीनबरोबर नियमित संपर्कात आहोत. कोरोना संपवण्यासाठी चीन ढोरमेहनत घेत आहे. त्याबद्दल मी अमेरिकन लोकांतर्फे चीनचे अध्यक्ष यांचे आभार मानतो. शिवाय, अमेरिकेतले भारी भारी तज्ज्ञ चीनमध्ये २४/७ काम करताहेत! ते चीनमधील घडामोडी डोळ्यांत तेल घालून बघत आहेत.''

या केवळ फुशारक्या होत्या. ट्रम्प म्हणतात ते खरे असते तर हा रोग अतिशय झटकन पसरतो हे अमेरिकन अधिकाऱ्यांच्या लक्षात आले असते. डी मॉइन या शहरात ३० जानेवारी रोजी केलेल्या भाषणात ट्रम्प यांनी सांगितले, ''चीनमधली समस्या भयानक आहे. सुदैवाने आज आपल्या देशात फक्त पाचच रुग्ण आहेत. आणि तेही बरे होत आहेत.'' २०२० च्या State of the Union Address मध्ये ट्रम्पनी चीनचे कौतुक केले, ''चीनमधल्या लोकांची कमाल आहे. पटापट हॉस्पिटल बांधताहेत. असो. काही दिवसांतच थंडी संपतेय आणि व्हायरस उन्हात वितळून जाईल. काल रात्रीच माझं प्रेसिडेंट क्सी यांच्याशी कोरोनाविषयी बोलणं झालं.''चीनमुळे जागतिक अर्थव्यवस्था कोसळणार नाही का, या प्रश्नाला ७ फेब्रुवारी रोजी उत्तर देताना ट्रम्प म्हणाले, ''चीनचे लोक प्रचंड मेहनत घेत आहेत. ते WHO आणि CDC बरोबर संपर्कात आहेत. आम्ही सगळे एकत्रच काम करत आहोत.''

''आपल्या देशात आतापर्यंत अकराच रुग्ण झाले आहेत. आणि ते सर्व बरे होण्याच्या मार्गावर आहेत,'' १० फेब्रुवारी रोजी ट्रम्पचे विधान. त्याच दिवशी एका वार्ताहर स्त्रीने त्यांची मुलाखत घेतली. ''चीनची अर्थव्यवस्था आता नक्की डब्यात चालली. आपण त्यांच्यापासून कसं सुरक्षित राहायचं, हा प्रश्न आहे.'' त्यावर ट्रम्प म्हणाले, ''काळजी नको. चीनचे कारभारी सर्वजण आपापल्या कामात तरबेज आहेत.'' १८ फेब्रुवारीच्या वार्ताहरपरिषदेत ट्रम्पनी त्याचीच पुनरावृत्ती केली. ''हे पाहा, चिनी लोक मेहनती आहेत आणि प्रेसिडेंट क्सी हुशार माणूस आहे. ते डॉक्टर फाउचीसारख्या आपल्या लोकांच्या संपर्कात आहेत. चिनी त्यांचा सल्ला घेतात.'' २५ फेब्रुवारीला दिल्लीमध्ये ट्रम्प म्हणतात, ''प्रेसिडेंट क्सी तरी काय करणार? कोरोनानं चीनवर चोरूनच हल्ला केलाय.'' अमेरिकेत आतापर्यंत तरी सर्व आलबेल चाललेय असे वाटत होते. 'चीन जाने और कोरोना जाने,' अशा बेफिकिरीत राहून लोक आपापल्या उद्योगांत आणि राजकीय पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्यात मग्न होते.

माणसं गाफील राहिली तरी कोरोना मात्र कावेबाजपणे आपले जाळे पसरत होता. अहमदाबादमध्ये दहा लाख लोकांनी दाटीवाटीने बसून ट्रम्पना 'नमस्ते' केले. कोरोनाला गर्दी आवडते. अमेरिकेत सुंदोपसुंदी जोरात चालली होती. इंपीचमेंटचा तमाशा संपला तरी कवित्व चालूच होते. रशियागेटचे पडसाद अजून ऐकू येत होते. कोरोनापेक्षा अजूनही रशियागेट जास्त महत्त्वाचे होते. तेव्हा येऊ घातलेल्या अरिष्टाचा मुकाबला कसा करायचा, त्यासाठी काय तयारी लागते, लढाईची आयुधे आपल्याकडे आहेत का, या प्रश्नांकडे लक्ष द्यायला कुणाकडे वेळ नव्हता. मूळात हे काम कुणाचे आहे, याबद्दल वाद. केंद्र सरकारचे की राज्य सरकारांचे? केंद्राचे म्हटले तरी त्या सरकारला सर्वव्यापक हुकूम काढता येत नाही. सगळेच आत्मप्रेमी, सगळेच रंगभूमीवर असल्याच्या तोऱ्यात. काही लोक अशा स्थितीला अंदाधुंदी म्हणतात.

२९ फेब्रुवारीस अमेरिकेत कोरोनाचा पहिला बळी गेला. रोगाची व्याप्ती चीनपुरतीच राहील ही भाबडी आशा आता मावळायला लागली. उलट, चीनमध्ये लागण होत रुग्णांची संख्या कमी व्हायला



लागली होती. ''आपली परिस्थिती फार बिघडली तर चीनने वापरलेले उपाय आपण अमलात आणणार आहोत का,'' या प्रश्नाला ट्रम्पचे उत्तर होतं, ''हो. चीनने खूपच प्रगती केली आहे हे खरे. आता स्टारबक्स चालू झालंय. ॲपल कंपनीचा टिम कूक परत आलाय. म्हणाला, ॲपलही चालू होतंय.''

''पण चीन हवा तितका पारदर्शक नाही असं ऐकायला मिळतं,'' वार्ताहराने चीनद्वेषपुराण सुरू केले. ''चिनी कम्युनिस्ट पार्टीने फार फसवाफसवी केली.'' त्याने कम्युनिस्ट पार्टी हा नवीन गळ लावला. तरीपण ट्रम्पचे मन कलुषित करण्यात त्याला यश मिळत नव्हते. ट्रम्प हा मनापासून 'बिझनेसमन.' त्याला राजकारणात किंवा राजकीय तत्त्वप्रणालीत तितकासा रस नाही. 'या राष्ट्राध्यक्षाने चीन आणि रशियाबरोबर शांतता प्रस्थापित केली आणि देशाचा त्यांच्याबरोबर बिझनेस वाढवला,' या प्रकारे इतिहासाने आपली आठवण ठेवावी असे त्याला वाटते. पण राजकारणात स्वत:ची पोळी भाजून घेणारे, विशेषत: पत्रकार, त्याला गप्प बसून देत नाहीत.

ॲटलॅंटा येथील CDC (Centre for Disease Control) या अमेरिकेतील महत्त्वतम संस्थेच्या मुख्य केंद्रात ट्रम्प ६ मार्च रोजी म्हणाले, ''आपल्याला इथे काही नवीन मिळालं तर आपण ते चीनला देऊया. त्यांना काही नवीन मिळालं तर ते आपल्याला देतील.'' नंतर वार्ताहरांना म्हणाले, ''चीनची आणि आपली माहितीची मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण चालू आहे.'' त्यांनाही कोरोना लवकरात लवकर संपवायचा आहे. चीनमधील कोरोना पुढच्या चार दिवसांतच संपला. अमेरिकेतले आकडे फुगतच चालले होते. एकूण रुग्ण ३०,०००, एकूण मृत्यू ३००. १९ मार्चपासून वेगवेगळ्या राज्यांत टाळेबंदीला सुरुवात झाली. लोकांत घबराट चालू झाली. दुकानांवर धाडी पडल्या. शेल्फ रिकामे झाले. २१ मार्चला अमेरिका कोरोनाबळींच्या आकडेवारीत चीनच्या पुढे गेली. निवडणुकीचे वर्ष होते. आता दोषारोपाची वेळ आली होती. डेमोक्रॅटिक पक्षाने जबाबदार धरले ट्रम्पना. रिपब्लिकन पक्षाचा बकरा म्हणजे चीन. सुदैवाने ट्रम्प नी त्याच्या पक्षाच्या तत्त्वांविरुद्ध जाऊन कोरोनावरील उपचार विनाशुल्क द्यायचे ठरवले.

''चीननं WHO आणि आपल्याला जानेवारीच्या आधीपासून कळवलं असतं तर बरं झालं असतं. ट्रम्पनी सुरुवात केली. एक वार्ताहर म्हणाला, ''सेक्रेटरी पाम्पेओचा पहिल्यापासून चीनवर संशय आहे. आता तर शंकाच राहिली नाही. चीननं लपवाछपवी केली. खोटं बोलला. रशियासुद्धा खोटं बोलतो,'' वार्ताहर पेटलाच होता, ''आणि इराणसुद्धा!'' ''हे सगळे ओबामाचे पराक्रम, ट्रम्प ओरडले, त्याच्या कारकिर्दीत चीननं आपल्याला अगदी बिनधास्त लुटलं. पण यापुढे नाही. मी चिन्यांना त्यांची जागा दाखवतो.'' ट्रम्पनी यापुढे कोरोनाला चिनी व्हायरस म्हणायचे ठरवले. त्यांच्या आणि डॉ. फाउचीच्या कुरबुरीला हळूहळू सुरुवात होत होती.

२७ मार्च रोजी ट्रम्प परत फिरले. ''माझं आणि प्रेसिडेंट क्सीचं अगदी तपशीलवार बोलणं झालं. कोरोना कसा आला, त्याच्यावर काय आणि कसे उपाय योजले.'' केअर्स (म्हणजे फुकट पैसेवाटप) कायद्यावर सही करायच्या वेळी दोन्ही पक्षांच्या नेत्यांना ट्रम्प म्हणाले, ''चीन आपल्याला त्यांच्याकडचा सर्व डेटा पाठवत आहे.'' दोन्ही पक्षांना हे काही फारसे पसंत पडले नाही. येणाऱ्या निवडणुकीत त्यांना चीन हा मोठा इश्यू करायचा होता. चीनशी ताठरपणे जास्त कोण वागतो यामध्ये दोघांची स्पर्धा आहे. २०१६ च्या निवडणुकीनंतर रशियागेट झाले. २०२० च्या निवडणुकीनंतर चायनागेट करायची पूर्वतयारी चालली आहे. रिपब्लिकन पक्षाच्या आणि रूपर्ट मर्डाकच्या मालकीतल्या 'फॉक्स न्यूज'ने डेमोक्रॅटिक पक्षाच्या आणि जेफ बेझोसच्या मालकीतल्या 'वॉशिंग्टन पोस्ट'चा हवाला देत विचारले, ''चीन, रशिया आपल्याविरुद्ध अपप्रचार करताहेत, त्याबद्दल चीनला विचारलं का?'' ट्रम्प म्हणाले, ''प्रथम म्हणजे आपणही त्यांच्याविरुद्ध तेच करतो. दुसरं म्हणजे, वॉशिंग्टन पोस्टमध्ये बातमी आली आहे म्हणजे नक्कीच खोटी असली पाहिजे.'' या दिवसापर्यंत जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठाने ठेवलेला हिशोब आहे – ८७,००० अमेरिकन लोकांना कोरोनाची लागण आणि १६०० जणांचा मृत्यू.

वीस एप्रिलपर्यंत देशातील परिस्थिती खराब झाली होती. हेरखात्याचा दाखला देऊन एका वार्ताहराने विचाराले, ''करोनाग्रस्तांचे आकडे चीन कमी करून सांगतो, याबद्दल प्रेसिडेन्ट क्सीना विचारलं का?'' ''सगळेच देश असं करतात,'' ट्रम्प यांचे उत्तर. ''आपणपण! देशात उगीच घबराट नको, म्हणून खोटं बोलावं लागतं.'' वार्ताहराने विषय बदलला. ''एवढे चिनी हुशार आहेत तर त्यांना कोरोनाला वूहानमध्येच अडकवून ठेवायला का नाही जमलं?'' ''ते शक्य आहे का?'' ट्रम्पनी विचारले. ''हा रोग नवीन आहे. प्रचंड संसर्गजन्य आहे. आपल्याला इतक्या महिन्यांची वॉर्निंग असतानासुद्धा आपले आज पन्नास हजार लोक मेले आणि नऊ लाख आजारी आहेत.''

अमेरिका हा इतिहासातला सर्वात श्रीमंत देश, पण रोग आल्यापासून इतक्या महिन्यांनंतर येथे पुरेसे PPE नाही, पुरेसे मास्क नाहीत. म्हणून CDC चा डॉ. फाउची सांगतो, ''मास्क वापरू नका.'' कालांतरानं सांगतो, ''मास्क वापरणं अत्यंत गरजेचं आहे.'' कुठल्याही धोरणात एकवाक्यता नाही, दृढता नाही. लोकही मोठ्या प्रमाणात हट्टी आहेत. काही शहाणे (लोकसंख्येच्या तीस टक्के!) तर म्हणाले, ''मास्क म्हणजे झोटिंगशाहीचं प्रतीक.'' त्यांच्या मते मुळात कोरोना हाच झूट असून तो लोकांवर जुलूम करायला सोपे व्हावे यासाठी बनवलेला एक कट आहे. त्यामुळे पार्ट्या करू नका म्हटले, तर ते करणार. चर्चमध्ये जाऊ नका म्हटले, तर जाणार. येथे बळींचे आकडे फुगत चालले होते. आपल्या अंगावर काही येऊ नये म्हणून डॉ. फाउची सर्व गोष्टींचे बिल ट्रम्पवर फाडायला लागला. ट्रम्पनी त्याला हाकलला.

येथे ट्रम्प सर्व गोष्टी WHO वर ढकलू लागले. मे महिन्यात अमेरिका WHO मधून बाहेर पडली. दुष्काळात तेरावा महिना या न्यायाने या ऐन मुहूर्तावर वांशिक दंगली चालू झाल्या. दंगल करणारे त्यांना निषेधमोर्चे म्हणायचे. मोर्चा म्हटला की सलगी आली. म्हणजे रोगप्रसार होऊ नये म्हणून इतरत्र घेतलेली काळजी फुकट गेली. तुम्हाला मोर्चे चालतात पण चर्च नको, किंवा चर्च चालते पण मोर्चा

नको या वादात एक महिना गेला. मोर्चे काढणारे शाळा, ऑफिस उघडायच्या विरुद्ध. शाळा, ऑफिस उघडा म्हणणारे मोर्चे काढायच्या विरुद्ध. सर्व वादांत दोन टोकाची मते. एका बाजूला पोलीसखातेच बंद करून टाका म्हणणारा पक्ष, तर दुसऱ्या बाजूला मिलिटरी आणा म्हणणारा पक्ष. एवढी आग पेटली, पण कोरोना वितळून जायची चिन्हे नव्हती!

अकरा जानेवारीलाच चीनने कोरोनाचा जनुकक्रम जगाला दिला होता. मुक्त बाजारपेठेच्या (Free Markets) मोठ्या गप्पा मारणाऱ्या या देशातला कोणीही माईचा लाल सरकारी मदतीशिवाय औषध करायला तयार होईना. मॉडर्ना या कंपनीला सरकारी 'गूळ' मिळाल्याचे जाहीर झाल्याबरोबर तेथील मॅनेजर लोकांनी प्रथम काय केले असेल, आपले कंपनीतले स्टॉक विकले आणि एक-दोन कोटी डॉलर कमावले. सर्व औषधी कंपन्यांनी मानवजातीच्या कल्याणासाठी एकत्र आले पाहिजे म्हणणारी मंडळी ''आमचं संशोधन रशिया चोरतो,'' अशी बोंब मारण्यात आघाडीवर आली. आश्चर्य म्हणजे अर्थव्यवस्थेत असा भूकंप चालू असताना स्टॉक मार्केट मात्र स्थितप्रज्ञासारखे मजल-दरमजल करून विक्रम करत होते!

औषधाच्या शोधाला काही वर्षे लागणार, मग मधल्या काळात काय करायचे, याच्यावरून भांडणे! (चीन किंवा क्युबाला त्यांनी काय केले हे विचारता आले असते, पण ते पडले गावठी देश! आणि अप्रामाणिक!) प्रत्येकाचे हितसंबंध कुठल्या ना कुठल्या औषधी कंपनीत गुंतलेले. एकाने एक औषध सांगितले तर दुसऱ्याने ''छी: छी:'' करून झटकायचे. आपल्या दोन अमेरिकावासी देशींनी ''न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन'' या अत्यंत प्रतिष्ठ जर्नलमध्ये HCQ हे शरीराला कसे घातक आहे असा पेपर छापला. नंतर कळले, की तो पेपर एक प्रचंड थोतांड होते, आणि तो पेपर मागे घेतला. पण तेवढ्या काळात स्टॉकची खरेदी-विक्री झाली असणारच! माणसे मरतात याचे सोयरसुतक कुणाला नाही. उलट ज्या प्रमाणात माणसे मरतील त्या प्रमाणात औषधांना महत्त्व आणि त्या प्रमाणात औषधांच्या किमती वाढवता येतील हा व्यापारी विचार. अशा परिस्थितीत सामान्य लोकांनी तज्ज्ञांचे ऐकले पाहिजे हे त्यांना कोणत्या तोंडाने सांगणार?

ऑगस्ट २०२० च्या ताज्या बातम्यांप्रमाणे CDC ने जाहीर केले, विलगीकरणाची गरज नाही! हे ट्रम्प यांचे धोरण आहे समजून विरोधी पक्षाने त्यांची थट्टा केली आहे. आणि इकडे कोरोना अक्राळविक्राळ आ पसरून मानवी घास घेत उन्मत्तपणे पुढे चालला आहे.

**- डॉ. मोहन द्रविड**
भ्रमणध्वनी : ९८२०५-६३१३०
mohan.drawid@gmail.bom

ग्रंथाली

भोवताल
राहुल जाधव



समकालीन नोंदी, साहित्यबाह्य लेखन रूपांतर

**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ८० रु.**

ट्वेल्थ फेल
अनुराग पाठक



जीवनसंघर्षमय कादंबरी

**मूल्य १९६ रु.**
**सवलतीत १२० रु.**



सुहासिनी कीर्तिकर

# अवलिया

**सा**ल १९६६. मी एल्फिन्स्टन कॉलेजला शिकवण्यासाठी रुजू झाले होते. त्यावर्षी मराठी वाङ्मय मंडळातर्फे सरिता पदकींचे 'बाधा' हे नाटक सादर झाले. रेखा सबनीसने बसवलेले. नायिका सीमा कांदळगावकर आणि नायक?... सुहास लिमये! त्याला अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळाले. गंमत म्हणजे याच संमेलनात भक्ती बर्वेचा नाच होता. तिला नृत्याचे पारितोषिक लाभले. ही गंमत सुहास लिमये अभिमानाने अगदी आजवर सांगायचा. त्याचा अभिनय, त्याचे उच्चार आणि त्याची भूमिकेविषयीची समज जबरदस्त होती. संस्कृत, इंग्रजी, मराठी, उर्दू... भाषाप्रभू होता तो. त्यासाठी शिक्षकी पेशा स्वीकारूनही तो कायम विद्यार्थी राहिला. म्हणूनच प्रा. म.वा. धोंड यांच्या वयाची नव्वदी साजरी करण्यात त्याचा पुढाकार होता. डॉ. विजया राजाध्यक्ष इंदूरच्या साहित्य संमेलनाध्यक्ष म्हणून निवडून आल्या तेव्हा सुहासनेच पुढाकार घेऊन 'एल्फिस्टोनियन'तर्फे त्यांचा भव्य सत्कार केला. संस्कृतच्या डॉ. जी.डी. दवणेबाईंविषयी मी काही चांगुलपणाच्या हकिकती सांगत असताना सुहास मला थांबवून म्हणाला होता, ''पुरे, पुरे. मला रडू येईल आता.'' असा हा विद्यार्थी! संस्कृतची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती वसुंधरा पेंडसेंबरोबर त्याला विभागून मिळाली होती. संगीताचा त्याला कान होता, आवड होती. मागे एकदा महाराष्ट्र टाइम्सच्या सदरात लक्ष्मण लोंढे यांनी या आपल्या मित्राविषयी लिहिताना याविषयी बरेच सांगितले होते. विद्यापीठीय परीक्षा चालू होत्या, पेपर लिहिता लिहिता सुहासच्या कानावर शेजारच्या इमारतीमधून गाणे आले... हे महाशय लिहिणे थांबवून गाणे ऐकत बसले! त्यांच्या घरी राम दातार हे व्हायोलिनवादक त्याच्या वडिलांनी आसरा दिल्याने राहत होते. मग काय? संगीताची लयलूटच. आमीर खान यांना मराठी शिकवायला लागल्यानंतरची गोष्ट आहे. हे दातार अमेरिकेहून मुंबईत आले होते. ठाकुरद्वारच्या 'प्रभु सेमिनरी'च्या सभागृहात त्यांचे वादन सुहासने ठेवले तर आमीर खानही ते ऐकायला आले होते.

> साहित्य संघाच्या अमराठी भाषकांना मराठी शिकवण्याच्या उपक्रमात सुहास मनापासून सहभागी झाला. परिस्थितीनुरूप खासगी शिकवणीही अधिकृतपणे दिली जाते. आमीर खान यांना सुहासची शिकवणी अशी सुरू झाली. पुढल्या काळात मला मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागप्रमुख डॉ. विभा सुराणा यांचा फोन आला. मात्र त्यांना फारसा वेळ नसल्याने रात्री दहा वाजता फोनवरून सुहासने त्यांना शिकवण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यातून डॉ. विभा यांनी 'अमराठी भाषकांसाठी मराठी' हा प्रकल्पच हाती घेतला. त्यात सुहास शेवटपर्यंत होता. त्याच्या पुढाकाराने प्रकाशनासाठी आमीरच प्रमुख पाहुणा म्हणून लाभले. सुहासच्या ज्ञानाचा, कार्याचा हा गौरव होता.

आमीर खानचा उल्लेख आलाय तर त्यांच्या मराठी शिकण्याविषयी सुहासच्या संदर्भात सांगायला हवे येथे.

'प्रभु सेमिनरी' शाळेतून प्राचार्य म्हणून निवृत्त झाल्याच्या अगदी दुसऱ्याच




**अतुल कुलकर्णी, आमीर खान आणि सुहास लिमये**

दिवशी माझी–त्याची भेट झाली. मुंबई मराठी साहित्य संघातर्फे वा.रा. ढवळे यांनी तेव्हा सुरू केलेले अमराठी भाषकांकरता मराठी शिकवण्याचे वर्ग गेली दोन तपे मी चालवते. मी म्हटले, ''अरे, आता निवृत्त झालास तर या उपक्रमात सामील हो. साहित्य संघ यथाशक्ती मानधन देतो.'' सुहास एका पायावर तयार झाला. साहित्य संघातर्फे सायनला असलेल्या तमीळ साहित्य संघाच्या केंद्रात मी नेमणूक केली. तेथे तो हलकेहलके स्वयंप्रेरणेने संस्कृतही शिकवू लागला. (ते मात्र विनामूल्य!) 'मेघदूत' शिकवायचे तर भारतभर हिंडून त्याने वेगवेगळे संदर्भ असलेल्या सात आवृत्त्या मिळवल्या. 'जिज्ञासावर्ग' सुरू झाला मग. प्रचंड व्यापामुळे ज्यांना मराठी शिकायला साहित्य संघात येता येत नाही, त्यांच्यासाठी परिस्थितीनुरूप खासगी शिकवणीही अधिकृतपणे दिली जाते. अनुपमा प्रभुराम जोशींनी अतुल कुलकर्णी यांना त्याची माहिती दिली. मग अतुल कुलकर्णी यांनी मला त्याविषयी विचारले. साहित्य संघातर्फे आमीर यांना सुहासची शिकवणी अशी सुरू झाली. (अभिनेत्री जेनेलिया यांना मराठी शिकवण्यासाठी साहित्य संघातर्फे मी याच पद्धतीने मीनाक्षी जयकर या स्वयंसेवी शिक्षिका नेमल्या होत्या.) पुढे ही शिकवणी आणि हा शिकवणारा यांचा खूपच गवगवा झाला. मग प्रसारमाध्यमांवर मुलाखती काय, लेख काय! आमीर खान आणि किरण राव सुहासच्या घरी त्याचा पुस्तकसंग्रह बघण्यासाठी जेवायलाही आले होते. सुहासच्या निमंत्रणावरून मलाही त्या पंगतीचा लाभ झाला होता. पुढल्या काळात याच पद्धतीने मला मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागप्रमुख डॉ. विभा सुराणा यांचा फोन आला. मात्र त्यांना फारसा वेळ नसल्याने रात्री दहा वाजता फोनवरून शिकवायचे होते. सुहासने ही जबाबदारी स्वीकारली. त्यातून डॉ. विभा यांनी अमराठी भाषकांसाठी 'मराठी' हा प्रकल्पच हाती घेतला. चर्चासत्रे झाली. या चर्चासत्रात आणि प्रकल्पनिर्मितीच्या प्रक्रियेत मीही सुरुवातीला होते. आमचा जयवंत चुनेकरही होता. 'ग्रंथाली'च्या सहकार्याने 'माय मराठी' प्रकल्पाचे सहा भाग तयार झाले. त्यात सुहास शेवटपर्यंत होता. पहिल्या पुस्तकासाठी त्याने आमीरकडूनही मोठे अर्थसहाय्य मिळवले आणि प्रकाशनाला आमीरच प्रमुख पाहुणा म्हणून लाभले. सुहासच्या ज्ञानाचा, कार्याचा हा गौरव होता.

सुहासने गाजावाजा न करता असे बरेच काम केले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभाग समितीत तो होता, मी आहे. किती किती वर्षांनी ग्रंथमोजणी झाली सुहासच्या सूचनेमुळे! रजनी परुळेकर त्याची वर्गमैत्रीण. तिच्या कवितांचे उडिया भाषेत रूपांतर करायचे होते एकाला. परंतु त्यासाठी इंग्रजी रूपांतर हवे होते. अप्रतिम असे इंग्रजी काव्यरूपांतर या पठ्ठ्याने करून दिले. वसुंधरा पेंडसे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची अध्यक्ष असताना महाकोष उभा राहिला. या महाकोषाला आर्थिक कर माफ व्हावा (80G) म्हणून घटनेची इंग्रजी प्रत हवी होती. महामंडळाची कार्यवाह या नात्याने हे इंग्रजी परिपूर्ण भाषांतर मी सुहासकडून करवून घेतले. व्याकरणशुद्ध, शास्त्रीय परिभाषा वापरून बोरूने लिहिलेले सुंदर अक्षरातील भाषांतर. सुहास 'बोरूबहाद्दर' नव्हता; पण शाळेच्या शिपायाच्या गावाकडून हा विशिष्ट लाकूड मागवायचा. तासून बोरू करायचा. शुद्ध, स्वच्छ, सुंदर असे अक्षर– सुलेखन असावे तसे– त्याच्या लेखणीतून झरायचे. त्यामानाने त्याने लिहिले कमी. वाचले मात्र खूप खूप. पुस्तकसंग्रह फार मोठा. या पुस्तकांना त्याने ठाण्याला नवीन घर दिले होते. स्वत: मात्र गिरगावात दीड खोलीत राहायचा. सर्वत्र पसरलेल्या पुस्तकांतून जागा करून तेथेच पसरायचा. रात्र रात्र वाचन डोळ्यांची पर्वा न करता करायचा. शरीरातील रक्ताची साखर ३६० पर्यंत उच्चांक गाठायची. कॅन्सरचे मोठे ऑपरेशन झालेले. पण ही अडथळ्यांची शर्यत पार करत त्याचे ज्ञानार्जन आणि ज्ञानदान चालूच होते. शेवटी कोरोनापुढे हा हरला. त्याकाळातही त्याचे मला चारचारदा फोन आले. मदतीसाठी पर्याय मागणारे. पण नियतीपुढे कोणताही पर्यायच नव्हता. अखेरीस एका अवलियाची विषण्ण करणारी अखेर झाली.

**– सुहासिनी कीर्तिकर**
भ्रमणध्वनी : ९८२०२५६९७६



**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

# साम्यवादी चीन आणि सत्तालोलुप क्सी जिनपिंग

चीनच्या अध्यक्षांची नेमणूक २०१२ मध्ये झाली. गेल्या ८ वर्षांत त्यांनी त्या लाल देशात बरेच बदल केले. सर्व सत्ता स्वत:च्या हातात केंद्रित करून ते ठोकशाहीचे बादशहा झाले. ते जगातल्या सर्वात मोठ्या लष्कराचे (वीस लाख सैनिक) सुप्रीम कमांडर व अंतर्गत सुरक्षायंत्रणेचे प्रमुख. सगळी न्यायव्यवस्था त्यांच्या मुठीत आहे. त्या देशातली न्यायदेवता डोळ्यावर पट्टी बांधून न्याय देण्याऐवजी देशप्रमुखाला धार्जिणे असलेल्यांना न्याय देते. महत्त्वाचं म्हणजे देशात सर्वबलशाली समजल्या जाणाऱ्या साम्यवादी पक्षाचे ते मुख्य आहेत. सर्व राजकीय शक्त तिथे उगम पावत असल्यामुळे क्सी जिनपिंग किती बलशाही आहेत याची कल्पना येईल. त्या देशात भारताप्रमाणे १६०० हून अधिक राजकीय पक्ष नसून एकच पक्ष आहे. म्हणून क्सी जिनपिंग जगातले सर्वाधिक बलवान हुकूमशहा म्हणून ओळखले जातात. ते चेअरमन नाहीत अशी एकही संस्था चीनमध्ये नाही असं म्हणतात. आता त्या देशानं अमेरिकेला शह देऊन त्या दोन देशांत व्यापारयुद्ध सुरू करून भारतावर आक्रमण केल्यामुळे क्सी जिनपिंगची सत्तालोलुप वृत्ती प्रकाशात आली आहे व तिला या संदर्भात एक वेगळं परिमाण लाभलं आहे. त्याचं स्वरूप जाणून घेणं उद्‌बोधक ठरेल.

> हुकूमशहा क्सी जिनपिंग इतिहासाचे व विशेषत: इतिहासात नामशेष झालेल्या महासत्तांचे गाढे अभ्यासक आहे. सोव्हिएट युनियनमधला साम्यवाद का संपुष्टात आला याची कारणं शोधण्यात त्यांना विशेष रस आहे. यात त्यांचं आत्महित आहे म्हणा. त्यांच्या मते सोव्हिएत युनियन पडण्याचं मुख्य कारण देशप्रमुखांनी हातातली सत्तासूत्रं ढिली होऊ दिली. म्हणून त्यांनी देशातली सर्व सत्ता स्वत:च्या हातात केंद्रित केली आहे आणि तिचा निर्दयपणे वापर केला आहे.

**निरंकुश सत्ता**

त्यांच्या सत्तेत असलेला धोका असा, की ती निरंकुश आहे. नाही म्हणायला त्यांच्यावर नजर ठेवायला सात सदस्यांचा पोलिटब्यूरो आहे. पण, त्याचे सर्व सदस्य क्सी जिनपिंगनी नेमल्यामुळे ते त्यांना निष्ठावंतच नव्हे तर धार्जिण आहेत. सत्तेवर येताच त्यांनी भ्रष्टाचाराचं निमित्त काढून अडीच-तीन लाख सरकारी नोकरांना डच्चू दिला. या झाडलोटीत त्यांच्या विरोधकांचा भरणा जास्त होता. त्या देशात माध्यमांची चिकित्सक दृष्टीही नाही, कारण ती सर्व त्यांच्या अंगठ्याखाली आहेत. त्यांना विरोध करण्यास या देशात कुठलीच शक्ती उरली नाही. त्यांची सत्तेवरची पकड घट्ट आहे. साम्यवादात मतदारांनाही तोंड द्यावं लागत नाही. लोकशाहीत मतदानाचं प्रभावी शस्त्र वापरून उन्मत्त व सत्तांध देशप्रमुखाला पदच्युत करता येतं, पण अशी काळजी क्सी जिनपिंगना मुळीच नाही.

यांना सत्तामुदतही नाही. माओच्या अतिरेकी सत्तावापरामुळे तो गेल्यावर चीनच्या राज्यघटनेत चेअरमनची मुदत एकूण दहा वर्षाची असे. मात्र क्सी जिनपिंगनी आपलं वजन वापरून ही मर्यादा बाद केली. त्यामुळे ते आडवे होईपर्यंत चेअरमन म्हणून उभे राहतील. याप्रमाणे त्यांची सत्ता निरंकुश असल्यामुळे जगाच्या दृष्टीनं चिंताजनक आहे. कारण अशा सत्तेची नशा मदिरा किंवा अफूपेक्षा जास्त धोक्याची



**चीनच्या सरहद्दीवर पहारा करणारे भारतीय जवान**

असते. याचं कारण असं, की व्यसनापासून होणारी हानी व्यक्तीकेंद्रित तर सत्तांध नेता उभ्या देशाला किंवा आजकालच्या महासंहारक शस्त्रांमुळे सगळ्या जगाला धोक्यात आणू शकतो.

हुकूमशहा क्सी जिनपिंग इतिहासाचे व विशेषत: इतिहासात नामशेष झालेल्या महासत्ताचे गाढे अभ्यासक आहे. सोव्हिएट युनियनमधला साम्यवाद का संपुष्टात आला याची कारणं शोधण्यात त्यांना विशेष रस आहे. यात त्यांचं आत्महित आहे म्हणा. त्यांच्या मते सोव्हिएत युनियन पडण्याचं मुख्य कारण देशप्रमुखांनी हातातली सत्तासूत्रं ढिली होऊ दिली. म्हणून त्यांनी देशातली सर्व सत्ता स्वत:च्या हातात केंद्रित केली आहे आणि तिचा निर्दयपणे वापर केला आहे. पश्चिमेला असलेल्या क्सीनजियांग प्रांतातील वुईघूर नावाच्या पंथाच्या मुस्लिमांचा नाश केला. तसं करताना कुठलीही दया दाखवण्यात येऊ नये असा त्यांचा गुप्त आदेश न्यू यॉर्क टाइम्सनं नुकताच प्रसिद्ध केला. त्यांचे २-३ दशलक्ष पुरुष कैदेत कोंडून त्यांचा रीतसर बुद्धिभेद करण्यात आला. नमाज, पांढरी गोल टोपी आणि दाढी या धर्मसूचक गोष्टींवर बंदी घालण्यात आली. मशिदी पाडून टाकण्यात आल्या.

पूर्वेला हाँगकाँगमध्ये स्वातंत्र्यवाद्यांच्या चळवळीचा त्यांनी शस्त्रं वापरून नाश केला. वाजवीपेक्षा जास्त बल वापरून विद्यार्थ्यांना पकडलं. याची दृश्य अमेरिकेतील दूरदर्शनवर सारखी दाखवण्यात आली. अमेरिकेच्या संसदेनं एकमुखी विधेयक संमत करून जिनपिंगला धारेवर धरलं. संसदेनं स्वातंत्र्यवाद्यांना पाठिंबा देऊन जे चिनी अधिकारी त्यांच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाला जबाबदार आहेत त्यांना अमेरिकेचा व्हिसा मिळवण्यावर बंदी घातली. त्याला चीननं तीव्र विरोध केला. अरुणाचल प्रदेशाच्या रहिवाशांना सरळ व्हिसा न देता स्टेपल्ड व्हिसा देणाऱ्या उन्मत्त देशाला अमेरिकेनं धडा शिकवला.

या मानवाधिकारांच्या उल्लंघनाचे दोन देशांतील संबंधांवर दूरगामी परिणाम होत आहेत. ते पूर्वीसारखे सौहार्दाचे कधीच होणार नाहीत. या अनुषंगानं चीननं जी घोषणा केली ती महत्त्वाची होती. पकडलेल्या स्वातंत्र्यवाद्यांना हाँगकाँगच्या कायद्याखाली न्याय देण्यात येणार नाही असं माध्यमांनी म्हटलं. त्याऐवजी त्यांना बेजिंगच्या न्यायव्यवस्थेला तोंड द्यावं लागेल असं चीननं जाहीर केलं आणि त्याचे जगाला हादरे बसले. आतापर्यंत तिथे होणारे सर्व आर्थिक व्यवहार हाँगकाँगच्या ब्रिटिश कायद्यानुसार होत असत. पण आता बेजिंगचे कायदे लागू पडणार असतील तर परदेशी गुंतवणूकदार दक्ष होऊन आपली गुंतवणूक दुसऱ्या ठिकाणी नेतील हे उघड आहे. याचे दूरगामी परिणाम होऊन हाँगकाँगचं आज जागतिक वित्तकेंद्र म्हणून जे स्थान आहे त्याला धक्का बसेल. क्सी जिनपिंगच्या कायद्याखाली राहणं परदेशी; विशेषत: अमेरिकन गुंतवणूकदारांना मुळीच आवडणार नाही.

कुठल्याही सत्तेला दोन प्रकारचे धोके असतात. एक बाह्य व दुसरा अंतर्गत. याची इतिहासप्रेमी क्सी जिनपिंगला चांगली कल्पना आहे. दुसऱ्या महायुद्धात चीन दुर्बल होता. पाश्चात्त्यांनी त्या देशाचं शोषण करून अफूची सवय त्यांच्या गळी उतरवली. ती ब्रिटिशांनी भारतातून नेली. असा अपमान चीन यापुढे कधीही स्वीकारणार नाही असं क्सी जिनपिंगनी जगाला सांगितलं. त्यांनी चीनचं लष्कर इतकं आधुनिक, सबळ व शस्त्रसज्ज केलं, की अमेरिका सोडून दुसरा कुठलाही देश त्या साम्यवादी राष्ट्राला शह देऊ शकत नाही. त्यांनी दक्षिण चीन समुद्राचं लष्करीकरण करून शेजारील देशांना भीतीग्रस्त केलं. सुरुवातीला अमेरिकेचा रोष ओढवू नये म्हणून चीननं आपली प्रगती जगापासून लपवून ठेवली व आपण एक गरीब देश असून लोकांचं राहणीमान वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहोत असं सोंग केलं. त्यामुळे जगाच्या मनात अनुकंपा निर्माण होऊन ट्रम्पनी बोलबोला करेपर्यंत त्या देशानं (World Trade Organisationकडून (WTO) व्यापार सवलती लाटल्या. पण अमेरिकेच्या अध्यक्षांनी हे बिंग फोडलं. त्याचा पुरावा १ ऑक्टोबर २०१९ रोजी जगाला मिळाला. साम्यवादी राजवटीचा सत्तरावा वर्धापनदिन साजरा करताना क्सी जिनपिंगनी टियननमन स्क्वेअरमध्ये जे शस्त्रप्रदर्शन केलं ते बघून जग थक्क झालं. तिथे दोनशेहून अधिक वेगवेगळे शस्त्रप्रकार दाखवण्यात आले. काही एवढे आधुनिक की ते अमेरिकेच्या सैन्यातदेखील सापडत नाहीत. बरेच अमेरिकेची बौद्धिक संपदा चोरून विकसित केले असले तरी त्या देशाची स्तुती करावी तेवढी थोडीच. त्या देशाचं नवीन आंतरखंडीय क्षेपणास्त्र अमेरिकेच्या कुठल्याही शहरापर्यंत पोचू शकतं. महत्त्वाचं म्हणजे त्याच्या शिरात दहा अणुबॉम्ब बसवले असून ते स्वतंत्रपणे वेगवेगळ्या लक्ष्यांचा भेद करू शकतात त्यासाठी अमेरिकेची प्रतिक्षेपणास्त्र यंत्रणा (Antimissle Defense) कुचकामी ठरते.

या शास्त्रास्त्रांचं दुसरं एक वैशिष्ट्य म्हणजे त्या सर्वांची देशांतर्गत निर्मिती होते. भारतानं १९७४ मध्ये व त्यानंतर एका वर्षानं पाकिस्ताननं अणुचाचणी केली तेव्हा अमेरिकेनं अणुप्रसार केला म्हणून

दोन्ही देशांवर बंधनं घातली व या देशांना लंगडं केलं. अशी वेळ पुन्हा येऊ नये म्हणून भारतानं अमेरिकेची F-16, F-22 वगैरे लढावू विमानं श्रेष्ठ दर्जाची असूनही फ्रान्सकडून राफेल विकत घेण्याचा शहाणपणा केला. आपण अजूनही त्यांची निर्मिती देशात करू शकत नाही.

चीनच्या बाबतीत हा प्रश्नच उद्‌भवत नाही. तो जवळजवळ सर्व शस्त्रं देशांतर्गत निर्माण करतो. त्यासाठी लागणारे सगळे सूटे भाग देशातच तयार होतात. त्यामुळे अमेरिकेचा त्यावर प्रभाव पडू शकत नाही. आता चीन जगभर शस्त्रास्त्र विकण्यास अमेरिकेशी स्पर्धा करतो. या बाबतीत भारत ग्राहक असून तो जगात सर्वाधिक शस्त्रं आयात करून त्यावर मूल्यवान परदेशी चलन उधळतो.



चीनच्या सरहद्दीवर लष्करी साहित्य घेऊन जाणारी भारतीय वाहनं

याप्रमाणे क्सी जिनपिंगनी लष्करावर दरवर्षी २२१ अब्ज डॉलर (अमेरिका ७१५ अब्ज डॉलर व भारत ५१ अब्ज डॉलर) खर्च करून बाह्य हल्लयाची शक्यता जवळजवळ शून्य केली.

पण कुठल्याही हुकूमशाहीला अंतर्गत शक्तीपासून धोका पोचू शकतो. किंबहुना बाह्य हल्ल्यापेक्षा देशातली अज्ञात शक्ती त्याला उलथून टाकण्याची शक्यता जास्त असल्यामुळे क्सी जिनपिंग अंतर्गत सुरक्षेवर लष्कराऐवढेच किंवा त्यापेक्षा जास्त पैसे खर्च करतात हे जगाला ठाऊक नाही. यात पोलिसांचा समावेश होत नाही. या सुरक्षादलाचं काम गुन्हेगारांना पकडणं हे नसून जनतेवर पाळत ठेवणं व राजकीय विरोधकांना पकडून शिक्षा करणं आहे. स्वातंत्र्याची चळवळ करणारे बीजावस्थेत कुस्करून टाकले जातात. वुईघूर व हाँगकाँग या प्रकारणांवरून ते सिद्ध होतं. तीस वर्षांपूर्वी टियननमन स्क्वेअरमध्ये जी स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली व जी बघून तत्कालीन नेते लष्करी छावणीत लपून बसले त्याविषयी क्सी जिनपिंगचं मत वेगळं आहे. अधिक शक्ती वापरून आपण ती केव्हाच चिरडून टाकली असती असं ते म्हणतात. त्यांनी त्या चळवळीचा तिसावा वाढदिवस साजरा करण्यावर सक्त बंदी घातली. एवढंच नव्हे तर तो दिवस इतिहासातून पुसून टाकला. त्यामुळे नवी पिढी त्याविषयी अनभिज्ञ आहे. साम्यवाद्यांना गैरसोयीच्या इतिहासाची सफाई करण्याची सवयच आहे.

आज क्सी जिनपिंगचे हेर सर्व चीनभर पसरले आहेत. सरकारच्या प्रत्येक शाखेत, कंपन्यांच्या संचालक मंडळावर व संस्थेत साम्यवादी पक्षाचे प्रतिनिधी आढळतात. त्यांचं काम क्सी जिनपिंगसाठी हेरगिरी करणं तर आहेच, पण महत्त्वाचं म्हणजे हे सर्व सरकारची पुंगी वाजवतील व क्सी जिनपिंगविरुद्ध कुठले कट रचणार नाहीत याची खबरदारी घेणं. हे हेर किंवा साम्यवादी पक्षाचे प्रतिनिधी जिनपिंगला निष्ठावंत तर आहेत, ते त्यांची चेता व्यवस्था (Nervous System) समजण्यात येते. देशात कुणी कुठलं पाऊल उचललं तर ते त्यांना तत्काळ कळतं व त्याची दखल घेण्यास मदत होते.

हे हेराचं जाळं महत्त्वाचं असलं तरी क्सी जिनपिंगनी जनतेला आपल्या अंगठ्याखाली ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरलं आहे. त्यासाठी ते अत्याधुनिक चेहराओळख तंत्रज्ञान (Facial Recognition Technology) वापरून जनतेवर डोळा ठेवतात. त्यासाठी त्यांनी १.४ अब्ज लोकांची वैयक्तिक माहिती गोळा करून ती भव्य संगणकात साठवली. तुमचा घटस्फोट, घराची किंमत, मित्र, सवयी हे सर्व सरकारला माहीत असतं. एकच पुरे'ची योजना अमलात आणण्यासाठी प्रत्येक स्त्रीच्या मासिक पाळीची नोंद सरकारी परिचारिका करत असे. पाळी चुकली की त्यांना गर्भपात करून घेण्याची सक्ती करण्यात येते.

चीनमध्ये जवळजवळ सगळे आर्थिक व्यवहार भ्रमणध्वनीवर होतात. ही माहिती सरकार गोळा करते. हा विदा (डेटा) म्हणजे सोन्याची खाणच. त्याचं संगणकीय विश्लेषण करून अल्गोरिदम विकसित करण्यात येतात. यावरून एखाद्या विरोधकाची वर्तणूक कळून त्याच्यावर पाळत ठेवता येते. मोर्च्यात भाग घेणाऱ्यांची ओळख चेहराओळख तंत्रज्ञानानं होऊन त्याची नोंद होते. म्हणून चीनमध्ये तोंडावर मुखवटे लावण्यावर बंदी आहे आणि हे ओळखून हाँगकाँगमधले स्वातंत्र्यवादी आंदोलक चेहरे लपवून ठेवण्यासाठी ते वापरत होते. त्यावर क्सीनी बंदी घातली म्हणा.

कुठल्याही लोकशाहीत अशी वैयक्तिक माहिती जनतेच्या संमतीशिवाय गोळा करण्यावर बंदी असते. अमेरिकेत तर गुन्हेगार पकडण्यासाठी चेहराओळख तंत्रज्ञान पोलिसांनादेखील वापरता येत नाही. या माहितीचा सरकार दुरुपयोग करते इकडे दुर्लक्ष करण्यात येतं. साम्यवादात तशी बंधनं नसतात. याशिवाय सर्व परदेशी कंपन्यांनी (ॲपल, गूगल वगैरे) महाजालावर जनता कुठल्या संकेतस्थळांना भेट देते वगैरे माहिती देशांतर्गत साठवून ठेवण्याची क्सीनी सक्ती केली. हेतू हा की सरकारला ती तत्काळ उपलब्ध व्हावी. गूगलवर तर बंधनं घालण्यात आली. राजकीयदृष्ट्या संवेदनशील समजली जाणारी संकेतस्थळं वगळण्यात आली. त्यामुळे क्सी जिनपिंगविरुद्ध कुणी प्रचार करू शकत नाही. चीनमध्ये फेसबुक उपलब्ध नाही. गूगल चिनी सरकारला शरण गेलं म्हणून अमेरिकन लोकांचा कंपनीवर रोष आहे. क्सींनी हे आधुनिक तंत्रज्ञान क्सीनजियांग या पाश्चिमात्य प्रांतातील मुस्लिमांवर वापरून त्यांच्या धर्माचा नाश तर केलाच, पण त्यामुळे दंगामस्ती होऊ दिली नाही. त्याचं श्रेय या तंत्रज्ञानाला जातं.

चीनमधील भव्य विदाकोषाचा (Data Bank) उपयोग क्सीनी प्रत्येक चिनी व्यक्तीविषयी चरित्रपत्र (Social Card) विकसित करण्यासाठी केला. नेहमीच्या पतपत्रासाठी पतइतिहास (Credit

History) बघण्यात येतो. त्याशिवाय कुठलंच कर्ज बँक देत नाही की घर किंवा कार विकत घेता येत नाही. देयकं नियमितपणे व वेळेवर चुकती करण्याचा इतिहास असलेल्यांना कमी व्याजाचं कर्ज मिळतं. दिवाळं निघालेल्यांना सात वर्षं बँकेची पायरी चढता येत नाही.

या धर्तीवर क्सीनी चरित्रपत्र विकसित केलं. जीवनातल्या घडामोडी लक्षात घेऊन प्रत्येकाला ठरावीक गुण देण्यात येतात. गुन्हा करणाऱ्यांना मद्यधुंदीचं व्यसन असणाऱ्यांना, विभक्त कुटुंब असलेल्यांना व महत्वाचं म्हणजे क्सी जिनपिंगशी निष्ठा न दाखवणाऱ्यांना ऊणे गुण मिळतात, तर सरकार जी आदर्शवादी वागणूक समजते ती असलेल्यांना जास्त गुण दिले जातात. क्सीविरुद्ध मोर्चे काढले, आंदोलनात भाग घेतला किंवा सरकारवर शिंतोडे उडवले तर आपला गुणांक खालच्या दर्जाचा असून आपण मागासवर्गात फेकले जातो. अशा लोकांना विमानाची किंवा शररेल्वेची (Bullet Train) तिकिटं, सरकारी नोकऱ्या, चांगल्या कॉलेजात प्रवेश व अनेक कल्याणकारी योजनांचे लाभ यापासून वंचित ठेवण्यात येतं. चांगला गुणांक असलेल्यांना मात्र सरकारी जावयाची वागणूक देण्यात देते.

या चरित्रपत्रामुळे सामाजिक वागणूक बदलत असून अध्यक्षांना धार्जिण असलेला समाज निर्माण होत आहे. यामुळे निम्न व उच्चस्तरीय जात निर्माण होऊन त्यांच्यामधून विस्तव आडवा जात नाही. समाजात कुणाशीही संगती ठेवल्याची चरित्रपत्रात नोंद होत असल्यामुळे उच्चवर्गीय निम्नस्तरियांना डावलून इतर उच्चवर्गीयांशी संबंध ठेवतात. लग्न करताना हा गुणांक लक्षात घेतला जातो. आपला गुणांक घसरू नये म्हणून हे लोक क्सी जिनपिंग राजवटीला विरोध करत नाही. उलट त्यांना पाठिंबा देतात. निम्नस्तरियांना आपला गुणांक वाढवण्याचा एकच मार्ग तो म्हणजे वागणूक बदलून सरकारला शरण जाणं व स्वंतत्र राजकीय विचार करणं सोडून देणं. याप्रमाणे या चरित्रपत्रामुळे अध्यक्षांना हितकारक सामाजिक स्थित्यंतरं चीनमध्ये आपोआप होत असून त्यांच्या राजवटीला अंतर्गत धोका कमी झाला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा असा वापर जगात कुठल्याच राजकारण्यानं केला नाही.

चीनची झपाट्यानं प्रगती होण्याचं एक कारण असं, की सुरुवातीपासूनच म्हणजे डेंग क्सियाओपिंग पदावर आले तेव्हा त्यांनी भांडवलशाहीची काही मूल्य अंगिकारली. त्यामुळे प्रचंड परदेशी भांडवल देशात आलं. पण चीनची भांडवलशाही अमेरिकेप्रमाणे बाजारसन्मुख नसून सरकारी नियंत्रणासाठी आहे. म्हणजे शासन बाजारपेठेत लुडबूड करून मरणासन्न स्थितीत असलेल्या सरकारी कंपन्यांना वेळ आली तर टेकू देऊन जिवंत ठेवू शकतं. अशा दीड लाखापेक्षा जास्त कंपन्या चीनमध्ये असून त्यांची एकूण संपत्ती ट्रिलियन डॉलर आहे. काही अपवाद सोडले तर असं अमेरिकेच्या भांडवलशाहीत होत नाही. या मूलभूत फरकामुळे हल्ली ट्रम्प व क्सी जिनपिंगमध्ये तिढा निर्माण झाला. चीनच्या अध्यक्षांना भांडवलशाहीचा चिनी गुण महत्त्वाचा वाटतो कारण त्यामुळे सरकार अर्थकारण आपल्या अंगठ्याखाली ठेवू शकतं. ते मनात येईल तेव्हा चलनाचं अवमूल्यन व व्याजदर कमी करून निर्यात वाढवू शकतात. बाजारपेठीय शक्तींना डावलून जिनपिंग अर्थकारणाची सूत्रं स्वतःच्या हातात ठेवतात. त्यामुळे अमेरिकन कंपन्यांना स्पर्धा करणं कठीण झालं आहे. कारण त्यांना सरकारकडून तशा सुविधा उपलब्ध नाहीत. क्सी जिनपिंगला चिनी मूल्य असलेल्या या राज्य भांडवलशाहीचा (State Capitalism) फार अभिमान वाटतो व ते त्यात बदल करण्यास तयार नाहीत. तसं केलं तर त्यांच्या सत्तेचा शक्तिपात होईल.

त्यांचे हसऱ्या चेहऱ्याचे फोटो जगभर दूरदर्शनवर व वर्तमानपत्रात नेहमी झळकतात. पण तो एक मुखवटा आहे. वास्तवात कुठल्याही हुकूमशाहप्रमाणे ते कठोर, निर्दयी व मुत्सद्दी आहेत. हे गुण त्यांनी बालपणीच आत्मसात केले कारण त्यांच्या मनाची व विचारांची जडणघडण माओच्या मुशीत झाली. त्यानं क्रांती केली तेव्हा क्सीचे वडील एक उच्चपदस्थ अधिकारी होते. अशा पांढरपेशा लोकांची त्या काळात उपेक्षा करण्यात येई. माओनं मानस बदलण्यासाठी अशा लोकांना कष्टाची कामं करण्यासाठी देशाच्या अंतर्गत भागात पाठवलं आणि कुटुंब विभक्त झालं. लहानग्या क्सीवर हलाखीचे दिवस ओढवले. त्याला एका गुहेत राहून पोट भरण्यासाठी डुकराचं शेण उपसावं लागलं. या कठोर शिक्षेमुळे क्सीच्या मनात माओविषयी द्वेष निर्माण व्हायला हवा होता, पण तसं न होता त्याविषयी आदर वाढला. कॉलेज शिक्षण कसंबसं संपवून त्यानं साम्यवादी पक्षाचा सदस्य होण्यासाठी अर्ज केला. वडिलांच्या इतिहासामुळे तो धुडकावून देण्यात आला. त्यामुळे निराश न होता त्यानं पुन्हा अर्ज केला. तोही नाकारण्यात आला. पण क्सीनं माघार घेतली नाही. त्यानं दहा-बारा अर्ज केले आणि शेवटी तो स्वीकारण्यात आला. त्यानं निष्ठेनं पक्षाचं काम केलं. त्यावेळी चीनमध्ये भ्रष्टाचार बोकाळला होता. क्सी मात्र भ्रष्टाचारमुक्त राहिला. हे बघून त्याला एका राज्याच्या निवृत्त वेतन संचितातील गैरव्यवहार दूर करण्यास पाठवण्यात आलं. ते काम त्यानं उत्तमपणे बजावलं. मग २००८ मध्ये त्याच्यावर मोठी जबाबदारी लादण्यात आली. ऑलिंपिक सामने त्यावर्षी चीमध्ये संपन्न झाले. ते काम सोपं नव्हतं. एकूण ४५ अब्ज डॉलर खर्च करून चीनला जागतिक पातळीवर झळकण्याची व प्रतिमा उजळ करण्याची ती एकमेव संधी होती. एवढा मोठा अर्थसंकल्प म्हणजे भ्रष्टाचारासाठी सुपीक जमीनच. पण, क्सीनं आपलं व्यवस्थापनचातुर्य वापरून, कुठलाही कलंक न लागू देता, ते सामने निर्विघ्नपणे पार पाडले. त्यामुळे जगानं प्रथमच साम्यवादी चीनची दखल घेतली. त्यानंतर अवघ्या चार वर्षांनी- २०१२ मध्ये त्यांना देशाच्या मुख्याचं पद चालून आलं. त्यांनी आठ वर्षांच्या कारकिर्दीत चिनी लष्कराचं आधुनिकीकरण केलं व अमेरिकेला शह दिला. २०१६ मध्ये ट्रम्प अध्यक्ष म्हणून निवडून आले आणि चीनच्या ध्येयाला एकदम चाप बसला.

ट्रम्पनी ठोकर मारल्यामुळे क्सी जिनपिंगचा अपेक्षाभंग झाला हे निश्चित.

**- अनंत पां. लाभसेटवार**

(लेखक अमेरिकेच्या फर्स्ट नॅशनल बँक व ट्रस्ट कंपनीचे
१४ वर्षे चेअरमन ऑफ दि बोर्ड होते.)

anantlabh@gmail.com



**सॅम कार्व्हर**

# गॅलरीमॅन

पूर्वी घरी लँडलाइन फोन घेण्यासाठी चार-चार वर्षं प्रतीक्षायादी होती. आता मोबाइल सेवा पुरवठादार तुम्हाला त्यांचे गिऱ्हाईक करून घेण्यासाठी विविध प्रलोभनं दाखवतात. मोबाइलविक्रीचे आता दुकान नसते, तर गॅलरी असते. त्यातल्याच एका 'गॅलरीमॅन'च्या विक्रीकौशल्याचा अनुभव आणि त्यावरील खुसखुशीत भाष्य....

'चीनचं आव्हान वाढल्यामुळे मी माझं घर बंकरमध्ये हलवलंय का?' असा प्रश्न मला एका मित्रानं विचारला. मला तो प्रश्न काही कळला नाही. परंतु इतर अनेक जण याचप्रकारे आडून आडून चौकशी करू लागले, तेव्हा मला काहीतरी काळंबेरं जाणवू लागलं. मधाळ आवाजात लोनसाठी गळ घालणाऱ्या ललनांचं (काय माहिती पलीकडे कोण असतं) संभाषण मध्येच तुटू लागलं. तेव्हा मला लक्षात आलं की आपल्या फोनला रेंज मिळत नसल्यानं हे सगळे आपली फिरकी घेत आहेत. खरं तर संभाषण तुटू नये म्हणून मी खिडकीच्या ग्रिलमध्ये उभं राहून बोलण्याचे प्रयोगही करून पाहिले होते. पण आता लोक व्हिडिओ कॉल वगैरे करायला लागल्यानं ते वाईट दिसू लागलं. त्यामुळे मी माझा फोन ऑपरेटर बदलण्यासाठी जाहीर निविदा वगैरे मागवाव्यात का, असा विचार करू लागलो. त्याच दरम्यान सेल्समधला एक भलामाणस मला भेटला. तो चक्क माझ्या घरी येऊन रेंजची चाचणी करून गेला. तो म्हणाला, 'सर, मेरा सेल्स का ष्टाइल थोडा डिफरन्ट है.. .मैं सेलसे पहले कस्टमर को नीड-बेस्ड सोल्युशन ऑफर करता हूँ. नहीं तो क्या, आपको मैं बेचूंगा और रेंज नहीं मिला तो आपको खाँमखाँ तकलीफ और आपभी मुझे सताएंगे...'. गॅलरीतला सेल्समन एवढा गहन विचार करतो, या अनुभवानं मला भरून आलं. या विक्रीपश्चात सेवाकेंद्राला गॅलरी का म्हणतात, ते मला आजवर कळलेलं नाही. गॅलरीत लोक गप्पा छाटायला किंवा टैमपासला उभे राहतात. या गॅलरीत तासन् तास एका मऊ लुसलुशीत स्टुलावर ताटकळत राहावं लागतं. 'बरं, नंबर आल्यावर ते टीशर्ट घातलेले पोरं-पोरी आपल्याला फाडफाड ऐकवतात, गोड बोलतात, पण चल फूट ..' असाच आशय असतो. अव्वाच्या सव्वा बिल आलंय असं सांगितलं, की कोणकोणत्या सेवा आपण वापरल्या त्यांचे आकडे समोर ठेवतात. तर अशा या गॅलऱ्या. या गॅलरीत हा भलामाणस भेटला, म्हणजे मी पडायचाच बाकी होतो. या गॅलरीतला किस्सा सांगण्यापूर्वी माझ्या इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सच्या बायोडेटाची पार्श्वभूमी तुम्हाला सांगायलाच हवी.

इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि माझं तसं वाकडं असल्यानं प्रत्येक नव्या वस्तूच्या एक्स्टेंडेड वॉरन्टीचा मी तसा पुरेपूर वापर करून घेतो. मी पहिला स्मार्टफोन घेतला, तेव्हा तो ४० दिवसांत त्रास देऊ लागल्यानं कंपनीच्या व्हीपीपर्यंत ईमेल धाडून मी पाठपुरावा केला होता. खूप पाठपुरावा केल्यावर सर्व्हिस सेन्टरमधला 'मराठी मॅन' ओळखीचा झाला. थेट व्हीपींकडून माझी केस आल्यानं या 'मराठी मॅन'चा तसा फारसा उपयोग नव्हता, पण शिळोप्याच्या गप्पा टाकायला बरं होतं. पुढचे सलग २६ दिवस 'प्रभाते प्रभाते कंपनीला मेल टाकावा', हा शिरस्ता मी गिरवला. तक्रारीशिवाय आपला दिवस सुरू करायचा नाय, असा निर्धार मी केल्यामुळे अखेर




शिवाय वर्षभर चित्रपट, म्युझिक डाऊनलोड, कॉलरट्यून अशा अनेक सुखसोयी त्यानं दिल्या होत्या. मी पार हुरळून गेलो होतो. लोकांनी फोन केल्यावर त्यांना चांगली चांगली गाणी ऐकवायची, त्यासाठी पूर्वीची कंपनी माझ्याकडून महिना १५ रुपये घ्यायची. आता मला ती सेवा विनामूल्य मिळणार होती. म्हणजे आतापर्यंत कोट्यवधी संगीतप्रेमी रसिक जनतेवर किती अन्याय होत होता, हे मला या गॅलरीत कळून चुकलं. वर्षभरात चित्रपट व गाणी यासह साधारण पाच हजार रुपयांच्या सेवा ते विनामूल्य देणार होते. याचाच अर्थ आतापर्यंत मी या गॅलरीत न आल्यानं अनेक चित्रपटवाले दर्दी प्रेक्षकाला मुकले होते. आता या सर्व अन्यायाचा अनुशेष भरून निघणार, या आनंदानं माझा चेहरा फुलला. हा गॅलरीवाला

कंपनीनं मला तेवढ्याच किमतीचा चेक देऊन टाकला आणि मी तो मोबाइलही त्यांना परत केला. तेव्हापासून त्या कंपनीचे मोबाइल मी घेत नाही. तरीही कंपनीचं चांगलं चाललंय. चेक मिळाल्यावर या 'मराठी मॅन'ला मी उगाचच धन्यवाद द्यायला फोन केला, तर त्यानं ती नोकरी सोडल्याचं सांगितलं. म्हणजे माझा कंपनीवरचा राग बरोबर असावा, यावर शिक्कामोर्तब झालं. पण, 'तुमच्या केसमध्ये कस्टमरची बाजू उचलून धरल्यामुळे माझ्यावर बॉसनं राग धरला', असं या मराठी मॅन'नं मला सुनावलं. 'मला असल्या कंपनीत काम करायचं नव्हतं, फॉल्टी पीस काढतातच कशाला', असं म्हणत त्यानं आपल्या स्वाभिमानी मराठी बाण्याचंही दर्शन घडवलं. तेव्हा माझाही गिल्ट जरा कमी झाला.

'हं, तर माझा इलेक्ट्रॉनिक बायोडेटा हा असा तक्रारखोर. वस्तू बिघडणं, उत्पादकाकडे वारंवार खेटे घालण्याची वेळ येणं वगैरे वगैरे याची आता सवयच झाली आहे. त्यामुळे या गॅलऱ्या, सर्व्हिस सेंटर इथे माझ्या ओळखीपाळखी खूप आहेत. जी तऱ्हा हँडसेटची तीच ऑपरेटरचीही झाली नसती, तरच नवल. तरीही 'लगे रहो', हा आपला मंत्र असल्यानं मी या फोन ऑपरेटरला चांगलाच आव्हानात्मक ग्राहक वाटलो असणार.

या 'आऊट ऑफ द बॉक्स' म्हणजे खरोखरच फोनच्या बॉक्सपलीकडे विचार करणाऱ्या सेल्समननं प्रथम सेव्हन फॉर्टीनाइन'चा एक प्लॅन मला विकला. दुसऱ्या दिवशी बिलासंबंधीचा मेल आल्यावर त्यात रुपये ८८० असं लिहून आलं होतं. तेव्हा त्यानं जीएसटी वगैरे नेहमीप्रमाणे रेकॉर्ड लावली. खरं प्रलोभन हे एकावर एक फ्रीचं होतं. एका फोनवर आणखी एक किंवा आणखी दोन फोनची बिलं फ्री.

तसा स्थितप्रज्ञ होता. 'अलग किसम का सेल्स है सर हमारा', एवढंच तो पुटपुटत राहिला. त्याला बहुधा सामाजिक-सांस्कृतिक ऱ्हासाची कल्पना नसावी. माणसाला केवळ अन्नधान्य मिळालं म्हणजे भूक भागत नाही. त्याची सांस्कृतिक भूकही भागवावी लागते, असं मी त्याला ऐकवलं. तर म्हणाला, 'हाँ वहीच ना सरजी, इसीलिए तो बैठे है नं हम, हम तो लंचटाइमभी नहीं लेते... ये सब सेव्हन फोर्टीनाइनवाले प्लान उसीके लिए निकाले है कंपनीने'

प्रत्येक 'सेव्हन फोर्टीनाइन'च्या विक्रीत त्याला बिचाऱ्याला किती मिळत असतील, या विचारानं माझा जीव कासावीस झाला. मी तिथून निघालो. परंतु 'एकावर एक फ्री'मधल्या दुसऱ्या कनेक्शनमध्ये चार दिवसांनी पाहिलं, तर इंटरनेट येईना. म्हणून पुन्हा त्याच्याकडे गेलो. तो सरसावला, 'सरजी, वैसे काम दो सेकंद का है, पर आपको यहाँ हमसे मिलने आना था. अच्छा, मॅडमका फोन इसमें फ्री करवा दू क्या...' असा आणखी एक गुगली त्यानं टाकला. मॅडमना ही ऑफर का नाही आवडणार बरे? पण त्यांचं आधार कार्ड वगैरे लागेल. 'अच्छा छोडो ना, उसीमें आपको टीव्ही दिला देता हूँ!' तो पुन्हा सरसावला. मी त्याला म्हटलं, 'बाबा रे, सध्या मी एक फाटकी पिशवी आणलीये, रिक्षा मिळणार नाही, टीव्ही नेणार कसा?' त्यावर तो हसत म्हणाला, 'टीव्ही मतलब वो नहीं, केबल का कनेक्सन आपका बिल कितना आता है...' असे नवनवे प्रश्न विचारत हा पठ्ठ्या मला कोंडीत पकडायचा. ही बिलं आजकाल इंटरनेटवरून भरल्यामुळे कधीच लक्षात राहत नाहीत. शिवाय जास्त सांगितली तर फायदा आहे की दडवली तर फायदा आहे, याचीही इथे खात्री पटलेली नसते. त्यामुळे मी साधारण आकडे फेकत गेलो. तर तो लगेच कॅल्क्युलेशन करून

दाखवू लागला, ‘इसमें एकही बिलमें आपको सस्ता हो जाएगा. इसमें आपका इन्स्टॉलेशन फ्री,.. सब सेव्हन फोर्टीनाइनमें...’ हे पालुपद तो सोडत नव्हता.

‘अरे, फोनकॉल करने को मिलेंगे ना, नहीं तो वईच ज्यादा पैसा खाएगा...’ या माझ्या टिपिकल मध्यमवर्गीय प्रश्नावर तो हसला. ‘क्या साब, वो तो फ्री ही करवा दिया है ना, मैंने आपको!’

मी असं काय केलंय, ज्यामुळे ही कंपनी मला इतकं काही फ्री ऑफर करतेय, ते मला काही समजेना. शेवटी त्याला मी एकदाच निक्षून सांगितलं, ‘अरे, मी आजकाल सारखा गॅलरीत का येतोय, यावरून एक तर माझ्या घरचे माझ्यावर संशय घेऊ लागलेत. तुझा फोटोही घरचे मागताहेत आणि काही सायबरफ्रॉड तर नाही ना, असंही मला दरडावताहेत. तर तू आता एकदाच सांगून टाक, नक्की तुमची कंपनी काय काय फ्री देणार आहे. फोन, म्युझिक, चित्रपट, हे तर झालंच टीव्हीचे चॅनेल तू देतोयस फ्रीझ, मिक्सर वगैरेपण देणारेस का बरं तेही देशील, पण वीजपण देणारेस का? सध्या आमच्याकडे त्याचीच वानवा आहे.’

त्यावर नेहमीच्याच थाटात, तो उत्तरला, ‘क्या सरजी, आपभी? बस टैम टैमकी बात है! वो सबभी आएगा ना, हमारी कंपनीमें और मैं थोडाही इतना रुकनेवाला हूँ कंपनीमें? कंपनी बडी हो जाएगी तो मैं भी तो बडा होऊंगा ना!!’

मला त्याच्या महत्त्वाकांक्षेचं कौतुक वाटलं. पण पुढचा धोकाही लक्षात आला. मात्र तोपर्यंत मी सेव्हन फोर्टीनाइनचा ग्राहक बनलो होतो. फोन, टीव्ही, घरातल्या पेस्ट कंट्रोलसह सर्व ऑपरेटर त्यानं बदलून टाकले आहेत. जाता जाता, त्या गॅलरीतील रांगेत कंटाळलेला एक ग्राहक माझ्याकडे पाहून पुटपुटला, ‘दहा महिन्यांनी ये, मग बघ उभा करतोय का, तुझा गॅलरीमॅन!’

**– सॅम कार्व्हर**
भ्रमणध्वनी : ९८२०७८२७७५
samkarver4@gmail.com

ग्रंथाली

# आनंदयात्री पोलीस अधिकाऱ्याची डायरी

**जयंत नाईकनवरे, आय.पी.एस.**



सतरंगी आठवणींच्या गंधकोशातला आनंदयात्री

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# पोलीसनभोमंडळातील २१ आयपीएस नक्षत्रं

**प्रतिभा बिस्वास**



२१ आयपीएस नक्षत्रांची संघर्षगाथा

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



**मीना नाईक**

# हार्दिक व्यक्तिमत्त्व

ललिता केंकरे यांच्याशी माझं दोन प्रकारे नातं होतं. एक म्हणजे मी जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये होते. माझे प्राध्यापक दामू केंकरे होते. तर सरांची बायको एक नातं आणि नंतर साहित्य संघाच्या 'पती गेले ग काठेवाडी' या नाटकात मी काम केलं तेव्हा त्या माझ्या सहकलाकार होत्या.

पुढे मी लग्न होऊन नाईक कुटुंबात आले तेव्हा आणखी एका नात्याचा धागा निर्माण झाला. केंकरे आणि नाईक ही दोन्ही कुटुंबं कित्येक वर्षं महालक्ष्मीच्या सरकारी वसाहतीत राहत होती. विजयचं लहानपण नाईक कुटुंबातच गेलं. अरुण, राजीव या दोघा भावांबरोबरच विजय लहानाचा मोठा झाला. त्यानंतर दोन्ही कुटुंबं कलानगरमध्ये राहायला आली. तिथेही विजय नाईक कुटुंबातच असायचा. कारण ललितताई सतत कुठल्यातरी नाटकाच्या दौऱ्यावर किंवा कुणाच्यातरी मदतकार्यात मग्न असायच्या.

> कुठल्याही नाटकात कुणी आजारी पडलं किंवा अडचण आली तर काही तासांत पाठांतर करून ती भूमिका ललितताई निभावून न्यायच्या. नाटक, संगीत नाटकाच्या परंपरेतलं असो किंवा प्रायोगिक. त्यांना स्टायलाइज्ड शैली छान जमायची. म्हणजे ऐतिहासिक, पौराणिक नाटकांत शब्दांवर योग्य ते वजन देऊन बोलावं लागतं. ते सर्वांनाच जमत नाही. ते त्या उत्तम रीतीनं करायच्या. त्या गायच्या आणि नृत्यही करायच्या.

तर ललितताईंशी माझा जवळचा संबंध आला तो साहित्य संघाच्या दोन नाटकांमुळे. एक, 'पती गेले ग काठेवाडी' आणि दुसरं, 'घेतलं शिंगावर'. 'पती गेले ग काठेवाडी' १९६८ साली सुधा करमरकर, म्हणजे ललितताईंची सख्खी बहीण, यांनी दिग्दर्शित केलं होतं. या नाटकात सगळेच दिग्गज कलाकार होते. दत्ता भट, कमलाकर सारंग, अरविंद देशपांडे, ललिता केंकरे आणि मी (वय वर्षं १७). या आधी साहित्य संघानं 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रं' हे पिरँदल्लोचं माधव वाटवे अनुवादित आणि दिग्दर्शित नाटक केलं होतं. या प्रायोगिक नाटकाचे उणेपुरे तेराच प्रयोग झाले, पण ते खूप गाजलं. त्यात माझी प्रमुख भूमिका होती आणि त्याची खूप प्रशंसा झाली होती. त्यामुळे त्यानंतरच्या संघाच्या समव्यावसायिक 'पती गेले ग काठेवाडी' नाटकासाठी सुधाताईंनी माझी निवड केली.

सुधाताई आणि ललितताई या दोन बहिणींमध्ये जमीन-अस्मानाचा फरक होता. ललितताई बिलकूल महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी नव्हत्या. दुसऱ्याला मदत करण्याची त्यांची केव्हाही तयारी असायची. अगदी जेजेच्या वार्षिक उत्सवातल्या नाटकांनाही त्या मदतीला धावून यायच्या. नऊवारी साड्या नेसवायला मदत करायच्या. 'पती गेले ग काठेवाडी'मध्ये मला नऊवारी साडीच नेसायची होती. तेव्हा त्यांनी मला खूप सांभाळून घेतलं. माझ्या भूमिकेला प्रेक्षकांचा खूप प्रतिसाद मिळायचा, पण त्यांनी कधीही माझा द्वेष केला नाही. या नाटकाचे त्या काळात दीड-दोनशे प्रयोग झाले.

एक प्रसंग असा आला, की एका प्रयोगाला काही कारणास्तव मला पोचायला उशीर झाला. म्हणजे साडेआठच्या प्रयोगाला मी नऊला पोचले. वास्तविक असा थोडाफार उशीर क्षम्य असतो, पण ही संधी साधून सुधाताईंनी माझा पेहेराव करून प्रयोगाला सुरुवात केली आणि पुढचे सर्व प्रयोग त्याच करणार असं ठरवलं. हा सरळसरळ

माझ्यावर अन्याय होता. पण मी सर्वात लहान. त्यातून सुधाताई म्हणजे मोठं प्रस्थ. दिग्दर्शिका, तात्या आमोणकरांची कन्या. माझा आवाज कुणापर्यंत पोचणार होता. पण त्यावेळेस नाटकातले ललितातार्इंसकट सर्व कलाकार माझ्या बाजूनं उभे राहिले. माझ्या बाजूनं त्यांनी आवाज उठवला आणि काही प्रयोगांनंतर मला पुन्हा घेऊन नाटकाचे प्रयोग सुरू झाले. तर अशा ललितातार्इ.

कुठल्याही नाटकात कुणी आजारी पडलं किंवा अडचण आली तर काही तासांत पाठांतर करून ती भूमिका त्या निभावून न्यायच्या. नाटक, संगीत नाटकाच्या परंपरेतलं असो किंवा प्रायोगिक. त्यांना स्टायलाइज्ड शैली छान जमायची. म्हणजे ऐतिहासिक, पौराणिक नाटकांत शब्दांवर योग्य ते वजन देऊन बोलावं लागतं. ते सर्वांनाच जमत नाही. ते त्या उत्तम रीतीनं करायच्या. त्या गायच्या आणि नृत्यही करायच्या. त्यांच्या सुरुवातीच्या 'पंडितराज जगन्नाथ', 'सरी ग सरी', 'वासवदत्ता' या नाटकांत त्या नृत्य करायच्या. भांगवाडी थिएटरमध्ये जाऊन त्या तमाशातल्या कलाकारांना भेटायच्या. दामू केंकरे हे सांस्कृतिक कार्यसंचालनालयाचे संचालक होते, तेव्हा त्या हे सगळे महोत्सव न चुकता पाहायला जायच्या. त्यांना नृत्याची खूप आवड होती.

काही शारीरिक अडचणींमुळे त्यांना नृत्य सोडावं लागलं, पण आमच्या नाटकाच्या मेकअप रूममध्ये त्या आम्हाला या नृत्यांची झलक दाखवायच्या. म्हणजे तमाशातल्या बायका कशा नाचतात, त्यांची अदा करायची पद्धत. ललितातार्इंमध्ये एक नखरा होता, तो नृत्यातून त्या सादर करायच्या.



**ललिता केंकरे**



**'पंडितराज जगन्नाथ' नाटकातील नृत्य करताना ललिता केंकरे**

कमलाकर सोनटक्के आणि एनएसडीतून बाहेर पडलेले उत्तरा बावकर, उषा सरपोतदार-बॅनर्जी, शशिकांत निकते, मुकुंद नाईक आणि इथले स्थानिक कलाकार यांना घेऊन सोनटक्के यांनी याच सुमारास दिल्लीत गाजलेलं 'जस्मा-ओडन' नाटक बसवलं होतं. यात जस्माची भूमिका मी केली होती. भवाई, काठियावाडी पद्धतीची गाणी आणि नृत्यं यात होती. ललितातार्इ यामध्ये येऊन कथकचा एक तोडा नाचून जायच्या. त्या सर्व तालमींना हजर असायच्या. आमच्या कलानगरच्या महिलांचे त्या हौसेनं नवरात्रीत दांडिया रास बसवायच्या. त्यात स्वत:ही नाचायच्या.

त्यांना खूप बोलायला आवडायचं. त्याउलट दामू केंकरे. तोंडात तंबाखू असल्यामुळे फार बोलत नसत. ललितातार्इंना प्रत्यक्ष कृतीपेक्षा त्याविषयी बोलायला आवडायचं. मग विषय काहीही असो. त्यामुळे बऱ्याचदा माणसं त्यांच्या बोलण्याला गांभीर्यानं घेत नसत.

त्यांच्यामध्ये खूप गुण होते, पण अभ्यासुवृत्ती नव्हती. त्यामुळे एका विशिष्ट वयानंतर आणि दामू केंकरे यांच्या निधनानंतर त्यांच्या आयुष्यात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली. काही करण्यासारखं उरलं नाही. वास्तविक त्यांना शेवटपर्यंत मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, अस्थिविकार असं काहीही नव्हतं. तरीही त्यांना नैराश्य आलं होतं. वयाच्या ८६व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

**– मीना नाईक**
भ्रमणध्वनी : ९८२०४२६०४४

ग्रंथाली




बाबा आमटे :
व्यक्तित्व
कवित्व
आणि कर्तृत्व

बाळू दुगडूमवार

मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.

मन
मुक्त...
माझे!

नीलिमा गुणे-गोळे



मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रुपये



**राधा आंबेकर**

# अबोध चित्रांचा बोध-प्रवास...

> ‘चित्रे’ जगण्याच्या प्रत्येक टप्प्यावर साथ सोबत करणारी, जी बोलत नाहीत, आपल्याला त्यांच्याशी संवाद साधावा लागतो. अबोल, अमूर्त चित्रे तुम्हाला तुमच्या मनाच्या खोल डोहापर्यंत घेऊन जातात. ‘चित्रांचे’ हे भारलेपण आहे. असा हा ‘अबोध चित्रांचा’ बोधपूर्ण प्रवास...

‘बालपणाची श्रीमंती’ त्याच्या रम्य आठवणीत असते आणि या आठवणींच्या चित्रमालिकेतच आपले आजचे ‘घडणे’ दडलेले असते. ही सुरुवात ‘आज दारापुढे रांगोळी मी काढणार’ या हट्टाने झाली. आई दारापुढे रोज सुरेख रांगोळ्या काढायची, आजही काढते. मला वाटते, ठिपक्यांच्या रांगोळ्या हा चित्रांचा पहिला संस्कार होता. त्यातील कमळे, गोपद्म, स्वस्तिक, शंख, चक्र यांचे प्रतीकात्मक आकार, त्यांचे अर्थ, त्यातील सुबकता, वैविध्य, त्या काढण्यामागील शास्त्रीय हेतू, या सर्वांच्या माहितीतून कळत-नकळत चित्रे मनात वसू लागली. चित्रांचा तो पहिला संस्कार होता. बारीक लयदार, वळणदार रेषांच्या रांगोळ्या आपल्यालाही काढता आल्या पाहिजेत हा अट्टहास सुरू झाला. या ध्यासाने रांगोळीचा अधिक सराव केला जायचा, जो कलाशाळेत अभ्यासास उपयोगी पडला. बिंदू, रेषा या मूलभूत घटकांचे महत्त्वही कळू लागले. कलेच्या इतिहासाचा अभ्यास करता असेही लक्षात आले, की ललितकलेची बैठकच मुळात धर्म, अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि रोजचे जीवन व्यवहार यांवर आधारित आहे. कथा, मिथके, रूपके या सर्वांची सुरेख गुंफण करत सुसंस्कारित समाज घडवण्याचे कार्य कलेतून घडत असते.

अभ्यासासाठी अर्धा-तासही एका जागेवर न बसणारी चित्रकलेत तासन तास रमू लागले. खूप सराव करू लागले. चित्रकलेच्या ग्रेड परीक्षेच्या तयारीसाठी अभिनव नगर येथे अगदी वरच्या टोकाच्या गल्लीत असलेला महाजन सरांचा क्लास लावला होता. हा क्लास दर शनिवार-रविवार असायचा. शनिवारी अर्धा दिवस शाळा सुटल्यावर दुपारी आम्ही मैत्रिणी घरी न येता, येथील गल्ल्यांमध्ये फिरत राहायचो. सरांचे बंगलीवजा घर होते. व्हरांड्यापासून स्वयंपाकघरापर्यंत कुठेही मुले आपली जागा पकडून बसलेली असत. सर्वत्र गडबड, गोंधळ, मजा-मस्तीत हा क्लास चाले. शाळेच्या वर्गाची शिस्त येथे नव्हती. मुख्य अभ्यास नाही, त्यामुळे बोलायला पूर्ण मुभा होती. कोणतेही बंधन नव्हते. ओरडणे, रागावणे नव्हते. जमत नसेल तर परत काढायचे, अधिक सराव करायचा हे मनावर बिंबू लागले. तीच ती चित्रे परत परत करण्याचा कंटाळा येत नव्हता. त्रास वाटत नव्हता, उलट आपल्याला हे यायला हवे हा ध्यास होता. कोणी संकल्पचित्र काढतेय, कोणी निसर्गचित्र, तर कोणी वस्तुचित्र. असे वेगवेगळे विषय पाहायला मिळायचे. ते वातावरण खूप आवडायचे. क्लास संपूच नये असे वाटायचे. सरांकडे मदतनीस म्हणून असणाऱ्या व कला महाविद्यालयात शिकत असणाऱ्या मुलांकडून आम्हाला कलामहाविद्यालयाबद्दल कळायचे. तेथे मुले फक्त चित्रच काढतात, हे ऐकून खूप भारी वाटायचे. त्यांच्या assignments ते सरांना, आम्हाला दाखवत. आपल्यालाही अशी चित्रे काढता आली पाहिजेत, अशा विचाराने चित्रे मनात घर करू लागली.

नववीतला तो दिवस मी कधी विसरू शकणार नाही. चित्रकलेचे कुलकर्णीसर नव्याने आमच्या शाळेत रुजू झाले होते. तेही चित्रकला छान शिकवायचे. वर्षाच्या अखेरीस त्यांनी वर्गातील सात-आठ मुलांना उभे केले आणि संपूर्ण वर्गात आमच्या चित्रांचे कौतुक केले. आयुष्यात

पाहिल्यांदा कोणीतरी माझ्या कलागुणांबद्दल चारचौघांत बोलत होते. ते म्हणाले, ''तुम्हाला चांगली चित्रं काढता येतात, तुम्ही दहावीनंतर जेजे स्कूल ऑफ आर्टसारख्या कलामहाविद्यालयात जाऊन कलाशिक्षण पूर्ण करा, कलेच्या माध्यमातूनही तुम्ही पुढे जाऊ शकता..!'' खरे तर सरांनी सर्वसामान्य वक्तव्य केले होते. त्यांना कल्पनाही नसेल की त्यांच्या या कृतीने मात्र कुणाचा तरी आत्मविश्वास दुणावला होता. डोळ्यांतील स्वप्नांना भरारीचे बळ दिले होते.... अन् चित्रकलेचे बीज खऱ्या अर्थाने माझ्यात रुजले..

दहावीत मात्र मी मन लावून अभ्यास केला, आणि मला ७७ टक्के मिळाले. आर्ट कॉलेजच्या प्रवेशाबद्दल आजही लोकांना पुरेशी माहिती नसते, तो तर पस्तीस वर्षांपूर्वीचा काळ. मित्रमैत्रिणी सारे सायन्स, कॉमर्स या शाखांकडे आपापल्या आवडीनुसार वळले, आणि मी मात्र चित्रेच काढायची आहेत या ध्यासाने मुंबईतील कलामहाविद्यालयात प्रवेशाकरता प्रयत्न करू लागले. मी दहावी पास होते. जेजेत पदवी अभ्यासक्रमाकरता बारावी पास असणे आवश्यक होते. परंतु जेजेच्या प्रवेशासाठी आणखी दोन वर्षे कॉलेजमध्ये जाऊन अभ्यास करण्याची माझी मानसिकता नव्हती. चित्रकला ग्रेड परीक्षेतही 'क' ग्रेड होती. 'रहेजा स्कूल ऑफ आर्ट' जेथे जेजेनंतर विद्यार्थी प्रवेशास प्राधान्य द्यायचे तेथे प्रवेश मिळणे शक्य नव्हते.

माझ्या कलाजीवनात रघुवीरदादा (रघुवीर कुल) कायम एक सच्चा स्नेही म्हणून लाभला. माझा कॉलेजप्रवेश, पहिला कॅमेरा, पहिला जॉब, माझे मास्टर्स, एशियाटिकची फेलोशिप या साऱ्यात तो एका दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक म्हणून प्रत्येक वेळी उभा राहिला आहे. १९८५ साली प्रसिद्ध चित्रकार रॉबी डिसिल्वा आणि वसईतील काही मान्यवर मंडळींनीं रॉबी डिसिल्वा स्कूल ऑफ आर्ट नव्याने सुरू केले होते. तेथे जेजे स्कूल ऑफ आर्टचे प्राध्यापक टिकेकरसर प्राचार्य होते. या महाविद्यालयाची माहिती दादाने मला देत कलाजगताचा रस्ता दाखवला आणि महाविद्यालयीन शिक्षणाचा टप्पा सुरू झाला. कॉलेजचा पहिलाच दिवस, टिकेकरसरांचे पाहिले व्याख्यान. ''निसर्ग हा सर्वात मोठा स्रोत आहे कलेचा. आपण निव्वळ त्याचं अनुकरण करतो. त्यानं निर्मिलेले आकार, रंग, पोत, मांडणी, छाया-प्रकाश साऱ्याची जुळवाजुळव करतो. तुमच्या अवतीभोवती असणाऱ्या अनेक दृश्यांत ते तुम्हाला पाहायला मिळेल. 'बघणे आणि दिसणे' यात फरक आहे. तुमचं निरीक्षण हवं, नजर हवी. ती विकसित करायला हवी. रोजच्या जगण्याकडे तुम्ही या नजरेनं बघाल, तुम्हाला सर्वत्र चित्रंच दिसतील.'' सरांनी कलाअभ्यासाचा सहज पाया घालून दिला. ''चित्र तुमच्या डोक्यात सतत असलं पाहिजे, घोळलं पाहिजे. वाळलेल्या पानात, कुरूप अळीत, दुखऱ्या जखमेत; अगदी घाणीच्या ढिगाऱ्यातही तुम्हाला सौंदर्य शोधता आलं पाहिजे आणि मांडता यायला हवं.. चित्रकार म्हणून तुम्ही त्या घटनेतून, आकारातून, रंगातून तुमचे स्वतः चे विचार नकळत त्यात मांडत असता, त्यातून चित्रकार घडत असतो. चित्रकला शिकवता येत नाही, ती शिकावी लागते, आत्मसात करावी लागते.. आम्ही तुम्हाला इथे मार्ग दाखवू, पण प्रत्येकानं खूप सराव करून कलाकौशल्यं आत्मसात करायला हवीत, जे पुढील शिक्षणात तुम्हाला आवश्यक आहे.'' अशा रोजच्या कामाच्या चर्चेतून सर बोलत



राहायचे. ते सारे मनात टिपकागदाप्रमाणे झिरपत होते. साहजिक या वातावरणात माझी प्रगती होऊ लागली. कलेचा इतिहास हा एकच थिअरी विषय होता, त्या विषयातून शिल्पकला, चित्रकला आणि वास्तुकला याबद्दल कळू लागले.

आमचे हे कॉलेज म्हणजे विटांच्या भिंती असलेल्या टपरीवजा दोन खोल्या होत्या. त्याला संपूर्ण प्लास्टरिंगसुद्धा नव्हते. छत म्हणजे पत्रे.. पाऊसपाण्यात अक्षरशः पत्रे उडून जायचे. वर्गात फूटभर पाणी साचलेले असायचे. परंतु त्या गोष्टीचा ना आम्ही कधी बाऊ केला ना बोभाटा. सकाळी वर्गात गेल्यावर असाइनमेंट पाण्यात तरंगत असायच्या. मग त्या पुन्हा करणे आलेच. आमचे वार्षिक स्नेहसंमेलन होते. आम्हाला आमचे हे कॉलेज सजवायचे होते. टिकेकरसरांनी कमीत खमीत खर्चात आणि कल्पकतेने आमच्याकडून त्या भिंती रंगवून घेतल्या. लाल, निळा व पिवळा हे प्राथमिक रंग. यांच्या फिक्या रंगच्छटा बनवल्या. प्रत्येक विटेला वरीलपैकी एक रंग अशा पद्धतीने रंगकाम पूर्ण झाल्यावर संपूर्ण कॉलेजचा चेहरामोहराच बदलून गेला. यातून एक शिकलो, कलेची दृष्टी असेल तर कोणत्याही परिस्थितीवर तुम्ही मात करू शकता. फाऊंडेशनच्या वर्षानंतर याच कलामहाविद्यालयात अप्लाइड आर्टशाखेत प्रवेश घेतला, कारण एक तर वातावरणात रुळलो होतो, मित्रमैत्रिणींचा चांगला ग्रूप तयार झाला होता. आमचे शिक्षिक आमच्याकडून चांगली मेहनत करून घेत होते. आयुष्यात पहिल्यांदा मला प्रथम पारितोषिक 'गरुड' या प्रोजेक्टला मिळाले. माझ्यातील आत्मविश्वास वाढला. आपण निवडलेले क्षेत्र योग्य आहे याची ती पहिली पोचपावती होती. पुढे प्रत्येक वर्षी महाविद्यालयीन शिक्षणात वेगवेगळ्या विषयात बक्षिसे मिळाली. हे आत्मप्रौढी म्हणून सांगत नसून का नमूद करावेसे वाटते, की

आपल्याकडे शालेय अभ्यासात एखादे मूल हुशार नसते, त्याच्याकडे दुर्लक्षित नजरेने पाहिले जाते, कमी लेखले जाते, ते पूर्णपणे चुकीचे आहे. मार्क, यश आणि स्पर्धा यात आपण आपल्या मुलांना उगाच अडकवतो आणि त्यांच्यातील आत्मविश्वास घालवतो. त्या बाबतीत मी भाग्यवान ठरले. माझ्या पालकांनी ना आडकाठी केली, ना फार अपेक्षा ठेवल्या. मला हवे तसे बहरू दिले. स्पर्धेच्या शर्यतीत जुंपले नाही. कलामहाविद्यालयातील दोन वर्षे पूर्ण झाली आणि शासनाने या कलामहाविद्यालयातील आमचा अभ्यासक्रम अपुऱ्या जागेअभावी आणि सुविधा नाहीत म्हणून बंद करण्याचा फतवा काढला. आम्ही सर्वजण थोडेसे धास्तावलो, आता आपले पुढे कसे होणार? हे कॉलेज नवीन होते, सुविधा अपुऱ्या असल्या तरी त्या आमच्या शिक्षणाच्या कुठेही आड येत नव्हत्या. आज चकचकीत कॉलेज कॅम्पस, हाय टेक सुविधा बघून प्रवेश घेण्याकडे सर्वसामान्य लोकांचा कल असतो. खरे आवश्यक असते ती नवनवीन शिकण्याची, आत्मसात करण्याची वृत्ती, आणि शिक्षकांकडे शिकवण्याची तळमळ, जी या कॉलेजच्या शिक्षकांकडे होती. पण म्हणतात ना, जे घडते ते चांगल्यासाठीच.. आम्हा आठ जणींची रवानगी सोफिया पॉलीटेक्निक, पेडर रोड येथे तर मुलांची रहेजा स्कूल ऑफ आर्ट, बांद्रा येथे करण्यात आली.

तेथे गेल्यावर महाविद्यालयीन शिक्षणात आमूलाग्र बदल झाला. महाविद्यालयीन वातावरण, शिकणे, शिकवणे साऱ्या गोष्टी हळूहळू उमजू लागल्या. आम्ही सर्व जणी सर्वसामान्य कुटुंबातील होतो आणि सोफियात उच्चभ्रू सुसंस्कृत वातावरण, एटिकेट्स, बोलणे, चालणे, भाषा.. पण मला अभिमानाने सांगावेसे वाटते, की माझ्या या कॉलेजने आम्हा सर्वांना हळुवारपणे सामावून घेतले. कधी दुजाभाव केला नाही. ‘काळाप्रमाणे शिक्षण’ हे सोफिया कॉलेजचे मुख्य तत्त्व आजही आहे. येथेही कामात चांगली प्रगती होत दोन्ही वर्षी प्रावीण्य मिळवले. १९९० साली कॉलेजमध्ये झालेल्या ‘अक्षरअंकन’ या कार्यशाळेत स्वतःतील सुलेखनाच्या क्षमतांची जाणीव झाली आणि अक्षरांकडे पाहण्याची दृष्टी व्यापक झाली.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करत असताना फ्रीलान्स कामे आणि पार्टटाइम जॉब करू लागले होते. चार वर्षे विविध advertising agencies मध्ये काम केल्यानंतर हे लक्षात आले की येथील कामाच्या वेळा, उशिरापर्यंत थांबून काम करणे आपल्याला पुढे पुढे शक्य होणार नाही आणि या क्षेत्रातील अस्थिरता मनाला अस्वस्थ करत होती. मला आर्थिक स्थैर्य हवे होते. १९९५ साली एलएस रहेजा स्कूल ऑफ आर्ट या कला महाविद्यालयाची ‘सहाय्यक व्याख्याता’ हवेत अशी जाहिरात वाचनात आली व मी अर्ज केला.

ज्या कलामहाविद्यालयात अपुऱ्या ग्रेडमुळे माझा प्रवेश नाकारला गेला होता, त्या महाविद्यालयात या पदासाठी माझी निवड झाली आणि जीवनात यशाचा एक टप्पा गाठला.

येथे रुजू झाल्यावर माझ्यातील ‘शिक्षकाला’ छान खत पाणी मिळाले. त्या वेळचे प्राचार्य बेंडाळेसर यांनी दोन गोष्टी पहिल्या दिवशी सांगितल्या. ‘‘शिक्षक दोनच प्रकारचे असतात. एक, चांगला आणि एक पाट्या टाकणारा. पहिली पाच वर्षे जी मेहनत शिकवण्यासाठी घेशील त्यातून स्वतःला एक चांगली शिक्षक म्हणून घडवशील. शिक्षकांची



प्रतिमा मुले तयार करत असतात. ते आपले खरे क्रिटिक असतात. आणि दुसरा, वर्गात सर्व प्रकारची मुले असतात. अधिक, साधारण आणि कमी हुशार.. तुला या कमी हुशार विद्यार्थ्यांवर अधिक मेहनत घ्यायची आहे. त्यांना काम करण्यास प्रोत्साहन द्यायचे आहे. त्यासाठी शिक्षक असतो.’’ सरांच्या या बोलण्याने माझ्या कामाच्या पद्धतीवर सखोल परिणाम झाला. माझा ‘शिक्षक प्रवास’ सुरू झाला. माझ्या गुरू मीनल जोशीमॅडम यांचा उल्लेख करावासा वाटतो. आज शिक्षक म्हणून जी काही माझी प्रतिमा आहे त्यात मॅमनी नकळत केलेले संस्कार आहेत. चित्रकलेच्या शाखेत शिक्षक हा केवळ शिक्षक नसतो, तो स्वतः कल्पक बुद्धीचा असावा लागतो, कलामूल्ये मुलांमध्ये रुजवण्यासाठी नवनवीन संकल्पना राबवणारा कल्पक मार्गदर्शक असतो.

‘नाटकातील चित्र आणि चित्रातील नाट्य यात समान सूत्र काय?’ यावर विजय केकरे यांचे एक व्याख्यान ठेवले होते. केंकरे यांनी ‘जग एक रंगमंच’, प्रत्येकाच्या जीवनात नाट्य घडत असते, आणि त्या नाट्याची एक चौकट असते, जी चित्रातही असते... अशा अभ्यासपूर्ण ओघवत्या वाणीने हे सेशन खूप गाजवले. तर २०१७ साली ‘चित्र एक समान सूत्र’ या चर्चासत्रात प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर कोलते आणि उपयोजितकार सुनील महाडिक या दोहोंना एकाच मंचावर आणून उपयोजित कला आणि अभिजात कला या दोहोंचा पाया कलाच आहे, हा आयोजित संवादही मुलांमध्ये खूप गाजला.

दरम्यान लग्न झाले होते, प्रापंचिक जबाबदाऱ्या वाढल्या होत्या. त्यामुळे घर आणि कॉलेज ही दोनच कार्यक्षेत्रे मर्यादित ठेवली. माझ्या या कॉलेजने मला कामाचे अमाप समाधान दिले. आत्मिक बळ दिले. कॉलेजमध्ये पाय ठेवताच मी घरातील साऱ्या अडचणी विसरून जायचे. कला ही ऊर्जा आहे, ती सारे दुःख विसरायला शिकवते, खंबीर उभे राहणे, सकारात्मक जगायला शिकवते. या मयूरपंखी दिवसांत २०१० साली कलाशिक्षणक्षेत्रात मानाचा समजला जाणारा ‘‘CAG Guru of the year’’ हा पुरस्कार मला मिळाला. माझ्या करिअर मधील आणखी एक सुखद आनंदाचा क्षण, मी भरून पावले. प्रामाणिकपणे काम करण्याची जणू पोचपावती मला मिळाली.

याच काळात २०१२ साली माझे मास्टर्स (MFA) ‘देवनागरी : ध्वन्यात्मक लिपीचा दृश्यअभ्यास’ या विषयावर ‘outstanding’ ग्रेडने पूर्ण केले. MFAच्या अभ्यासात अक्षर म्हणजे ‘न क्षरति इति अक्षरः’- ‘अ-क्षर’ कधीही क्षर न होणारे आणि ‘अक्ष-र’ ‘नेत्रांना

सुख देणारे' हे ज्या वेळी वाचनात आले त्या वेळी अगदी 'युरेका युरेका' सारखी माझी स्थिती झाली. 'मंत्र, स्तोत्र दुसरे काहीही नसून त्यातील विचार सामर्थ्याची ती ध्वन्यात्मक प्रतीके आहेत', 'ह्या विश्वाची उत्पत्ती ओंकारातूनच झाली', 'अक्षराणामं अकारोस्मि' (प्रत्येक अक्षराच्या आकारात मी आहे) असे भगवतगीतेच्या दहाव्या अध्यायात विभूतीयोगात प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण सांगतात. माझा हा चित्रप्रवास येथवर येऊन पोचला. अक्षरांबद्दलचा इतका सूक्ष्म विचार मनाला अंतर्मुख करून गेला. अक्षरलेखन, सुलेखन ह्याचे वेड मला त्याच्या मुळापर्यंत घेऊन गेले. चित्र, लेखन, वाचन या साऱ्याचा केंद्रबिंदू अक्षरे आहेत, खरे तर आपण प्रत्येक जण अदृश्य 'विचारवाहक' असतो, 'ही' हाडामासाची शरीरे मनोमय कोशात अधिक वावरत असतात, आणि तेथे विचार रूपाने अक्षरेच असतात. या अर्थाने मला  हे जग 'अक्षरमय' भासते. असा हा 'अक्षरयोग' निराकारातून आकाराकडे आणि आकारकडून पुन्हा निराकाराकडे, जीवनात सुरू आहे. ह्या अभ्यासात सुधीर मोघे, यशवंत देव यांसारख्या दिग्गज कवी, संगीतकार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्या भेटी माझ्या जीवनातील चिरस्मरणीय अशा आठवणी आहेत. सुधीर मोघे यांच्या मुक्तछंद या बंगल्याच्या अभ्यासिकेत त्यांच्या मुखातून अक्षर, शब्द, काव्यनिर्मितीवर जी मैफल रंगली त्याची मी  एकमेव श्रोता होते. माझ्यासाठी तो अनुभव गुरूने एखाद्या शिष्याला ज्ञान देणे यापेक्षा वेगळा नव्हता. सुधीर मोघे यांच्या 'शब्दधून' या काव्यसंग्रहातील काही रचनांवर मी सुलेखन केले. तर यशवंत देव यांची आठवण येताच आजही माझे डोळे पाणावतात. माझ्या विषयाचे नावीन्य त्यांना कुठेतरी भावले होते. त्यांनी शब्दप्रधान गायकी, स्वर, भाव यातील नाजूक भावबंध स्वतः गाऊन दाखवत, उलगडत समजावून सांगितले. स्वरांच्या हरकती, ताना यातून मन:पटलावर निर्माण होणाऱ्या संवेदना आणि भाव याचे सूक्ष्म विवेचन केले. निराकार ते आकार आणि आकार ते निराकार या चर्चेत आम्ही ओशोंच्या विचारांपर्यंत येऊन पोहचलो, निःशब्द झालो. तुझा हा प्रवास असाच सुरू ठेव, तू योग्य मार्गावर आहेस, असे म्हणत त्यांनी लिहिलेल्या ओशोंवरील रुबायांचे पुस्तक सही करून आशीर्वादरूपाने दिले. बऱ्याचदा मनात येते, मी तर एक सर्वसामान्य चित्र, अक्षर अभ्यासक, परंतु अशा अनेक थोर लोकांपर्यंत केवळ 'कला' या सामायिक बिंदूनेच पोचू शकले.

या सर्व काळात वैयक्तिक जीवनात अडचणींची आणि सत्त्वपरीक्षेची मालिका संपतच नव्हती. २००८ ते २०१६ या कालखंडात आमच्या कुटुंबातील ५ व्यक्ती देवाघरी गेल्या. सासरे, सासूबाई वृद्ध होते, दी- जाऊ आजारी होते, पण माझी मुलगी आर्या अवघी ८ वर्षांची होती. आमचे कोवळे निरागस फूल होते ते. अल्पशा आजाराचे निमित्त झाले आणि देवाने तिला स्वगृही बोलावून घेतले. आजही त्या वेदनेची कळ काळीज चिरत जाते. परंतु येथेही मला पुन्हा कलेनेच जगवले. लिहिते केले. माझी वेदना, दुःख जे उरात सतत भळभळत होते त्याला मोकळी वाट करून दिली. तिच्या प्रथम स्मृतीदिनी 'आर्या : एक कालिडोस्कोप' हे  पुस्तक तिची आठवण म्हणून सर्व नातेवाईक, स्नेहींना भेट म्हणून दिले.

जून २०१६ मध्ये आर्याच्या अचानक निघून जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली. सप्टेंबर २०१६ मध्ये संस्थेने महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती केली. दुःख उरात ठेवून, अनंत अडचणींचा सामना करत कर्तव्ये, जबबदाऱ्या पार पाडत होते. अधिकाधिक कामात स्वतःला व्यग्र करून घेत होते. माझ्यातील आणखी एका पैलूचा म्हणजे व्यवस्थापनगुणांचा येथे कस लागला. या सर्वात माझ्यातील संशोधक वृत्ती, वाचन मला नेहमीच उत्साही ठेवते. मला सांगायला आनंद वाटतो, २०१८-१९ ची एशियाटिक सोसायटी, मुंबईची 'कलेचा इतिहास' या विषयाची फेलोशिप मिळाली. 'मुखपृष्ठे : एक अभिजात चिंतन' या विषयावर मी शोधनिबंध सादर केला. या शोधनिबंधात स्वातंत्र्यपूर्वकाळातील मुखपृष्ठे संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. 'मुखपृष्ठ हे जरी व्यावसायिक हेतूने केले जात असले तरी त्यातही अभिजात सौंदर्य दडलेले असते. पुस्तकाचे नाव बाजूला केले तर ती एक स्वतंत्र चित्रकृती ठरते, इतपत त्याचे मूल्य आहे' या संकल्पनेवर आधारित निबंधाच्या निमित्ताने अनेक दिग्गज, प्रसिद्ध मुखपृष्ठकारांना  भेटण्याचा योग आला, त्यांचे कलाजीवन त्यांनी कसे घडवले, तो प्रवास त्यांच्याकडून प्रत्यक्ष जाणून घेता आला. ही सर्वच मंडळी अत्यंत शिस्तप्रिय, कलेबाबत आग्रही आणि कार्यमग्न आहेत. प्रो. रंजन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रबंध मी पूर्ण केला. ज्येष्ठ प्रसिद्ध मुखपृष्ठकार आणि चित्रकार शि. द .फडणीस, पद्मा सहस्रबुद्धे, दत्तात्रय पाडेकर, तर सुप्रसिद्ध चित्रकार बहुलकरसर, चंद्रमोहन कुलकर्णी,  संशोधनात्मक आणि अभ्यासात्मक लेखन करणारे दीपक घारे यांसारख्या अनेक मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन या वेळी मिळाले.  ज्येष्ठ साहित्यिक मधुवंती सप्रे यांनी माझ्यासारख्या नवख्या शब्दचित्रकारावर विश्वास ठेवून त्यांच्या २०१९ सालतील 'अक्षरगंध' अंकात पद्मा सहस्रबुद्धे यांच्या कारकिर्दीवर लेख लिहिण्याची संधी दिली. असा हा लेखनप्रवास सुरू झाला.

कॉलेजमध्ये काम करत असल्याने सर्वच  स्तरातील मुलांशी संपर्क असतो. काही मुलांची आर्थिक स्थिती हलाखीची असते. ती संघर्ष करून स्वतःचे शिक्षण पूर्ण करत असतात. अशा मुलांना सर्वसाधारणपणे आम्ही शिक्षक मदत करत असतोच, परंतु त्याला काही मर्यादा येतात.  २०१५-१६ साली विद्यादान साहाय्यक मंडळ, ठाणे या संस्थेच्या संपर्कात मी आले. ही संस्था होतकरू, गरजू आणि गुणवंत मुलांना शिक्षणास न केवळ आर्थिक मदत करते तर त्यांचे  उत्तम mentoring करत समाजाचा जबाबदार नागरिक घडवण्यास कटिबद्ध आहे. माझ्या शिक्षणक्षेत्राशी समकक्ष व अनेक मुलांच्या आयुष्यात उजाळा आणणाऱ्या या संस्थेच्या कार्यमूल्यांकडे मी ओढली गेले आणि २०१७ सालापासून संस्थेत कार्यकर्ता-पालक म्हणून काम करू लागले. मुंबईतील विविध आर्ट कॉलेजमधील  १६ मुले सध्या संस्थेत आहेत. या मुलांसाठी कार्यशाळा, चर्चासत्र, तज्ज्ञांचे मार्गदर्शन संस्थेमार्फत आम्ही आयोजित करत असतो.  कॉलेज आणि VSMच्या माध्यमातून अनेक गुणी कलाविद्यार्थ्यांमध्ये कलेची बीजे रुजवून त्यांचे मोठे वृक्ष होताना पाहताना मिळणारा आनंद अवर्णनीय आहे....

**- राधा आंबेकर**

भ्रमणध्वनी :  ९९६९६२४८७१

radhaambekar2018@gmail.com



**डॉ. मालिनी नाडकर्णी**

# सकारात्मक आणि आशावादी जीवन

**डॉ.** विजय आजगांवकर यांच्या निधनाची बातमी कळली आणि त्यापाठोपाठ लहानपणीच्या अनेक आठवणी जागृत झाल्या. त्यांचे वडील डॉ. एस.एस. आजगांवकर माझ्या रेडिओलॉजिस्ट वडिलांकडे नेहमी येत. ज्येष्ठ डॉ. आजगांवकर डायबेटिसचे विशेषज्ञ. डायबेटिसचं त्यांचं ज्ञान, त्यांनी त्यांच्या परिश्रमांनीं आणि प्रयोगशीलतेनं कमावलेलं होतं. डायबेटिससाठी एक खास रुग्णालय उभारण्याची ज्येष्ठ डॉक्टरांची उमेद आणि खटपट माझ्या शाळकरी कानावर येई. मला वाटतं तेव्हां त्यांचा मुलगा विजय बहुधा टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असावा. विजयभाऊंना डायबेटिसवर काम करण्याची प्रेरणा त्यांच्या वडिलांकडूनच मिळाली असावी. माझे वडील विजयभाऊंचे शिक्षक असल्यानं आणि दोघांचंही मालवणी भाषेचं आणि मातीचं खास नातं असल्यानं ते माझ्या वडिलांना आपल्या वडिलांप्रमाणे मान देत.

> मधुमेह लहान मुलांत किंवा तरुणांत आढळतो तेव्हा त्या व्यक्तीला आणि त्याच्या पालकांनाच नव्हे तर घरादाराला एक प्रकारचा मानसिक धक्का बसतो. डॉ. आजगांवकरांकडे अशा रुग्णांशी संवाद साधण्याची अनोखी पद्धत होती. ''तुला काय होतंय'' असं विचारण्याऐवजी ''मोठेपणी तुला काय व्हायला आवडेल'' असा प्रश्न ते विचारत. साहजिकच त्या भांबावलेल्या मुलांना आणि त्यांच्या आईवडिलांना हा प्रश्न आणि त्याचा संदर्भ, त्यांच्या शिणलेल्या मनाला उभारी देऊन जाई.

पुढे १९७४ साली मी अमेरिकेला जातेय हे कळल्याबरोबर विजयभाऊंनी खिशातून देवाचा एक फोटो माझ्या हातांत ठेवला आणि मला 'ऑल द बेस्ट' म्हणाले. तो फोटो माझ्याकडे अजून आहे. २०१५ साली माझ्या 'ग्रंथाली'नं प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला ते आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या निधनाची बातमी आणि त्यानंतरच्या अनेक विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया मला आमच्या रेडिओलॉजीच्या कंपूकडून समजल्या. (त्यांना शक्यतो मराठी शब्द वापरलेले आवडत म्हणून ग्रूप म्हणत नाही). विद्यार्थिवर्गात असलेली त्यांची लोकप्रियता मनाला चकित करून गेली.

त्यांनी १९५१ साली, टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बी.वाय. एल. नायर हॉस्पिटल इथे वैद्यकीय शिक्षणाला सुरुवात केली. १९६२साली जनरल मेडिसिनमध्ये एम.डी. होईपर्यंत आणि नंतरही या ना त्या निमित्तानं त्यांचा नायर हॉस्पिटलशी संबंध राहिला.

त्यांची कस्तुरबा रुग्णालयात ऑनररी म्हणून नेमणूक झाल्यानं त्यांचा विद्यार्थिवर्ग मुंबईच्या सर्व मेडिकल कॉलेजमध्ये विखुरला गेला आणि त्यामध्ये मला त्यांच्या विद्यार्थिप्रियतेचं मूळ सापडलं. कस्तुरबा रुग्णालय हे सांसर्गिक रोगांसाठी असलेलं मुंबईमधलं एकमेव इस्पितळ! त्यामुळे सर्व वैद्यकीय विद्यार्थी तिथे शिकायला जातात. रुग्णांशी कसं बोलावं, त्यांचा विश्वास संपादन करून, त्यांच्या तक्रारी मनापासून समजून घेऊन त्यांना कसं तपासावं हे समजवण्यात त्यांचा हातखंडा होता. एखाद्या औषधाची मात्रा जास्त प्रमाणात दिली गेली हे कसं ओळखाल, असा प्रश्न ते विद्यार्थ्यांना करत आणि त्यांना तें उत्तर देता येत नाही असं वाटलं की स्वतःच, डोळ्यांची विशिष्ट हालचाल करून, उत्तर सांगत! अपेक्षित उत्तर असे Diplopia म्हणजे डबल व्हिजन. दोन प्रतिमा

दिसणं. क्ष-किरणतज्ज्ञांचा एम.बी.बी.एस. झाल्यानंतर औषाधांशी फारसा प्रत्यक्ष संबंध येत नाही, तरीपण ह्या क्षकिरणशास्त्राच्या विशेषज्ञांनी त्यांच्या पदवीपूर्व अभ्यासातल्या खाणाखुणा इतक्या वर्षांनंतर ध्यानात ठेवल्या, त्यावरून डॉ. आजगावकरांच्यातील शिक्षकाची शिकवण्याची हातोटी लक्षात येते.

डायबेटिस म्हणजे मधुमेह हा रोग प्रामुख्यानं वाढत्या वयात आढळत असला तरी लहान वयामध्येदेखील तो आढळून येतो. माणसाची सर्वसाधारण आयुर्मर्यादा लक्षात घेतली तर मोठ्या वयात गाठणारा मधुमेह त्या मानानं थोड्या काळासाठी सतावतो. मधुमेह लहान मुलांत किंवा तरुणांत आढळतो तेव्हा त्या व्यक्तीला आणि त्याच्या पालकांनाच नव्हे तर घरादाराला एक प्रकारचा मानसिक धक्का बसतो. डॉ. आजगांवकरांकडे अशा रुग्णांशी संवाद साधण्याची अनोखी पद्धत होती. ''तुला काय होतंय'' असं विचारण्याऐवजी ''मोठेपणी तुला काय व्हायला आवडेल'' असा प्रश्न ते विचारत. साहजिकच त्या भांबावलेल्या मुलांना आणि त्यांच्या आईवडिलांना हा प्रश्न आणि त्याचा संदर्भ, त्यांच्या शिणलेल्या मनाला उभारी देऊन जाई.


डॉ. विजय आजगांवकर

मधुमेहावर मात करायला योग्य आहार आणि त्याच्या जोडीला योग्य व्यायाम याची गरज असते. शरीरात इन्सुलिन या संप्रेरकाचा (hormone) अभाव असल्यानं त्याची बाहेरहून इंजेक्शनद्वारे भरपाई करणं आणि रक्तातील साखरेची पातळी प्रमाणशीर ठेवणं एवढं जमलं की मधुमेह आटोक्यात राहू शकतो. ही चार सूत्रं रुग्णाला आणि त्याच्या पालकांना पटवून दिली तर त्यांना समजतं, की आपलं मूल हे इतर मुलांसारखं वाढू शकतं आणि त्याच्या सर्व क्षमता ह्या बाकीच्या मुलांसारख्याच आहेत!

अशा प्रकारच्या अनुभवांतून, समविचारी डॉक्टर आणि इन्सुलिनवर अवलंबून असणाऱ्या काही अल्पवयीन मधुमेही रुग्णांच्या पालकांच्या सहकार्यानं, Juvenile Diabetes Foundation (JDF) ह्या संस्थेची १९८२ साली त्या सर्वांनी स्थापना केली. ह्या स्वयंसेवी संस्थेचं कार्य मधुमेही मुलांना आणि तरुणवर्गाला त्यांच्या आरोग्यविषयक गरजा पुरवणं तसंच मानसिक आणि भावनिक आधार देणं अशा प्रकारचं आहे. या संस्थेमध्ये मधुमेहतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, आहारतज्ज्ञ, मधुमेही सल्लागार हे सर्वजण सेवाभावी वृत्तीनं काम करतात. त्यांच्या कार्यशाळा, सहली किंवा विविध खेळांच्या शर्यती असे कार्यक्रम वर्षभर चालू असतात. आपल्या मधुमेही मुलांना इतर मुलांसारखं बागडतांना पाहिल्यावर त्यासाठी अविश्रांत झटणारे डॉ. आजगांवकर, पालकांना देवदूत भासले नाहीत तर नवलच! आता त्यांच्या पश्चात त्यांचं कार्य चालू ठेवण्याचा त्यांच्या तरुण सहकाऱ्यांचा मानस आहे.

वडिलांच्या कार्याचा अभिमान असल्यानं, डायबेटीसच्या इस्पितळाच्या त्यांच्या स्वप्नासाठी विजयभाऊंनी अथक प्रयत्न केले. परंतु अशा संस्थांच्या उभारणीसाठी लागणारी लक्ष्मीची कृपा सरस्वतीच्या उपासकाला कशी लाभणार? त्यांनी दिलेल्या एका मुलाखतीत त्यांची खंत प्रकट होते. वैद्यकीय क्षेत्रांत घुसलेल्या आणि त्याच्यावर ताबा मिळवलेल्या कॉर्पोरेट महाशक्तीचा मुकाबला कसा करायचा हे समजत नाही. या व्यवसायाचा धंदा बनवून त्यातील 'सेवा' गायब करण्याला त्यांचा नेहमीच विरोध राहिला.

चांगल्या समाजकार्याला मदत करण्याची त्यांची इच्छाशक्ती दांडगी होती. १९६०-६१ साली गोवामुक्ती आंदोलकांबरोबर ते गोव्याच्या हद्दीपर्यंत जवळजवळ १०० मैल मुसळधार पावसात चालत गेले, शस्त्रसज्ज पोर्तुगीज सैनिक कधीही गोळीबार करतील किंवा मारहाण करतील याची खात्री असतानादेखील! आदरणीय प्राध्यापक मधू दंडवते यांना पोर्तुगीज पोलिसांनी रबरी दंडुक्यानी मारहाण करून, जंगलात मरण्यासाठी फेकून दिलं, तेव्हा इतर सत्याग्रहींच्या बरोबरीनं विजयभाऊंनी त्यांना उचलून आणून त्यांची शुश्रूषा केली. पूर्व केंद्रीय रेल्वेमंत्री आणि थोर समाजसेवक मधू दंडवते यांच्या चिरंजीवांनी, उदय दंडवते यांनीं डॉ. आजगांवकरांची ही आठवण मनाच्या कोपऱ्यांत जपून ठेवली आहे.

उपजतच सौजन्यशील व्यक्तिमत्त्वाच्या विजयभाऊंच्या मनाला दिखाऊपणा किंवा बडेजाव शिवला नाहीं. अभ्यासू आणि जिज्ञासू विजयभाऊंनी आपली मानसकन्या डॉ. मेधा शेटे यांना सांगितलं होतं, की त्यांना पुस्तकांचं व्यसन आहे. हे वाचनाचं वेडदेखील त्यांना वारसाहक्कानं लाभलं होतं. त्यांच्या वडिलांनादेखील वाचायला आवडे आणि त्यांच्या वार्धक्यात विजयभाऊंनी वडिलांसाठी एका वाचनिकाची नेमणूक केली होती. वडिलांच्या आठवणींचं 'अण्णांचं आत्मकथन' त्यांच्या वडिलांच्या प्रेमापोटीच लिहिलं गेलं. अनेकांना पुस्तकं वाटून विजयभाऊ सर्वांना आपल्या ह्या पुस्तकांच्या व्यसनामध्ये सामील करून घेत.

पुस्तकांच्या इतकाच त्यांचा माणसांचाही संग्रह अफाट होता. आणि प्रत्येकाच्या लहानसहान गोष्टी त्यांच्या स्मरणांत राहत. सख्ख्या नात्यांइतकीच मानलेली नाती ममत्वानं जपत. त्यांचे वैद्यकीय महाविद्यालयापासूनचे मित्र डॉ. जे.एम. वाटवे स्वतःला, थिल्लरपणा, आत्मकेंद्रितता आणि पोषाखीपणा या दोषांपासून दूर ठेवू शकण्याचं श्रेय विजयभाऊंच्या मैत्रीला देतात.

इस्पितळाच्या आणि रोग्यांच्या कामाबरोबरच दुपारच्या वेळी त्यांनी त्यांच्या आवडीच्या सरस्वतीच्या अंगणात मुक्त संचार केला. त्यांनीं मुंबई विद्यापीठामधून संस्कृत आणि कम्पॅरेटिव्ह मायथॉलॉजी असे दोन डिप्लोमा केले आणि हिस्टरी डिपार्टमेंटला एम.ए.साठी नाव नोंदवलं होतं. 'थांबला तो संपला' हे त्यांनीं मनोमन जाणलं होतं.

त्यांचं 'कथा इन्सुलिनच्या शोधाची' हे पुस्तक वाचनीय आहे. त्याखेरीज त्यांनी 'मॅकॉले', 'नाते जुळले मधुमेहाशी', अशी पुस्तकं लिहिली आहेत. त्यांनी कवितांची देखील दोन पुस्तकं लिहिली आहेत. त्याशिवाय वैद्यकीय आणि सामाजिक विषयांवरही त्यांनी वेळोवेळी विचार प्रकट केले आहेत. त्यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्तानं त्यांच्या सुहृदांनी 'विजयगाथा' नावाची छोटी पुस्तिका प्रसिद्ध केली होती.

कॅन्सरसारख्या रोगाला न डगमगता सदैव हसतमुखानं सामोरं जात त्यानी आपली ती आठ वर्षं दुसऱ्यांना आंनद वाटत, पुस्तकांच्या संगतीत व्यतीत केली. त्यांच्या महाविद्यालयीन काळांतल्या आठवणी, त्यांचे नाटकातले अभिनय तसंच घरगुती घटना यांच्या साक्षीदार आणि जवळजवळ ६०-६५ वर्षांपासून घनिष्ठ स्नेह असलेल्या उषा मेहता आणि विद्या चौहान या भगिनींनी विजयभाऊंचं केलेलं वर्णन सर्वांना सांगितल्याखेरीज मला राहवत नाहीं. त्या म्हणतात,

''अखेर हातात कुऱ्हाड घेऊन गेले कित्येक महिने उभ्या असलेल्या त्या काळपुरुषानं विजयवर घाला घातला! जगातील एक सुंदर व्यक्तिमत्त्व संपलं! विजय म्हणजे positivity चा मूर्तिमंत साक्षात्कार होता. माणूस किती स्वच्छ, निर्मळ आणि आशावादी मनाचा असू शकतो याचे तो मूर्तिमंत, जागतं उदाहरण होता, नव्हे आहे. त्याच्या मृत्यूची भयाण पोकळी स्वीकारणं व्यक्तिगत पातळीवर खूपच अवघड आहे. मैत्रीतील हा पोरकेपणा भयानक आहे. स्वतःला घट्ट करणं, तोच उत्साह, आशावाद पुन्हा पुन्हा प्रयत्नपूर्वक जागा ठेवणं हे केलेच पाहिजे, नीट असं!''

या लेखासाठी मला डॉ. योजना, डॉ. मेधा, पद्मा वाघ, उषाताई मेहता आणि सौ.आरती ज्ञानेश आजगांवकर यांची मदत झाली. त्यांची मी आभारी आहे.

अशा या चिरतरुण डॉक्टरची, शिक्षकाची, मित्राची, जीवनकलेच्या वाटाड्याची आणि साहित्याच्या वाटसरूची स्मृती आपण त्यांच्याच शब्दांतल्या, त्याच्याच आवडत्या बकुळफुलासारखी जपूया.

असंच एक झाड बकुळीचं असतं
सदा आपल्या पायतळी अंथरत
आणि आपला मंद गंध पसरत
सुकलं फूल जरी
दूरीहून आपल्याला साद घालत
आपल्यापाशी येण्यास हाकारत
आणि पसरलेल्या फुलांना अलगद
घ्यायला लावत आपल्या ओंजळीत
नाकाशीं जवळीक साधत
तनमन गंधित करत
सुकलं जरी तरी गंध विखरत
निरोप घेत गंधाचे वरदान देत.

**– डॉ. मालिनी नाडकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८६९२०२९८६
doctornmalini@yahoo.co.in

ग्रंथाली




# वंश-अनुवंश

**डॉ. हेमा पुरंदरे**

**हार्ड बाउंड मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रुपये**
**पेपरबॅक मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रुपये**

शब्दांकन
**उज्ज्वला गोखले**

डॉ. हेमा पुरंदरे यांनी गेल्या पंचेचाळीस वर्षांत जनुकीय विकारांच्या अनेक केसेस पाहिल्या, पेशंटस्ना मार्गदर्शन केले, त्यांचे समुपदेशन केले. जनुकशास्त्राच्या सुवर्णयुगातला त्यांचा हा प्रवास पुस्तकात उलगडला आहे.
पेशंटस्च्या केसस्टडीज् सोबतच, लेखिकेच्या व्यक्तिगत संघर्षाची, तिने पेललेल्या आव्हानांची आणि तिच्या जिद्दीची ही कथा मनोवेधक तर आहेच; त्याचबरोबर प्रेरणादायीदेखील आहे.


ग्रंथाली
PIXEL BY PIXEL
साहित्याच्या पारावर
साप्ताहिक अक्षरमैफल
या लिंकवर पाहा - Granthali Watch फेसबुक पेजवर आणि
वैभव महाराष्ट्राचे यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध
दोन साहित्यिक
आणि आपण...
दर शुक्रवारी भेटूया
सकाळी १० वाजल्यापासून उपलब्ध
ग्रंथाली फेसबुक पेजवर..
भाग २०
शुक्रवार, ११ ऑगस्ट २०२०
रविराज गंधे
लेखक, माध्यमतज्ज्ञ
माध्यमरंग
राज कुलकर्णी
लेखक-वक्ता
संवादक
अस्मिता पांडे
भाग २१
शुक्रवार, १८ सप्टेंबर२०२०
गणेश घुले
लेखक
डॉ. सुरेश सावंत
बालकवी
संवादक
डॉ. लतिका भानुशाली
किरण येले
भाग २२
शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२०
डॉ. प्रमोद सलगरकर
लेखक
डॉ. यश वेलणकर
लेखक
सुंदर ते ध्यान
भाग २३
शुक्रवार,२ ऑक्टोबर२०२०
डॉ. राजन गवस
लेखक
डॉ. सुशीलकुमार शिंदे
कवी
सहकार्याने
सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
ZEE मराठी
संयोजक
सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल, अरुण जोशी, राजू कदम,
धनश्री धारप आणि योगिता मोरे

## ऑनलाइन पुस्तकप्रकाशन वृत्तांत

# स्वप्नपंखांना आकाश थिटे

'ग्रंथाली'च्या पुस्तक प्रकाशनाच्या डिजिटल उपक्रमाची सुरुवात, इस्रायलचे नववे राष्ट्राध्यक्ष शिमॉन पेरेस लिखित आणि मेधा आलकरी अनुवादित 'स्वप्नपंखांना आकाश थिटे' या पुस्तकाने झाली. ९ ऑगस्ट रोजी संध्याकाळी पाच वाजता Granthali Watch (ग्रंथाली वॉच) या फेसबूक पेजवरून आणि 'वैभव महाराष्ट्र'चे या यूट्यूब चॅनेलवरून हा सोहळा संपन्न झाला. पुस्तकाचे प्रकाशन चाणक्य मंडळाचे प्रमुख अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी इस्रायलच्या दूतावासाचे कॉन्सुल जनरल योकोव फ्रीनक्लेस्टीन आणि राजकीय संबंध आणि विशेष प्रकल्प अधिकारी अनय जोगळेकर यांनीही आपले विचार मांडले.




कार्यक्रमाच्या सुरुवातीस ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'साहित्याच्या पारावर' या दोन साहित्यिक आणि वाचक यांच्या भेटीच्या कार्यक्रमांची व आगामी पुस्तक प्रकाशनांची माहिती दिली. त्यांनी आपल्या भाषणात सर्व मान्यवर, अनुवादिका मेधा आलकरी आणि त्यांचे यजमान विनोद आलकरी यांचे आभार मानले. या पुस्तकाचे हक्क मिळवण्यासंबंधीच्या पत्रव्यवहाराचे पूर्ण श्रेय त्यांना जाते असेही ते म्हणाले.

धैर्य, कल्पनाशक्ती व आधुनिक इस्रायलची जडणघडण असे उपशीर्षक असलेल्या या पुस्तकात इस्रायलच्या जन्मापासून पुढे सत्तर वर्षांच्या राजकीय घडामोडींचा लेखाजोखा आहे. कॉन्सुल जनरल योकोव फ्रीनक्लेस्टीन यांनी आपल्या भाषणात पेरेस यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख मराठी बांधवांना होणार आहे याचा आनंद व्यक्त करताना प्रकाशक, अनुवादिका व पेरेस फाऊंडेशन यांचे आभार मानले. शिमॉन पेरेस यांच्याबद्दल गौरवोद्गार काढताना कॉन्सुल जनरल यांनी, त्यांचा द्रष्टेपणा, इस्रायलच्या विकासाबद्दल त्यांना वाटणारी कळकळ आणि उज्ज्वल भविष्याची खात्री यांचा आवर्जून उल्लेख केला. ते म्हणाले की सहसा वयाची ऐंशी पार केल्यावर उच्चपदस्थ व्यक्ती आपल्या गतदिवसांबद्दल, आपल्या यशाबद्दल बोलत असतात. शिमॉन पेरेस मात्र त्यास अपवाद होते. ते बोलत असत तंत्रज्ञानाबद्दल, विज्ञानाबद्दल आणि इस्रायलच्या भविष्याबद्दल!

राजकीय संबंध आणि विशेष प्रकल्प अधिकारी अनय जोगळेकर यांनी आपल्या भाषणात शिमॉन पेरेस यांच्या प्रत्यक्ष भेटीचा अनुभव सांगितला. २०१४ सालच्या नोव्हेंबर महिन्यात त्यांनी दिलेल्या भारतभेटीत त्यांच्या सोबत दोन तास घालवायला मिळणे हा ते स्वतःच्या आयुष्यातील मोलाचा ठेवा मानतात. त्या भेटीत त्यांचा साधेपणा, ९१व्या वर्षी त्यांच्या परिपक्व व्यक्तिमत्त्वात असलेले बालसुलभ कुतूहल त्यांना खूप भावले. इस्रायलच्या विविध क्षेत्रांतील उत्तुंग भरारीचा आढावा घेणारे हे पुस्तक मराठी साहित्यविश्वात मोलाची भर घालेल आणि भारत-इस्रायल संबंध अधिक दृढ करण्यात महत्त्वाचे योगदान देईल, असा विश्वास अनय जोगळेकरांनी व्यक्त केला.

सलग सहा-सात तास या अनुवादाच्या कामात व्यतीत करणाऱ्या मेधा आलकरी यांनी या प्रकल्पामुळे त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल झाल्याचे मोठ्या अभिमानाने नमूद केले. त्या म्हणतात, या परकाया प्रवेशात त्यांना अगम्य विषयांची तोंडओळख तर झालीच, शिवाय या महान नेत्याच्या व्यक्तिमत्त्वातले त्यांना भावलेले गुण आपल्यात उतरवण्याचा त्यांनी दृढनिश्चय केला. मेधा आलकरी यांनी आपल्या भाषणात शिमॉन पेरेस यांचे व्यक्तिमत्त्व उभे केले. देशप्रेमाने ओतप्रोत, आशावादी, स्वप्नांचा पाठपुरावा करणारे, ती साकारण्यासाठी अतोनात कष्ट घेणारे, वचनांना जागणारे, आव्हाने स्वीकारणारे, सारासार विचारांती योग्य निर्णय घेणारे, नैतिक धैर्य असणारे आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रामाणिक धडपड करणारे, नोबल पारितोषिकप्राप्त शिमॉन पेरेस!

पुस्तकाचे प्रकाशन करताना अविनाश धर्माधिकारी म्हणाले, ''इस्रायलची कहाणी मानवाला प्रेरणादायी आहे. एक चिवट समाज ज्याला अडीच हजार वर्षं मूळ भूमीतून उखडून दूर फेकलं गेलं त्या इस्रायली बांधवांना आपलं मानून भारत देशानं आपल्या भूमीत सन्मानानं स्थान दिलं. असा हा आनंदाचा ऋणानुबंध आहे.'' शिमॉन पेरेस यांचा राष्ट्रनिर्मितीत असलेला मोलाचा वाटा आणि शांतिप्रक्रियेकडे अग्रेसर वाटचाल याबद्दल बोलताना ते म्हणाले, ''इस्रायलच्या निर्मितीच्या काळात डेविड बेन गुरिऑन यांच्याबरोबर सहकारी असताना शिमॉन पेरेस यांनी 'हागाना' या सशस्त्र संघटनेद्वारे इस्रायलच्या स्वातंत्र्यासाठी आणि नंतर ते टिकवण्यासाठी जे जे काही आवश्यक होत ते ते आक्रमकपणे केले, डिमोना हा आण्विक प्रकल्प उभारला. इस्रायलला शांतता लाभण्यासाठी आणि जागतिक शांततेत भर घालण्यासाठी ते राष्ट्र समर्थ असणं आवश्यक होतं; शत्रूंच्या गराड्यात असलेल्या या राष्ट्राला आत्मसंरक्षण करणं तेवढंच अत्यावश्यक होतं. शेजारी राष्ट्रांनी इस्रायलचा जगण्याचा हक्क एकेक करून मान्य केला तेव्हा, आता टिकणारी शांतता मिळावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यासाठी त्यांना नोबल पारितोषिक मिळालं. या पुरस्कारानं जणू नोबल पुरस्काराची किंमत वाढली आहे असं म्हटलं तर वावगं ठरू नये. इतकं अद्वितीय शिमॉन पेरेस यांचं व्यक्तिमत्त्व आहे.''

अनुवादिका मेधा आलकरी यांच्या या प्रयत्नाबद्दल प्रशंसोद्गार

काढताना धर्माधिकारी पुढे म्हणाले, ''मूळ आत्मचरित्र तितक्याच समर्थपणे मराठीत आणलेलं आहे. चांगला अनुवाद कशाला म्हणायचं तर तो वेगळ्या भाषेत लिहिला गेला आहे असं न वाटता एकाच वेळी तो अनुवाद मूळ आशयाशी प्रामाणिक आहे आणि तरीसुद्धा मुळात मराठीतून लिहिलंय असं वाटावं.''

या अतिशय नेटक्या कार्यक्रमाची शोभा वाढवणारे सूत्रसंचालन केले अस्मिता पांडे आणि लतिका भानुशाली यांनी. वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभलेला हा कार्यक्रम 'ग्रंथाली वॉच' या फेसबूक पेजवर आणि 'वैभव महाराष्ट्राचे' या यूट्यूब चॅनलवर उपलब्ध आहे.

**– मेधा आलकरी**

## आनंदयात्री पोलिस अधिकाऱ्याची डायरी

'ग्रंथाली' प्रकाशित व जयंत नाईकनवरे, आयपीएस लिखित 'आनंदयात्री पोलिस अधिकाऱ्याची डायरी' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवार, १३ ऑगस्ट २०२० रोजी पोलिस मुख्यालयात, पोलिस महासंचालक सुबोध जायसवाल यांच्या हस्ते झाले. त्यावेळी नाना पाटेकर यांनी चित्रफितीच्या माध्यमातून मनोगत व्यक्त केले.




जयंत नाईकनवरे यांनी आपल्या मनोगतात 'घर पाहावे बांधून आणि पुस्तक पाहावे लिहून' अशी भावना व्यक्त करत हे पुस्तक म्हणजे पंचवार्षिक योजना ठरल्याचे सांगितले. सेवेत आल्यापासून पोलिस ठाण्यात रमण्याची आवड मला आहे. तिथे घडणाऱ्या घटनांचा उल्लेख या पुस्तकात असल्याचेही त्यांनी नमूद केले. 'ग्रंथाली'तर्फे सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल हे विश्वस्त उपस्थित होते. यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

या पुस्तकाचे प्रकाशन करताना पोलिस महासंचालक सुबोध जायसवाल म्हणाले, '' 'आनंदयात्री... डायरी'त अस्सलपणा असून, यात पोलिस अधिकाऱ्यांना तोंड द्याव्या लागणाऱ्या आव्हानांचा समावेश आहे. ही डायरी वाचल्यानंतर समाजात पोलिसदलाविषयी सकारात्मक प्रतिमा निर्माण होण्यास मदत होईल.''

प्रत्येक लेखकाची एक शैली, भाषा, मांडणीची पद्धत असते. पुस्तकं माणसाला प्रगल्भ करत असतात. या पुस्तकात मी स्वतःला डोकावून पाहत होतो. असे नाना पाटेकर यांनी नमूद केले. ''मी नट म्हणून संवाद, स्वगतं म्हणतो तीही इतकी छान, ओघवती येत नाहीत. या डायरीतील लिखाणात कुठेही विद्वतेचा दिखाऊपणा नाही. सुरुवातीपासून शेवटापर्यंत सर्व गोष्टी मुद्देसूद आहेत. प्रत्येकाला अशाप्रकारे अनुभव टिपता आले पाहिजेत.'' अशी पुस्तीही त्यांनी जोडली.

या कार्यक्रमाला अतिरिक्त पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, अतिरिक्त पोलिस महासंचालक रजनीश सेठ, एस.जगन्नाथ, कुलवंत कुमार, सदानंद दाते, संजीवकुमार सिंघल, देवेन भारती, उपायुक्त विनय राठोड आदी उपस्थित होते.

राज्याच्या दहशतवादविरोधी पदावर कार्यरत असलेल्या नाईकनवरे यांच्या या पुस्तकाचा प्रकाशनसोहळा, त्याला जोडून पुण्यातील पंचम संस्थेच्या सहयोगाने पुस्तकातील काही भागांचे वाचन व त्याला अनुसरून गाणी, असा तीन तासांचा कार्यक्रम १५ ऑगस्ट २०२० रोजी सायंकाळी फेसबूक आणि यूट्यूबच्या माध्यमातून जगभरातील रसिकांसाठी दाखवण्यात आला.

हे पुस्तक पोलिस सहकाऱ्यांना सवलतीत केवळ १०० रुपयांत उपलब्ध केले आहे, असे ग्रंथाली'च्या वतीने जाहीर केले आहे.

**– धनश्री धारप**

कार्यक्रम संयोजिका

## यश म्हणजे काय? भाग २

'ग्रंथाली', 'भाग्यश्री फाऊंडेशन' आणि 'पिक्सेल बाय पिक्सेल' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, शिल्पा खेर लिखित 'यश म्हणजे काय? भाग २' या पुस्तकाचे प्रकाशन 'Granthali Watch' या फेसबूक पेजवर आणि 'वैभव महाराष्ट्राचे' या यूट्यूब चॅनेलवर २९ ऑगस्ट रोजी करण्यात आले .

केवळ पैसा आणि प्रतिष्ठा म्हणजे यश नव्हे तर यश ही एक व्यापक संकल्पना आहे तसेच यश ही भौतिक जगाच्या पलीकडे असणारी शाश्वत गोष्ट आहे, या विचारांच्या अनुषंगाने यश या संकल्पनेची मांडणी करणारे हे पुस्तक. यात एकूण बारा आदरणीय व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती आहेत. विज्ञान, सिनेमा, गिर्यारोहण, उद्योग-व्यवसाय, समाजसेवा, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत उत्तुंग यश संपादन केलेल्या व्यक्तिमत्त्वांनी यशाची व्याख्या आपापल्या अनुभवांच्या आधारे उलगडण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे .

या पुस्तकाचे प्रकाशन अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्राताई महाजन, सुप्रीम कोर्टाचे माजी न्यायमूर्ती बी.एन. श्रीकृष्ण, मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर, अभिनेते सचिन खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले .

डॉ. अनिल काकोडकर यांनी आपले मत मांडताना म्हटले, की या पुस्तकाची मांडणी विलक्षण आहे. या पुस्तकात शिक्षक, विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांतील यशस्वी माणसांना विविध प्रश्न विचारतात. त्या प्रश्नांची नुसती उत्तरे यात मांडली जात नाहीत, तर विविध विषयांचा ऊहापोह त्या निमित्ताने केला जातो. त्या व्यक्तिमत्त्वांकडून जी उत्तरे मिळतात त्यावर शिक्षक आणि विद्यार्थी साधकबाधक चर्चा करतात. या पुस्तकातील मुलाखतींमध्ये विविधता आहे. जीवनतील विविध प्रश्नांची हाताळणी वेगवेगळ्या पद्धतीने यात सादर करण्यात आली आहे. त्यातून मुलांच्या मनातील शंकांची उकल होते आणि त्या चर्चेला व्यापक रूप येते. हे कठीण काम सहजपणे या पुस्तकात साध्य झाले आहे.

सुमित्राताई महाजन म्हणाल्या, की केवळ यशस्वी व्यक्तींबद्दल माहिती देणे व त्यांचा जीवनपट उलगडणे हा या पुस्तकाचा उद्देश नाही, तर विविध मुलाखतींच्या माध्यमातून संवाद स्थापित केला आहे. प्रत्येकाने आपली मते व्यक्त केली आहेत. त्यावर विद्यार्थी-शिक्षक यांनी काय घ्यावे यावर चर्चा घडते, तीच खूप महत्त्वाचीआहे. यशस्वी माणसांचे चरित्र वाचताना एक प्रकारची तटस्थता येते. आपण अशा व्यक्तींना देवत्व बहाल करतो आणि स्वत: त्यांच्यापासून विलग राहतो. 'ती मोठी माणसं' ही भावना वाढीस लागते. या पुस्तकात अशी चरित्रे न मांडता, विविध व्यक्तींच्या विचारांतून समाजाला शाश्वत विचार देण्याचा प्रयत्न केला आहे.

जस्टीस बी.एन. श्रीकृष्ण यांनी नम्रपणे नमूद केले, की मी यशस्वी आहे असे मला वाटत नाही. जीवनाचा प्रवास पूर्ण करून ध्येयाकडे पोचणे म्हणजे यश, असे मला वाटते. काहींच्या मते पैसा, प्रतिष्ठा किवा कौटुंबिक सुख म्हणजे यश. पण, हे खरे यश नव्हे. खरे ध्येय जाणीवपूर्वक साधता आले पाहिजे. भगवतगीतेमध्ये चार महत्त्वाची कर्तव्ये सांगितली आहेत- धर्म, अर्थ, मोक्ष आणि काम. यात धर्माला अत्यंत महत्त्व आहे . खरा धर्म म्हणजे जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत समाजाची-लोकांची सेवा करत राहणे आणि आपले कर्तव्य प्रामाणिकपणे करणे हेच खरे यश होय.

न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी आपले मत मांडताना असे मत व्यक्त केले, की यश आणि अपयश यांना जोडणारा बिंदू असतो, तो बिंदू म्हणजे संधीचा बिंदू. संधी मिळाल्याशिवाय यश मिळत नाही. पण ही संधी प्रत्येकाला मिळतेच असे नाही. ध्येयाकडे वाटचाल करताना यश नाही मिळाले तरी दु:खी व्हायचे कारण नाही. यशानेच आनंद मिळतो असे नव्हे; तर अपयशी माणूससुद्धा सुखी आणि समाधानी असतो.

सचिन खेडेकर यांनी पुस्तकातील बारा व्यक्तिमत्त्वांनी मांडलेल्या विचाराचा सांगोपांग आढावा घेतला आणि प्रत्येकाच्या विचारांतील महत्त्वाचा मुद्दा उद्धृत केला. हे पुस्तक शालेय आणि महाविद्यालयीन जीवनातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे त्यामुळे ते सर्वत्र पोचले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आपले मनोगत व्यक्त करताना शिल्पा खेर म्हणाल्या, मुलांना खरे यश म्हणजे काय याची कल्पना नसते. ती पालकांनी आणि शिक्षकांनी करून द्यायला हवी. आज आत्महत्या करणारी मुले, मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने जगणारी पिढी, किंवा संभ्रमित अवस्थेत असणारी पिढी यांना यशाचा खरा अर्थ समजावून देण्यासाठी या पुस्तकाचा जन्म झाला आहे.

या कार्यक्रमाची प्रस्तावना 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथाली' विश्वस्त, प्रा. डॉ. लतिका भानुशाली यांनी केले; तर आभारप्रदर्शन भाग्यश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि 'ग्रंथाली' विश्वस्त डॉ. जितेंद्र खेर यांनी केले.

महत्त्वाच्या सामाजिक विषयावरच्या या पुस्तकाला अनुदान प्राप्त झाल्याने, विद्यार्थ्यांसाठी हे ९५० रुपयांचे पुस्तक विशेष सवलत देत केवळ २५० रुपयांत उपलब्ध केल्याचे आणि टपालखर्च ५० रुपये असल्याचे सुदेश हिंगलासपूरकर यांनी सांगितले आहे.

**- डॉ. लतिका भानुशाली**


ग्रंथाली




अस्वस्थ तांडा

डॉ. विजय जाधव

शोषणाच्या भीषणरूपाचा आविष्कार

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

मालवणी भाषेतील
वाक्प्रचार
आणि हुमाणी

विद्या प्रभू

मालवणी बोलीभाषेतील म्हणी




**मूल्य ३०० रु.**
**सवलतीत १८० रु.**



# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**आठवडीबाजार आणि समाजजीवन**

**राज कुलकर्णी**




**व्यवहाराच्या रोखपणाखालचा खणखणाट**

''कुलूप सहजगत्या उघडण्याची कला जोपासण्याच्या झोरी समाजाला अजूनही ना त्याच्या नशिबाचे कुलूप सापडले ना अशा कुलपाची चावी त्यांना सापडलेली आहे.''

आठवडाबाजार ही संकल्पना माहीत नसलेला विरळाच, पण त्याच्या अंतरंगात डोकावणाराही विरळाच सापडेल. राज कुलकर्णी यांनी या बाजाराचे अंतरंग वाचकाच्या समोर उलगडून ठेवले आहे. बाजारात सुई-लाचकनपासून विळा-खुरण्यापर्यंत, बांगडीपासून कपडालत्त्यापर्यंत सर्वकाही मांडून ठेवलेले असते. हा बाजार हे एक सांस्कृतिक केंद्र असते. या केंद्रात काळानुसार, गरजेनुसार, सोईनुसार बदल होत गेला आहे. तो फरक कुलकर्णी यांनी मनोगतात स्पष्ट केला आहे. एकूण २८ लेख या संग्रहात असून डॉ. मंदार काळे यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. खरेदी-विक्रीच्या या आठवडे बाजारातील रोख व्यवहाराची जिज्ञासा, मानसिकता आणि व्यवहारीपणाचे कुतूहल, एकूण समाजजीवन यांचा सखोल धांडोळा राज कुलकर्णी यांनी घेतलेला आहे. तो प्रत्येक बाजार पाहताना वाचकाला स्मरण देणारा असेल, इतका तो परिपूर्ण आहे.

'दक्षिण काशी तेर' या पुस्तकाचे लेखक राज कुलकर्णी यांचे हे दुसरे पुस्तक. ते उस्मानाबाद येथे वास्तव्याला असून तेथील आठवडे बाजाराविषयीची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. या बाजारात आपले दुकान थाटून बसलेल्यांपैकी काही वैशिष्ट्य असलेल्या, आपले वेगळेपण कायम जपलेल्या व्यावसायिकांशी संवाद साधून त्यांनी ही माहिती संकलित केली आहे. अशा माहितीमध्ये एकसाचीपणा येण्याची शक्यता असते. परंतु व्यवसाय प्रत्येकाचा वेगळा तसा त्यांचा तपशीलही वेगळा राहील याची जाणीवपूर्वक काळजी त्यांनी घेतलेली आहे. व्यवसायाचे गणित, उगम, व्यावसायिकाचा इतिहास, जात, पोटजात, त्यांच्या चालीरीती, प्रथा, विधी, असा सर्वांगीण तपशील मोजकेपणाने घेतलेला आहे, ज्याला ते समाजजीवन संबोधतात. पाथरवट, भोई, लोहार, झोरी, सोनार, लोणारी, बुरुड, काशी कापडी, या समाजांचे जीवन, त्यांचे व्यावसायिकपण ठळकपणे उलगडून दाखवलेले आहे.

घिसाडी लोहार हे तवा, विळी, झाऱ्या, कुऱ्हाड, कुदळ, खुरपे, कोयता अशा वस्तू बनवणारा समाज. त्यांच्यात मराठी घिसाडी, टांगेवाले घिसाडी, पत्रेवाले घिसाडी असे पोटप्रकार आहेत. परंतु हाच लोहार समाज मध्ययुगात चितोड परिसरात राजपूत वीरांना तलवारी बनवून देण्याचा व्यवसाय करत असे. हा इतिहास लेखक येथे सांगून जातात. तसेच त्यांचा बाणेदारपणाही सांगतात, 'महाराणाचा पराभव झाला तेव्हा या समाजाने चितोड सोडले, पुन्हा स्वतंत्र होत नाही तोपर्यंत गंभिरा नदी ओलांडून चितोडमध्ये यायचे नाही अशी शपथ त्यांनी त्यावेळी घेतली होती.'

बंजारा समाजाच्या वेशभूषेची वैशिष्ट्ये सांगताना ते त्यांच्या भाषेचाही परिचय करून देतात. झाकण, काटली, गाला, गळणी, टोपली, बर्ची, झोळणा हे त्यांचे काही विधीतील शब्द. लग्न-बाया, नवरदेव-येतुडू, नवरी-नवलोरी यांचीही ते ओळख करून देतात.

बांगडी ही आकारानुसार भरली जाते, तिला गाळा म्हणतात. हा गाळा एक-१६ आण्याच्या हिशोबाने असतो. सगळ्यात लहान १४ आणे, सगळ्यात मोठा २-६ आण्यांचा, म्हणजे १६+१६+६ = ३८ आण्यांचा. फिरोजाबाद हे बांगडीउत्पादनाचे प्रमुख केंद्र.

जिलेबी हा सगळ्यांच्या परिचयाचा गोड पदार्थ. याला सुधा कुंडलिका म्हणतात. तिला ते एक गोड यवनी आहे असे म्हणतात. झुल्बी-झोल्बिया-जिलेबी अशी तिची व्युत्पत्ती देतात. इमरती हा जिलेबीचा प्रकार. तो इमिरात म्हणजे साम्राज्य, तिचा अपभ्रंश इमरती. हिचा उल्लेख मोहम्मद बिन हरून अल बगदादीच्या पुस्तकात आहे, असा संदर्भही देतात. असे अनेक संदर्भ विषयानुसार त्यांनी दिलेले आहेत. काथवट या लाकडी परातीची माहिती देताना 'मनमा चंगा तो कथोटीमे गंगा' हा दोहा देतात. भोई समाजाच्या पोटजाती स्पष्ट करताना शंकर वैद्यांचा उल्लेख येतो. ते शब्द हे 'पालखीचे भोई' असे म्हणत. 'चलो रे डोली उठाओ कहार' ही ओळही चपखलपणे दिलेली आहे. जाते हे प्रत्येक घरी असायचे. जात्याचे आणि ओवीचे नाते देतानाच ओव्याही दिलेल्या आहेत. अडकित्ता, कुलूप, झाडू, चणे-फुटाणे, चुना, पिशव्या, तंबाखू, पाथरवड अशा अनेकांची माहिती या पुस्तकात आहे. नोटाबंदीचा संदर्भही आहे. समाजजीवनाचा जवळून परिचय असलेले कुलकर्णी त्यांच्या सहज लालित्यपूर्ण शैलीने एक मोठी उपेक्षित समूह वाचकांसमोर आत्मीयतेने उलगडून दखवतात.

फोटो आणि चित्रांची मांडणी केल्याने पुस्तकाच्या उठावदारपणात भर पडली आहे. मुखपृष्ठही साजेसे आहे.

**मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**



## ग्रंथपान

**उभारणी**
**भगवान इंगळे**




**देह चंदनाचा वसा परिसाचा**

आत्मचरित्रांचे खंड यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. प्र.के. अत्रे यांच्या 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्राचे पाच खंड प्रकाशित झालेले आपण वाचले आहेत. त्यानंतर आनंद यादव, ह.मो. मराठे यांची आत्मचरित्रे खंडात्मक पद्धतीने प्रकाशित झालेली आहेत. भगवान इंगळे हे या पंक्तीला आलेले आणखी एक साहित्यिक. 'ढोर' या आत्मचरित्राने मराठी साहित्यात त्यांचे स्थान अधोरेखित केले. त्याची आठवी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली आहे. या उत्तम खंडानंतर त्यांचा पुढील दुसरा खंड 'उभारणी' या नावाने प्रकाशित झाला आहे. त्याचीही दखल मराठी साहित्यात घेतली जाईल इतके दर्जेदार लेखन 'उभारणी'च्या निमित्ताने वाचकांसमोर आले आहे.

खंडात्मक लेखनात एक टप्पा पूर्ण झाला की त्याच्या पुढील टप्पा दुसऱ्या खंडात सुरू होतो. 'ढोर' या आत्मचरित्रात चरित्रनायकाचे बालपण, कुमारपण ते प्राध्यापकाच्या पेशात पदार्पणपर्यंतचा जीवनप्रवास, समाजदर्शन, चालीरीती, अंधश्रद्धा, मान–अपमान, गरिबी, कौटुंबिक परिस्थिती, व्यवसाय, नातेवाईक, शिक्षण असा मोठा विलक्षण पट कवेत घेतल्यासारखा उलगडून दाखवलेला आहे. त्याचा पुढचा टप्पा सुरू होतो तो 'उभारणी'त आला आहे. प्राध्यापक म्हणून स्वत:चे करिअर उंचावत म्हणजे वसई–पालघर करत भवन्स, मरीन लाईन्सला चौपाटीवर विसावतो. सौभाग्यवती आशा यांचे आशेच्या आकांक्षा पूर्ण करत संपूर्ण कॉलेज शिक्षण पदव्युत्तरपर्यंत झेपावते, प्राध्यापक म्हणून एसएनडीटीत समर्पित होते. हा उभयतांचा शिक्षणप्रवास आणि अध्यापनप्रवास जिद्दीचा, चिकाटीचा, आशा–अपेक्षांचा, कधी उपेक्षेची झळ सोसलेला, तरी संयमाने ईप्सित साध्य करणारा प्रेरक प्रवास आहे. ग्रामीण भागातून आलेले बुजरेपण बाजूला सारून स्वत:च्या कर्तृत्वाचे नाणे खणखण वाजवून दाखवणारा कलदार प्रवास आहे, जो 'आकांक्षापुढे आकाश ठेंगणे'ची प्रचीती देतो.

साधारणपणे मोठ्या सन्मानाला गवसणी घातल्यानंतर माणसे आपले पूर्वायुष्य विसरतात, आप्त–नात्यागोत्यापासून अलिप्त राहून स्वत:ची कडक इस्त्रीची प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करतात, आपला नवा मुखवटा सांभाळण्याची कसरत करण्यात आयुष्याची इतिश्री मानतात. परंतु भगवान इंगळे हे या सगळ्याला अपवास आहेत. आतड्याला पीळ पडला तरी नाळ तुटणार नाही या बाण्याने वागतात. सगळ्यांना धरून आपल्या पायरीपर्यंत आणण्याचा प्रयत्न करतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुक्ता. मुक्तासाठी केलेले प्रयत्न, दाखवलेले आपलेपण हे परोपकाराचे उदाहरण नसून इतरांसाठी आपला चांगला उपयोग झाला पाहिजे, हे समाजभान, कर्तव्य, माणूसपण आणि उदार दृष्टिकोनाचे उदाहरण म्हणता येईल.

कन्या नीलम ही व्यक्तिरेखा म्हणजे स्वतंत्र कादंबरीचा विषय म्हणता येईल. संस्कार, शिक्षण, पाठबळ, जिद्द, धाडस घालून साकारलेले हे व्यक्तिमत्त्व. कॅप्टन नीलम वैमानिक म्हणून समाजासमोर आदर्श उभा करतात. तेव्हा इंगळे दापंत्याच्या कर्तृत्वाला सलाम करावासा वाटतो. पाठोपाठ निखिलही वैमानिक, जावई रॉबिन वैमानिक, म्हणजे एकाच कुटुंबात तीन वैमानिक! असे अनोखे भाग्य लाभलेले इंगळे हे मराठीतील एकमेक साहित्यिक असावेत. हे भाग्य आपोआप आलेले नाही, त्यासाठी त्यांना रक्त आटवावे आणि चपला झिजवाव्या लागलेल्या आहेत.

कॉलेजातील सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी, गावाकडील नातेवाईक, गावाकडील चालीरीती, लग्नप्रथा, घरखरेदीचा अनुभव, बँकांचे व्यवहार, व्याख्याने, सत्कार, असे अनेक अनुभव 'उभारणी'त आलेले आहेत. कधी आनंद, कधी दु:ख, कधी समाधान, कधी नैराश्य असे अनुभव आहेत. परंतु या सगळ्यात ते ठामपणे उभे राहिले आहेत. आपल्या विचारांवर, निर्णयांवर ठाम राहिले आहेत. सतत इतरांना मदत करण्याच्या, चांगुलपणावर विश्वास ठेवण्याच्या भूमिकेशी ठाम राहिले आहेत. हा ठामपणा केवळ आपल्या कुटुंबाच्या उभारणीसाठी नाहीतर इतरांच्याही आयुष्याला आकार देण्यासाठीचा आहे. कृतज्ञताभावनेचा आहे. मुलगा निखिल अमेरिकेत स्थिर होऊ पाहतो तेव्हा ते त्याला मायभूमीची, इथल्या ऋणाची, आठवण देत मायदेशी माघारी बोलवतात, हे मनाचे ठाम मोठेपण लेखनात जागोजागी आढळते.

संघर्षाच्या ज्वालेने तावूनसुलाखून निघालेले हे अस्सल लोह परीस होऊन इतरांच्या जीवनाचे सोने करण्यासाठी स्वत:चा कस पणाला लावते, त्याचा प्रत्यय म्हणजे 'उभारणी'. दर्जेदार प्रवाही, नितळ, संवादी लेखन, हा गुण लेखकाच्या प्रामाणिक प्रतिभेचा आविष्कार आहे.

मुखपृष्ठाची रचना आत्मकथनाला उभारणी देणारे आहे.

**मूल्य ३०० रु.   सवलतीत १८० रु.**



## ग्रंथपान

**रति–विलास**

**मंजिरी पाटील**



**रतिरसाचे ओथंबलेले घट, अनवट वाटेवरचे**

पहाटे वसंतातल्या स्वैरवेळी
टिपावीस माझ्या तनूची नव्हाळी
भरातील लाटा फुटावी त्सुनामी...

आयुष्यात व्यापून टाकणाऱ्या, सुख–समाधानाच्या उत्कट अनुभवाच्या, हळुवार तरल भावनांच्या विषयावर आतापर्यंत झालेले लेखन हे रसिक वाचकांच्या समोर आलेले आहे ते लावणी या साहित्यप्रकारातून. काही मान्यवर कवींनी या विषयाला त्यांच्या सामर्थ्यवान लेखणीतून अलगद फुलवले आहे. परंतु थेट 'रति–विलास' अशा प्रकारची त्यांची जातकुळी नव्हती. त्यातून या एकाच विषयाला धरून काव्याच्या प्रांतात लावणी वगळता लेखन झालेले नाही. हा पहिलाच काव्यसंग्रह असावा, जो केवळ 'रति–विलास'साठी ओळखला जाईल.

असा विषय हाताळणे म्हणजे मोठे धोक्याचे वळण पार करण्यासारखे आहे. तोल सावरला तर ईप्सिताकडे नाहीतर टीकेच्या खोल दरीत. हा विषय तरलतेने, हळुवार अलवारतेने फुलवताना कवीच्या प्रतिभेचा कस लागू शकतो. **अन्यथा 'अश्लील' या एकाच बाणाने त्याची शिकार होते. मंजिरी पाटील यांनी हा 'कसा'ची कसदार परीक्षा पाहणारा संग्रह** वाचकांच्या हाती सोपवला आहे तो विश्वासाने, धैर्याने आणि संयमानेसुद्धा. या संग्रहात कविता, गीते आणि लावण्या असा त्रिवेणी गोफ गुंफलेला आहे. त्यांचे स्वतंत्र विभाग केलेले नाहीत, त्या एकत्रित आहेत. त्यातल्या काहींचा बाज हा गवसला जवळ करणारा आहे. शृंगार हाच विषय वेगवेगळ्या अंगांनी टिपताना त्याच्या छटांची मांडणी मुक्तपणे त्यातून केलेली आहे, याला टप्पे आहेत. अभिसारिका, प्रणायिनी, प्रेयसी अशा अनेक रूपांत ती स्वत:ला पाहते, रेखते, व्यक्त होत जाते, ती स्वत:चे वर्णन करताना सहजपणे व्यक्त होते,

भर ज्वानीच्या या माझ्या सोळा कळा
बहरला लावण्याचा मळा

स्त्री देहाची कमनीयता, लवलवता नवथर बांधा, रेखीवता, त्यातील विलोभनीयता ही तिच्याच शब्दातून येते. तेव्हा तिच्या गंधाने जणू वारा खुळा होतो. ती आतूर असते तेव्हा सख्याच्या भेटीसाठी उधाणलेल्या लाटेसारखी धावत निघते. त्याची एकांती भेट घेण्यासाठी जणू मुरलीचे स्वर तिला साद घालत असतात आणि भेट होते तेव्हा त्याची–तिची मिठी अलवारपणे बिलगत जाते. त्याच्याशी होणारे एकत्व, हिंदकळणे, परमोच्च बिंदूवर झेपावणे, म्हणजे लखलखणाऱ्या... देहामध्ये मोर नाचले रसरसलेलेच.

शृंगाराच्या विषयावर केलेली वर्णने कधी थेट तर कधी काव्यात्मक. पण ती बीभत्स वा अश्लील नसून अतिशय तरल भावनेचा आवेग आहे. चित्रकार ज्या पद्धतीने चित्रातल्या जागा हळुवारपणे खुलवत त्याला पूर्ण आकार देतो तशी दृश्यचित्रमयता या शैलीत आहे. रूपक–प्रतिमांचा वापर हा तर या संग्रहाचा ठेवा म्हणता येईल.

हळव्या हुरहुर डोळ्यांनी पितंय ऊन
उभंच्या उभं... जास्वंदीला... ओथंबून

यासारख्या ओळींनी ओथंबलेली कविता कवयित्रीच्या सजग, सहज लेखणीला मिळालेले वरदान म्हणावी इतकी ती उत्कट आणि चपखल आहे. शृंगाराची वर्णने करताना त्यात जीवनाकडे पाहण्याची सौंदर्यदृष्टी कशी तरल असावी याचा प्रत्यय देते. यातले शब्द हे लेखणीच्या रंगांनी माखलेले आहेत आणि लयीच्या नादात नादावलेले त्यामुळे थेट हृदयापर्यंत जाऊन मिळतात.

आतापर्यंत प्रियकराच्या नजरेतून आपण प्रेम–प्रणयाच्या भावना सहवेदनेने, सहभावनेने अनुभवत आलो. परंतु 'रति–विलास'च्या रूपाने प्रेयसी, रती, मदनमंजिरी, रसवंती, लुब्धाच्या उत्कट भावना आपल्यासमोर आल्या आहेत. कवितेची उत्तम जाण, व्यक्त होण्याची सहजसुंदर शैली, ताल–लयीचे भान ठेवून रचना बायकांच्या मनात स्वत:चे कायमचे स्थान निर्माण करील असा विश्वास वाटतो. एक चांगला कवितासंग्रह ही कवयित्रीची खरी ओळख असते ती मंजिरी पाटील यांनी निर्माण केली आहे. 'रिमझिमता एकांत', 'मोहाची फुले' या त्यांच्या काव्यसंग्रहांतून निर्माण झालेली अपेक्षा 'रति–विलास'ने पूर्ण केली आहे.

सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही देखणे आहे.

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**



# ग्रंथपान

**आनंदयात्री**
**पोलीस अधिकाऱ्याची डायरी**
**जयंत नाईकनवरे, आय.पी.एस.**




## आनंदाचे डोही आनंदतरंग

जीवनात पैसा, प्रतिष्ठा, यश यांना प्राधान्य आहेच; परंतु आपल्या इच्छेप्रमाणे आशा-आकांक्षांची पूर्ती करण्यातला तो एक टप्पा असतो इतकेच. जगणे या पलीकडचे असते, ज्यात 'वांछिले ते ते मेळविले'चा समावेश असतो. असे मनाजोगे आयुष्य वाटपाला आलेली माणसे जी स्वबळाने त्यांच्या पूर्ततेचा शिखरावर पोहोचतात, ती केवळ त्यांच्यापुरती मर्यादित राहत नाहीत. ती इतरांसाठी पथदर्शक मापदंड ठरलेली असतात. अशा कर्तृत्ववान व्यक्तींचे संपन्न अनुभवविश्व लिखित स्वरूपात समाजापुढे येणे ही त्या त्या काळातील पिढीच्या, भवितव्यातील आवश्यक बाब असते. त्या पिढीच्या आयुष्याचा पाया भक्कम करण्याची जबाबदारी पार पाडण्याचे कर्तव्य यांच्या समृद्धपणातून साकारले जाऊ शकते. असे समृद्ध अनुभवविश्व वाचकांसमोर उलगडून दाखवणारे पुस्तक म्हणजे 'आनंदयात्री पोलीस अधिकाऱ्याची डायरी' हे होय.

पोलीसखात्यात असलेले जयंतराव नाईकनवरे यांचे हे अनुभवविश्व म्हणजे 'आनंदयात्री पोलीस अधिकाऱ्याची डायरी' हे पुस्तक. आत्मचरित्र-आत्मकथन असे याचे स्वरूप दिसत असले तरी ते पारंपरिक पद्धतीने लिहिलेले नाही. त्याला 'डायरी'चे तंत्र वापरलेले आहे. 'डायरी' तंत्रात लेखकाला आपला कोश मर्यादित ठेवता येतो. आलेले अनुभव, त्या अनुषंगाने स्वत:ची मते, त्या अनुभवांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशा नेमकेपणाला या लेखनात अधिक महत्त्व दिलेले असते. तेच या पुस्तकात अनुभवास येते. नाईकनवरे हे पोलीसखात्यात सर्व सन्मानप्राप्त पदांवर यशस्वी सेवा बजावलेले कर्तव्यदक्ष अधिकारी ठरलेले आहेत. या प्रतिष्ठित पदापर्यंतचा प्रवास कसा झाला, आलेले अनुभव कसे होते त्यांची नोंद त्यांनी त्यांच्या स्वत;च्या विशिष्ट हेतूने केलेली होती. त्या अनुभवांचे पुस्तक कसे झाले, याबाबत त्यांच्या मनोगतात तपशील दिलेला आहे. हा तपशील त्यांच्या विचारांचा, स्वत:कडे पाहण्याचा नितळपणा दाखवतात.

आयुष्यात करिअरला फार महत्त्व असते. तसे नाईकनवरे यांचे करिअर सुरू झाले ते प्लास्टिक इंजिनीयरिंगने. पुढे विक्रीकर अधिकारी म्हणून. त्यानंतर डीवायएसपी या थेट नेमणुकीने. पुढे ही घोडदौड पोलीस उपायुक्त, आयपीएस, केंद्रीय कॅडरपर्यंत शाही थाटात झालेली आहे. अंगावर कडक स्टार्च केलेला युनिफॉर्म, चकचकीत स्टार्स आणि अशोकचक्र यांच्या प्रतिष्ठेचा सन्मान कायम उंचावत राहील अशी अभिमानास्पद कामगिरी पार पाडत असतानाही त्यांच्यातला कर्तव्यदक्ष करडा अधिकारी वेगळा आणि आयुष्याचा आनंदमय रस प्राशन करणारा सौंदर्यवादी रसिक माणूस वेगळा असल्याचे दिसून येते. दोघांची कुठेही गल्लत झालेली नाही. 'द ॲटलास श्रग्ड द फाऊंटन हेड, द सिक्रेट द जुडास, द सायन्स ऑफ गेटींग रीच न्यू शॉट' अशा पुस्तकांची मोठी यादी त्यांच्या चतुरस्र वाचनाची साक्ष देते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती मोहिमेचा भाग म्हणून बोस्निया, स्वीडन या देशांत प्रतिनियुक्तीवर जातात तेव्हा तेथील सामाजिक, आर्थिक लोकजीवनाचा आणि इतिहासाचाही मागोवा घेतात. तेथील निसर्ग, पर्यटनाचा आस्वाद घेतात. कॅनडा, अमेरिका, बँकाक, फ्रान्स-पॅरीस येथील पर्यटनाची वर्णने ही त्यांच्यातल्या जाणकार रसिकत्वाचा परिचय देतात.

साधारणत: वर्दीतला माणूस स्वत:च्या वैगुण्यांकडे अभावानेच पाहतो, सार्वजनिकपणे त्यांचा अभावानेही उच्चार करत नाही. परंतु नाईकनवरे याला अपवाद म्हणावे लागतील. आपल्याला जाणवणाऱ्या दहा वैगुण्याची ते स्पष्टपणे कबुली देतात. हा मनाचा निर्मळपणा त्यांच्या पदकांइतकाच उठावदार दिसून येतो. स्पर्धापरीक्षा ही आजच्या तरुणांपुढे करिअरची द्वारे उघडणारी संधीकिल्ली. या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारी दशसूत्री आणि अर्थसूत्री सांगितली आहे. कौटुंबिक जीवन, पत्नी रीना, मुले यश आणि जाई यांच्या शैक्षणिक यशाची ओळख करून देताना आपण त्यांच्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकलो नाही ही खंत व्यक्त करतात आणि त्याचवेळी पत्नी रीना यांनी स्वत:चे करिअर सोडून कौटुंबिक जबाबदाऱ्या उत्तमपणे पार पाडल्या यासाठी मन मोठे करून कौतुक करतात.

हे लेखन डायरीवजा आहे परंतु लेखनात सातत्य आहे. नेमकेपणाने सर्व तपशील दिलेले आहेत. पोलीससेवा, प्रत्येक टप्प्यावर असलेले वेगवेगळे विभाग, तपासाचे प्रकार यांची माहिती वाचकांसाठी उपयुक्त ठरावी. लेखनात प्रसन्नपणा आहे. एफआयआर किंवा पोलीस डायरीसारखे रूक्षपणाचे हे लेखन नाही. 'मेरे पास दया नायक है'सारखी वाक्ये सहजपणे आणि चपखलपणे आलेली आहेत. प्रसन्न अनुभवांची रसिकतेने केलेली मांडणी, असे हे पुस्तक आहे, जे शीर्षकाचे सार्थपण सिद्ध करते. आतील प्रकरणांची शीर्षके, त्यांना अनुसरून रेखाटनांची मांडणी झकास आणि मुखपृष्ठही आशयाशी नाते जोडणारे आहे.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**